अकोला । गुरुवार
दि. १५ मे २०२५
वर्ष : १९ अंक : ७४
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये


अनिता आनंद
कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री
(पान ३ वर..)

## तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 40.6 | 25.8 |
| अमरावती | 41.0 | 25.9 |
| भंडारा | 40.0 | 25.0 |
| बुलढाणा | 34.7 | 24.8 |
| ब्रम्हपूरी | 41.4 | 25.5 |
| चंद्रपूर | 39.2 | 27.4 |
| गडचिरोली | 38.0 | 25.0 |
| गोंदिया | 39.6 | 25.4 |
| नागपूर | 41.8 | 26.9 |
| वर्धा | 40.9 | 28.5 |
| वाशिम | 37.8 | 00.0 |
| यवतमाळ | 38.6 | 25.0 |

# अमरावतीचे सुपुत्र भूषण गवई यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ!

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी आज देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपतीभवनात पार पडलेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूषण गवई यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. न्यायमूर्ती गवई हे सरन्यायाधीशपद भूषविणारे पहिले बौद्ध व्यक्ती असून, त्यांचा कार्यकाळ सहा महिने आणि नऊ दिवसांचा असेल.

५१ वे सरन्यायाधीश संजीव खन्ना मंगळवारी सेवानिवृत्त झाले. ११ नोव्हेंबर २०२४ ते १३ मे २०२५ असा त्यांचा कार्यकाळ होता. सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायमूर्तींची सरन्यायाधीशपदासाठी शिफारस केली जाते. त्यानुसार १६ एप्रिल रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती भूषण गवईंच्या नावाची शिफारस केली. त्यावर २९ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्कामोर्तब करत न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली.



### नागरिकांच्या हक्कांची जपवणूक करतील – आई कमल गवई

» डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील प्रत्येक व्यक्ती केंद्रबिंदू राज्य घटनेची निर्मिती केली. भूषण गवई हे डॉ. आंबेडकर आणि वडील रा. सू. गवई यांच्या पावलावर पाऊल टाकत कोण मोठं, कोण लहान हे न पाहता लोकाभिमुख राहून न्याय देतील, नागरिकांच्या हक्कांची जपणूक करतील, हेच मी त्यांच्याकडून अपेक्षित ठेवते, अशी भावना भावी सरन्यायाधीश भूषण गवईंच्या आई कमलताई गवई यांनी व्यक्त केली.

न्या. गवई हे अनुसूचित जातीतून सरन्यायाधीशपदावर पोहोचणारे दुसरे न्यायमूर्ती ठरले आहेत. यापूर्वी न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन यांनी २००७ मध्ये सरन्यायाधीशपद भूषवले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या वडिलांची राजकीय पार्श्वभूमी असली, तरीही भविष्यात निवृत्तीनंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचे त्यांनी शपथ घेण्याअगोदरच स्पष्ट केले आहे. संविधान सर्वोच्च असल्याची टिपणीही त्यांनी अलीकडेच केली आहे. २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ते सरन्यायाधीश पदावर कार्यरत असतील.

**अमरावतीत जन्म, नागपुरात वकिली :** न्या. भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे जन्म झाला. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई आंबेडकरी चळवळीचे नेते होते. अमरावतीचे खासदार, **(पान २ वर)**

# भार्गवास्त्रची चाचणी यशस्वी!
## देशात विकसित होणार स्वदेशी काउंटर ड्रोन प्रणाली

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

भारताने आपल्या पहिल्या स्वदेशी विकसित सूक्ष्म क्षेपणास्त्र प्रणालीची यशस्वी चाचणी घेतली आहे. ही प्रणाली स्वार्म ड्रोनच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. भार्गवास्त्र नावाच्या बहुस्तरीय प्रति-ड्रोन प्रणालीची चाचणी १२ आणि १३ जानेवारी रोजी गोपालपूर सीवार्ड फायरिंग रेंज येथे घेण्यात आली. भारत-पाकिस्तान संघर्षावेळी भारताच्या एस४०० या एअर डिफेन्स सिस्टिमने आपली ताकद दाखवून दिली. आता अशाच पद्धतीची स्वदेशी काउंटर ड्रोन प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.

स्वदेशी प्रणालीचे भार्गवास्त्र हे अत्याधुनिक क्षमतांनी सुसज्ज आहे. यात ६ किलोमीटरहून अधिक अंतरावर येणारे अगदी लहान ड्रोन शोधण्याची क्षमता आहे. हे अचूकता आणि परिणामकारकता सुनिश्चित करून मार्गदर्शित सूक्ष्म-शस्त्रांचा वापर करून धोक्यांना निष्प्रभ करते. जलद तैनातीसाठी मोबाइल प्लॅटफॉर्मवर बसवता येणारी ही प्रणाली भारतीय सशस्त्र दलांच्या अद्वितीय परिचालन गरजा पूर्ण करण्यासाठी, उंचीच्या क्षेत्रासह विविध भूभागांमध्ये अखंडपणे काम करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.



» भार्गवास्त्रची अष्टपैलू क्षमता अधोरेखित करत म्हटले आहे की, ईईएलने परवडणाऱ्या किंमतीत शत्रूच्या यूएव्हीं विरुद्ध कठोर प्रहार करण्यासाठी बहुस्तरीय प्रति-ड्रोन प्रणाली भार्गवास्त्रसाठी सूक्ष्म क्षेपणास्त्राची स्वदेशी रचना आणि विकास केला आहे. सर्व यूएव्ही धोक्यांसाठी प्रणालीचा एक सर्वसमावेशक उपाय म्हणून उपयोग करवून घेण्यासाठी अतिरिक्त सॉफ्ट-किल थर एकत्रित केला जात आहे. नेटवर्क-केंद्रित युद्धासाठी ही प्रणाली सशस्त्र दलांच्या सध्याच्या नेटवर्कमध्येही समाविष्ट केली जाऊ शकते.

## थोडक्यात

### यूपीएससीच्या अध्यक्षपदी डॉ. अजय कुमार



**नवी दिल्ली :** माजी केंद्रीय सचिव डॉ. अजय कुमार यांची यूपीएससी म्हणजे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. माजी यूपीएससी अध्यक्ष प्रीती सुदान यांचा कार्यकाळ २९ एप्रिल रोजी संपला, त्यानंतर हे पद रिक्त होते. आता डॉ. अजय कुमार यांच्याकडे यूपीएससीच्या अध्यक्षपदाची धुरा देण्यात आली आहे. डॉ. अजय कुमार हे केरळ केडरचे १९८५ च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत. संरक्षण सचिव असताना डॉ. कुमार यांनी अनेक महत्त्वपूर्ण गोष्टींमध्ये सुधारणा घडवून आणली. यामध्ये संरक्षण प्रमुख (सीडीएस) ची स्थापना, अग्निपथ योजनेचा शुभारंभ, 'आत्मनिर्भर भारत' संरक्षण उपक्रम आणि आयुध कारखान्यांचे कॉर्पोरेटायझेशन यांचा समावेश आहे.

### शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही– शिंदे

**मुंबई :** शेतकऱ्यांना कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानी संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या असल्याची माहिती खुद्द शिंदे यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेसह विकासकामे आपण करत आहोत, असे शिंदे म्हणाले. प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही. आम्ही जे बोलतो, ते करतो. सरकारची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. सगळ्या योजना सुरू ठेवत असताना सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. सरकारला काटकसर करावी लागली. या बजेटमध्ये काही खात्यांना निधी कमी मिळाला.

# पाण्यासाठी पाकिस्तान रडकुंडीला; भारताला पाठवले पत्र!

**इस्लामाबाद, दि. १४ वृत्तसंस्था**

भारताच्या लष्करी कारवाईमुळे दबावाखाली आलेल्या पाकिस्तानने पुन्हा एकदा भारताकडे सिंधू पाणी वाटप करार पुन्हा सुरु करण्याची विनंती केली आहे. २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हा करार स्थगित केला होता. पाकिस्तानच्या जलसंपदा मंत्रालयाचे सचिव सय्यद अली मुर्तजा यांनी भारताच्या जल शक्ती मंत्रालयाच्या सचिवांना पत्र लिहून, भारताने घेतलेला निर्णय पुनर्विचारात करावा, अशी मागणी केली आहे. या पत्रात पाकिस्तान चर्चेसाठी तयार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. पाण्याविना पाकिस्तानातील शेती सुकण्याची भीती व्यक्त करण्यात आल्याचे समजते. त्यामुळेच आता पाकिस्तान भारताकडे पाण्यासाठी गयावया करत आहे. भारताने बगलिहार आणि सलाल धरणांतून पाणी रोखले आहे. २३ एप्रिल रोजी झालेल्या सुरक्षा समितीच्या बैठकीत भारत सरकारने सिंधू जलवाटप करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला. १९६० साली स्वाक्षरी झालेल्या या संधीनुसार भारताला सुमारे ३० टक्के आणि पाकिस्तानला उर्वरित ७० टक्के जलप्रवाह वापरण्याचा अधिकार देण्यात आला होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला देण्यात येणारे पुराचे इशारे देखील थांबवले आहेत.

# चीनने अरुणाचल प्रदेशातील अनेक भागांची बदलली नावे; भारताने खडसावले

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रीसंधीनंतर सीमा भागामध्ये सध्या शांततेचे वातावरण आहे. मात्र यादरम्यान पाकिस्तानला चीनचे समर्थन केले आहे. यानंतर आता चीनने देखील आपल्या कुरपती सुरुच ठेवल्या आहेत. चीनकडून एक नकाशा प्रसिद्ध करण्यात आला असून चीनने अरुणाचल प्रदेशवर आपला दावा सांगितला.तसेच येथील काही जागांची नावं बदलली आहेत. चीनच्या या कृतीनंतर भारताकडून तातडीने प्रत्युत्तर देण्यात आले आहे. नावं बदलली तरी वास्तव बदलणार नाही असं म्हणत चीनकडून अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावं बदलली जाताच, भारताने परराष्ट्र मंत्रालयाने खडसावले आहे.

अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याचा चीनने केलेला प्रयत्न व्यर्थ आणि हास्यास्पद आहे. आम्ही आमच्या तत्वनिष्ठ भूमिकेनुसार असे प्रयत्न धुडकावून लावतो. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग आहे. रचनात्मक नामकरणाचं पाऊल वास्तव मात्र बदलू शकणार नाही की अरुणाचल प्रदेश हा भारताता एक अविभाज्य भाग होता, आहे आणि कायमच राहील, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले. चीनमधील ग्लोबल टाईम्स या वृत्तपत्राच्या एक्स-अकाउंटवर भारतात बंदी घालण्यात आली आहे. ग्लोबल टाईम्सवर भारताविरुद्ध खोट्या बातम्या चालवल्याचा आरोप आहे. या कारणामुळे त्याच्या एक्स हँडलवर बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, चीनकडून सातत्याने अरुणालच प्रदेश हा दक्षिण तिबेटचा आणि पर्यायाने चीनचा भाग असल्याचा दावा केला जातो. मात्र, भारताने वेळोवेळी चीनच्या या दाव्याचे खंडन केले आहे. २०२४ मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशमधील जवळपास ३० ठिकाणांची नावं बदलत त्यांना चिनी ओळख देत याची यादीसुद्धा जाहीर केली होती.



# कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात वक्तव्य करणाऱ्या भाजप मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल

**भोपाळ, दि. १४ वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर मध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या व देशभरात कौतुकास प्राप्त ठरलेले कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात एका मध्यप्रदशेतातील भाजपच्या मंत्र्यांने वादग्रस्त वक्तव्य केले होते. याची गंभीर दखल घेत मध्ये प्रदेशातील जबलपूर न्यायालयाने संबधित मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

जबलपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सुमोटो दाखल करुन घेत हा आदेश दिला. भाजपाचे मध्यप्रदेश सरकारमधील भाजपाचे मंत्री विजय शहा यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. न्यायालयाने पुढे म्हटले की शहा यांची कुरेशी यांच्या विरोधातील **(पान २ वर)**

# शाळेपासून १ किमी परिसरात पान टपरी नको, सीसीटीव्ही लावा!
## महाराष्ट्र सरकारची शाळांसाठीची नवी नियमावली

**मुंबई, दि. १४ वृत्तसंस्था**

महाराष्ट्र सरकारने शाळांसाठी नवीन नियमावली जारी केली आहे. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, समुपदेशन सत्रांचे आयोजन करणे आणि कर्मचाऱ्यांची तपासणी करणे यासारख्या गोष्टी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर



शहरातील एका शाळेत दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाला होता. या पार्श्वभूमीवर शाळांमधील सुरक्षा वाढवण्यासाठी हे नवीन नियम बनवण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने १३ मे रोजी एक जीआर जारी केला आहे. या जीआरनुसार, शाळांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जपून ठेवावे लागणार आहे. याचाच अर्थ शाळांना सीसीटीव्हीचा एक महिन्यांचा बॅकअप असणं आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांविरुद्धचे गुन्हे पोलिसांना कळवणे आवश्यक आहे. राज्य सरकारच्या नव्या नियमावलीनुसार, शाळा प्रशासनाला आता कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करावी लागणार आहे आणि स्कूल बसच्या चालकांची नियमितपणे अल्कोहल टेस्ट **(पान २ वर)**

# क्रूरता शब्दाचा गैरवापर होतो : सर्वोच्च न्यायालय चिंतीत

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने हुंडाविरोधी कायद्याच्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त केली. वैवाहिक प्रकरणांमध्ये पत्नींकडून पतीच्या नातेवाईकांविरुद्ध, विशेषतः वृद्ध पालकांविरुद्ध हुंड्यासाठी छळ आणि क्रूरतेच्या तरतुदींचा गैरवापर होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करताना न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, क्रूरता या शब्दाचा गैरवापर होत आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या शिक्षेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ



(क्रूरता) आणि हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम ४ अंतर्गत आरोपांमधून निर्दोष मुक्त केले. या निकालात म्हटले आहे की, पतीने घटस्फोटाची याचिका दाखल केल्यानंतर जवळजवळ एक वर्षानंतर या प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आला होता, ज्यामुळे फौजदारी खटल्याच्या वेळेवर आणि हेतूवर प्रश्न उपस्थित होतात. विशिष्ट उदाहरणांशिवाय क्रूरता सहजपणे स्थापित करता येत नाही. विशिष्ट तारीख, वेळ किंवा घटनेचा उल्लेख न करता हे कलम जोडण्याची प्रवृत्ती सरकारी वकिलांच्या खटल्याला कमकुवत करते आणि तक्रारदाराच्या विश्वासार्हतेवर गंभीर शंका निर्माण करते. आम्हाला चिंता आहे की तक्रारदार पत्नींकडून भादंविच्या कलम ४९८अ आणि **(पान २ वर)**









## पान 1 वरून...

### महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई...

बिहार, सिक्कीम आणि केरळचे राज्यपाल असा त्यांचा कार्यकाळ राहिलेला आहे. वडील राजकारणात असल्याने न्यायमूर्ती गवईंना लहानपणापासूनच सामाजिक आणि राजकीय कार्याची पार्श्वभूमी आहे. वयाच्या पंचविशीत १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. मुंबई उच्च न्यायालयाचे माजी महाधिवक्ता आणि माजी न्यायाधीश राजा एस. भोसले यांच्यासोबत १९८७ पर्यंत काम केले. १९८७ ते १९९० पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली. १९९० नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात त्यांनी वकिली केली. नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील होते. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहायक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ रोजी न्यायमूर्ती गवई त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी नेमणूक करण्यात आली होती. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना अनेक ऐतिहासिक निकालांच्या खंडपीठात त्यांचा समावेश होता.

### शाळेपासून १ किमी परिसरात...

करावी लागणार आहे. मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन देणे आणि लहान मुलांना गुड टचआणि बॅड टच बद्दल माहिती देणे हे देखील या नियमांचा भाग आहे. बदलापूरच्या घटनेनंतर शाळा प्रशासन आणि पोलिसांनी वेळेवर कारवाई केली नाही, असा आरोप करण्यात आला होता. अक्षय शिंदे नावाच्या शाळेतील एका सफाई कर्मचाऱ्याला लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. नंतर, एका दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला तळोजा तुरुंगातून कल्याणला नेत असताना पोलीस व्हॅनमध्ये गोळ्या मारून त्याची हत्या करण्यात आली. जीआर नुसार, १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला अल्पवयीन मानले जाईल. शाळेत कोणताही गुन्हा घडल्यास, त्याची माहिती तातडीने जवळच्या पोलीस स्टेशनला किंवा स्पेशल जुवेनियल पोलीस युनीट म्हणजे विशेष बाल कल्याण पोलीस विभागला देणे बंधनकारक आहे.सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य आहे. कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जपून ठेवावे लागेल. नियमांचे पालन न केल्यास, सरकारी अनुदान रोखणे किंवा शाळेची मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा जीआर मध्ये देण्यात आला आहे. शाळा प्रशासनाने कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करावी. आवश्यक असल्यास, उमेदवारांकडून चारित्र्य प्रमाणपत्र मागवावे. शक्यतोवर, पूर्व-प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला शिक्षकांची नियुक्ती करावी, असे आदेशात म्हटले आहे. शाळेत बस असल्यास, चालकांची आणि इतर कर्मचाऱ्यांची नियमितपणे अल्कोहल टेस्ट करणे आवश्यक आहे. प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी असणे अनिवार्य आहे. शाळांनी १०९८ हा चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक दर्शनी भागात लावावा. तसेच, जर मुले शाळेत गैरहजर असतील, तर एसएमएसद्वारे पालकांना सूचना द्यावी. मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन सेवा पुरवणे आणि लहान मुलांना गुड टच आणि बॅड टच बद्दल माहिती देणे आवश्यक आहे.

### क्रूरता शब्दाचा गैरवापर होतो...

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम ३ आणि ४ अंतर्गत वृद्ध पालक, दूरचे नातेवाईक आणि स्वतंत्रपणे राहणाऱ्या विवाहित बहिणींना दुर्भावनापूर्णपणे आरोपी बनवले जात आहे. पतीच्या प्रत्येक नातेवाईकाला समाविष्ट करण्याची वाढती प्रवृत्ती पत्नी किंवा तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या दाव्यांवर गंभीर शंका निर्माण करते आणि कायद्याच्या उद्देशाला पराभूत करते. खंडपीठाने म्हटले की या प्रकरणात पत्नीकडून क्रूरता आणि हुंड्यासाठी छळाचे करण्यात आलेले आरोप अस्पष्ट आहेत, आरोपांच्या समर्थनार्थ विशिष्ट तपशील आणि पुरावे नाहीत. कथित शारीरिक हल्ल्यामुळे गर्भपात झाल्याच्या दाव्याला समर्थन देण्यासाठी वैद्यकीय नोंदी देखील सादर करण्यात आल्या नाहीत. आम्ही फौजदारी तक्रारीतील गहाळ तपशीलांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. आम्हाला माहिती आहे की अपीलकर्त्याचे लग्न आधीच रद्द झाले आहे. घटस्फोटाचा आदेश अंतिम टप्प्यात आहे, त्यामुळे अपीलकर्त्याविरुद्ध पुढील खटला चालवणे हे केवळ कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर ठरेल. आरोप स्पष्ट असले पाहिजेत.

### कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात...

टिप्पणीला अपमानास्पद आणि सांप्रदायिक स्वरूपाची आहे. ज्यामुळे सर्वत्र तीव्र संताप आणि राजकीय प्रतिक्रियेला उमटत आहेत. यामुळे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे. शहा यांच्या वादग्रस्त टिपणीनंतर काँग्रेसने भाजपावर टिकेची झोड उठवली आहे. त्यांनी शहा यांच्या प्रतिक्रयेचा एक व्हिडीओ सुद्धा व्हायरल केला आहे. 'जिन्होने हमारी बेटीयोंके सिंदूर उजाडे है, हमने उनकी बहण भेज कर के उनकी ऐसी की तैसी करवाई है' अशा पद्धतीचे वादग्रस्त विधान करताना विजय शहा या व्हिडीओत दिसत आहेत. कॉंगेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी तिव्र शब्दात निषेध व्यक्त करताना म्हटले की 'अंत्यत अपमानजनक, लज्जास्पद व अश्लाघ्य भाषा' ही कर्नल कुरेशी यांच्याबाबतीत वापरली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला करुन दहशतवाद्यांचे मनसुबे हा भारतात विभाजन करण्याचा होता पण ऑपरेशन सिंदूर ने तो उधळला असेही त्यांनी पुढे म्हटले आहे.

तसेच ते खर्गे पुढे म्हणाले की भाजप व आरएसएसची मानसिकताच स्त्रियांच्या विरोधातील आहे. पहिल्यांदा त्यांनी पहलगाममध्ये शहीद झालेल्या नौदल अधिकाऱ्याच्या पत्नीचा सोशल मीडियावर अपमान केला, नंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्या मुलीला सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्रास दिला, आणि आता भाजपचे मंत्री कर्नल सोफिया कुरेशीबद्दल अश्लील आणि अयोग्य वक्तव्य करत आहेत. अशां मंत्र्यांना पंतप्रधान मोदींनी तात्काळ बडतर्फ केले पाहिजे. अशी मागणीही त्यांनी केली.

# बसस्थानक परिसरातील महिलेस लुटणारे दोन्ही आरोपी जेरबंद!

## १२ तासांत चोरी उघड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि.१४:** शहरातील नवीन बसस्थानक परिसरात घडलेल्या सशस्त्र चोरीच्या प्रकरणात सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या १२ तासांत मोठे यश मिळवले आहे. बसची वाट पाहत असलेल्या महिलेस जबरदस्तीने गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढणाऱ्या दोघा आरोपींना पोलिसांनी अटक करून तब्बल १.३० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

१२ मे रोजी गिरडा (ता. मानोरा, जि. वाशिम) येथील प्रिया धम्मपाल डोंगरे (३३) या आपल्या कुटुंबासोबत मूळ गावी जाण्यासाठी नवीन बसस्थानकात थांबल्या होत्या. बसच्या खिडकीजवळ बसलेल्या असताना अचानक एका अज्ञात युवकाने त्यांच्या गळ्यातील ३ ग्रॅम वजनाचे, सुमारे १५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले आणि मोटरसायकलवरून पसार झाला. याप्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शोध पथकातील पोलीस हवालदार सुरेश लांडे, किशोर सोनोने, संतोष गावंडे, तसेच पोलीस अंमलदार भुषण मोरे, अक्षय तायडे, उमेश यादव, मंगेश चुन्नीवाले व राहुल इंगळे यांनी या प्रकरणात मोलाची भूमिका बजावली.या वेगवान तपासामुळे अकोला पोलीस दलाचे जनतेत पुन्हा एकदा विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली आहे.

आरोपींच्या ताब्यातून चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि दोन चोरीचे मोबाईल फोन असा एकूण १ लक्ष ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहेघटनेनंतर पोलीस निरीक्षक जयवंत सातव यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक सक्रिय करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी १२ तासांतच विनायक महेंद्र येंनेवार (२३), अष्टविनायक कॉलनी, खडकी, आणि सागर शिवदास मुरधुंगे (३५) पंचशील नगर, वाशिम बायपास यांना अटक केली.

# अकोल्यात पाच सराफा दुकानांवर छापा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.१४:** अकोला शहरातील सोन्या-चांदीच्या व्यवसायात खळबळ उडवणारी घटना आज बुधवार, १४ एप्रिल रोजी सकाळी घडली. रतनलाल प्लॉट येथील नेकलेस रोडवरील एकता ज्वेलर्स आणि गांधी रोडवरील ईशा ज्वेलर्स व्यतिरिक्त पाच नामांकित सराफा दुकानांवर सकाळी सात वाजताच्या सुमारास छापा टाकण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, ही कारवाई आयकर विभागाने केल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, या वृत्ताला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे ही छापामार कारवाई जीएसटी विभागाच्या वतीनेदेखील असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सोन्या-चांदीच्या वाढत्या किमती, ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात होत असलेली विक्री आणि कर चुकवण्याचे संभाव्य प्रकार यामुळे संबंधित यंत्रणांनी ही कारवाई केल्याचे बोलले जात आहे. सध्या या दोन्ही दुकानांमध्ये अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांची बारकाईने तपासणी सुरू आहे. व्यापाऱ्यांमध्ये आणि परिसरात या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# आर.डी.जी. हायस्कूलचा उज्वल निकाल: ऋषिकेश देशमुख प्रथम, यशाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.१४:** भारतीय सेवासदन संचालित श्रीमती राधादेवी गोयनका विद्यामंदिर हायस्कूल (आर.डी.जी) ने २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेत उत्तम निकाल नोंदवून आपल्या यशाची परंपरा यंदाही अखंड राखली आहे. कॉपीमुक्त अभियान राबवूनही शाळेचा १००% निकाल लागला असून, ही गुणवत्ता आधारित यशाची ठळक नोंद ठरली आहे.

शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये ऋषिकेश देशमुख याने प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या नावाला गौरव मिळवून दिला. त्याच्यापाठोपाठ अथर्व वाकोडे द्वितीय तर साहील म्हैसकर तृतीय क्रमांकावर राहिला. या तीनही विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, सातत्य व शाळेच्या मार्गदर्शनामुळे हे घवघवीत यश संपादन केले. शाळेचे संस्थाध्यक्ष दिलीपराज गोयनका, शाळा समितीचे अध्यक्ष आलोक गोयनका, तसेच मुख्याध्यापिका सौ. मंजूषा माळी व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि त्यांच्या यशात हातभार लावलेल्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

आर.डी.जी. हायस्कूल ही अकोल्यातील एक नामांकित शैक्षणिक संस्था असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, संस्कार व मूल्यनिष्ठा यांच्या आधारावर विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य इथे सातत्याने चालते. यंदाचा निकाल हा केवळ गुणांचा नव्हे, तर स्वच्छ आणि पारदर्शक शिक्षणप्रणालीचा देखील एक आदर्श नमुना ठरतो.यशस्वी विद्यार्थ्यांसोबतच संपूर्ण शाळेचे व शिक्षकांचे हे सामूहिक यश असून, संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# अल- साबीर पटेल ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मोहाळा दहावीचा निकाल १०० टक्के

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मोहाळा, दि.१४:** महाराष्ट्र राज्य शिक्षक मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये स्थानिक शाळा अल- साबीर पटेल ऊर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मोहाळा च्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची परंपरा कायम शाळेचा निकाल १०० टक्के लावला आहे. त्यापैकी मिसबाह फिरदौस तनवीरउल्लाह खान पटेल ९४.२०%, इकरा फिरदौस मसूद खान ९१.२०%, हुमेरा फिरदौस फारूक अहमद ९०.००% गुण प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन. असे प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# केंद्राची आंतरजातीय विवाह योजना बंद

**नागपूर, दि.१४** वृत्तसंस्था

जातीय भेदभाव कमी करून सर्व धर्मांत समानता यावी, या दृष्टिकोनातून सुरू करण्यात आलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकात्मिक आंतरजातीय विवाह योजना अचानक बंद करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने २०१४-१५ पासून ही योजना सुरू होती. परंतु, कुठलेही कारण न देता ही योजना बंद करण्यात आली.

# कार - दुचाकीच्या अपघातात तीन जण जखमी

## सामाजिक कार्यकर्ते रवि राठी यांनी जोपासली माणूसकी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कुरणखेड , दि.१४:** अकोला ते पातुर नानासाहेब महामार्गावर म्हैसपुर नजीक कार व दुचाकीच्या अपघातात दुचाकीवरील तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि १३ ) रोजी दुपारच्या सुमारास घडली सुदैवाने मोठी प्राणहानी टळली , गंभीर जखमींना उपचारासाठी दाखल करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते रवि राठी यांनी तातडीने मदत करून माणूसकी जोपासली. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विजय भोपळे, ऋषाली भोपळे, चिमुकला पुरव भोपळे राहणार बार्शीटाकळी हे पातुर नानासाहेब येथुन अकोला साठी दुचाकीवरून जात असताना म्हैसपुर नजीक कार क्रमांक एम एच ३० बी सी १०४२ व दुचाकी या दोन वाहनांचा अपघात झाला अपघातात दुचाकीस्वार विजय भोपळे सह तिघेही गंभीर जखमी झाले, दरम्यान एका कार्यक्रमातुन सामाजिक कार्यकर्ते रवि राठी,विर भगतसिंग पथकाचे योगेश विजयकर यांनी तातडीने जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# जागतिक परिचर्या दिनानिमित्त फ्लॉरेन्स नाईटींनगेल सेवा पुरस्काराने जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि.१४:** जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचा फ्लॉरेन्स नाईट गेल सेवा पुरस्कार देऊन जागतिक परिचर्या दिनी आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला र.नं. ३८ ८१ यांच्यावतीने जागतिक परिचर्या दिन सोहळा व जागतिक परिचर्या दिनानिमित्त बुद्ध पौर्णिमा निमित्त बुद्ध वंदनाची गाथा तसेच पदोन्नती प्राप्त जिल्हा परिषद आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आला होता.

जागतिक परिचर्या दिनाचे औचित्य साधून अकोल्या जिल्ह्यातील नुकतेच झालेल्या पदोन्नती प्राप्त आरोग्य कर्मचाऱ्यांचा तसेच स्वास्थ अभ्यंगता,आरोग्य सेवक,आरोग्य सहाय्यक आरोग्य सेविका, आणि आरोग्य विस्तार अधिकारी यांचा सत्कार सोहळा जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्शीटाकळी तालुका आरोग्य अधिकारी रवींद्र आर्य कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अशोक जयसिंगपुरे, सुनील तायडे मंत्रालयीन संघटना उपाध्यक्ष प्रामुख्याने उपस्थित होते. तर मंचकावर जिल्हाध्यक्ष संगीता जाधव, सरचिटणीस संजय डाबेराव, कास्ट्राईब संघटना उपाध्यक्ष पांडुरंग तेलगोटे, देवानंद ताजणे आरोग्य सहाय्यक संघटना जिल्हाध्यक्ष, शुभांगी बारबदे, मंगलाताई तितुर, रामरतन मेटांगे, रितेश वानखडे,उपस्थित होते , यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून बुद्ध वंदेनेची गाथा सोहळा पार पडला, सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार सुद्धा घेण्यात आला,अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागात जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील उपकेंद्रावर प्राथमिक आरोग्य केंद्रावर काम करणाऱ्या आरोग्य सेविका व स्वास्थ आभ्यांगता, व कर्मचाऱ्यांना कर्मचाऱ्यांना फ्लॉ रेन्स नाईंटीन गेल सेवा पुरस्कार व सन्मान पत्र देऊन १२/५/२५रोजी त्यांना जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे सन्मानित करण्यात आले. आहे.तसेच यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाचे संचालन विभाताई पाथरकर, तर आभार प्रदर्शन रूपाली तुपोने यांनी केले.

# साने गुरुजी विद्यालयातून अर्णव मेंढे प्रथम

## विद्यालयाचा निकाल ९८ टक्के ; यशाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.१४:**मलकापुर परिसरातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि. अर्णव संतोष मेंढे याने दहावीच्या परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच साने गुरुजी विद्यालयाचा निकाल ९८ टक्के लागला असून निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. गौरक्षण रोड व मलकापूर खडकी परिसरातील या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीही उत्तुंग कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल केले.



शाळेतील चि. अर्णव संतोष मेंढे याने ९१ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. कु. भाग्यश्री जाधव हिने ८८ टक्क्यांसह द्वितीय स्थान मिळवले, तर चि. संकेत सावळे याने ८१ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या १५ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. या उल्लेखनीय यशासाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीप अंधारे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतूक केले. त्यांनी पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देताना, शाळेतील मुख्याध्यापिका व शिक्षकवृंदांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभल्याचे गौरवोद्गार काढले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्या समन्वयातून हा यशस्वी निकाल साध्य झाल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# इस्त्रायलचा गाझापट्टीवर भीषण हवाई हल्ला; ६० पेक्षा अधिक नागरिक मृत

**इस्त्रायल, दि. १४** वृत्तसंस्था

गाझा पट्टी पुन्हा एकदा रणभूमी झाली आहे. इस्त्रायलने शनिवारी गाझा पट्टीवर जोरदार हवाई हल्ले केले, ज्यात किमान ६० नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये २२ लहान मुलांचाही समावेश आहे. जबालिया भागात झालेल्या हल्ल्यात इंडोनेशियन स्त्रोतांनी दिलेल्या माहितीनुसार मोठ्या प्रमाणात हानी झाली असून अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत.

या हल्ल्याआधी शुक्रवारी रात्री इस्त्रायली हवाई दलाने संयुक्त राष्ट्रांच्या अन्नसाठा असलेल्या इमारतीवरही हल्ला केला होता. गाझामधील मदतीच्या हालचालींवर इस्त्रायलने कडक नाकेबंदी लागू केल्यामुळे हजारो नागरिक अन्न-पाण्याविना अडचणीत आले आहेत. अनेक मदत केंद्रे बंद करण्यात आली असून परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे. इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी यासंदर्भात स्पष्टपणे सांगितले की, गाझामधील युद्ध थांबवण्याचा विचारही करता येणार नाही. त्यांच्या या वक्तव्यानंतर इस्त्रायल-हमास यांच्यातील शस्त्रसंधीची शक्यता धूसर झाली आहे. दरम्यान, इस्त्रायली लष्कराने या हल्ल्यांवर अधिकृत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. युद्धाच्या या पार्श्वभूमीवर संपूर्ण जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा तिहेरी संघर्षाच्या छायेत जग पुन्हा एका मोठ्या संघर्षाच्या उंबरठ्यावर उभं आहे. मानवाधिकार संघटनांनी इस्त्रायलच्या कारवायांवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. गाझाला अन्न व औषधांच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे ही उपासमारीची शस्त्रनीती असल्याचं सांगत या कृतीला युद्ध गुन्हा घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# इंग्लिश हायस्कूलची १००टक्के निकालाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि.१४:** स्थानिक गायत्रीनगर स्थित इंग्लिश हायस्कूल शाळेचा याही वर्षी दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी मागील १८वर्षे पासून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील ३४ विद्यार्थ्यांमधून २० विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले असून १० विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. ९६.६० टक्के गुण मिळवून कु.मैथिली भेंडे ही प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली तर कु.प्राप्ती वानखेडे ९४.६० टक्के गुण घेऊन द्वितीय आली. कु.गौरी डाबेराव हिने ९३.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.कु.नंदिनी पांडे ९३.४० टक्के गुण घेऊन तर कु. कृष्णाली अर्बट व जान्हवी दांदळे यांनी ९२.६० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेत. कु. गुंजन गुप्ता ९२.२० टक्के, कु. धनश्री पुरी ९१.४०टक्के , कु. श्रेया रहाणे ९०.४०टक्के, कु.प्रतीक्षा पांडे ९० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेत. संस्थाध्यक्ष दादासाहेब बोबडे, कोषाध्यक्ष अजय बोबडे, इंग्लिश हायस्कूल चे मुख्याध्यापक राजकुमार तडस, ज्ञानज्योती प्रायमरी स्कूल च्या मुख्याध्यापिका उत्कंठा बोबडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे शिक्षक नरेश हल्लागडे, बहादुरसिंह चौहान, दीपिका आडे, सचिन खर्चे, संतोष पुरी, राजेश्वरी पांडे, प्रणिता पवार, किरण खोडस्कर, अनंता नागे तसेच ज्ञानज्योती प्रा.स्कूल चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# अकोट शहरात बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट , दि. १४ :** तालुका व शहरामध्ये बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक बुद्ध विहारांमध्ये सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. सामूहिक प्रार्थनेचा कार्यक्रम आटोपल्यानंतर काही बौद्ध विहारांवर भोजनदान व खीर दानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे अकोट शहरामधून दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा सायंकाळी शांततेने कॅन्डल मार्च चे आयोजन करण्यात आले होते. कॅन्डल मार्चमध्ये अकोट शहरातील सर्व बौद्ध उपासक व उपासीकांनी भाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात खानापूर वेस येथून करण्यात आली. शहरातून मुख्य मार्गाने कालंका चौक, यात्रा चौक,सोनू चौक,जयस्तंभ चौक, सोनू चौक, शिवाजी महाराज चौक, बस स्टॅन्ड रोड आणि रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ सामूहिक त्रिसरण पंचशील घेऊन रॅलीचा समारोप करण्यात आला. कॅन्डल मार्चमध्ये शहरातील सर्व बौद्ध पंच मंडळांनी सहभाग घेतला होता. रॅली दरम्यान कुठेही गालबोट लागू नये म्हणून अकोट शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनामध्ये पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.बुद्ध जयंती बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव आहे. बौद्ध धर्मीयांची मोठ्या प्रमाणावर संख्या असणाऱ्या चीन, जपान, व्हियेतनाम, थायलंड, भारत, म्यानमार, श्रीलंका, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, मलेशिया, नेपाळ, इंडोनेशिया या देशांसह सुमारे १८० देशांतील बौद्ध लोक हा सण उत्साहात साजरा करतात. बुद्ध जयंतीच्या दिवशी बौद्ध अनुयायी घरांमध्ये दिवे लावतात... घरे फुलांनी सजवतात. बौद्ध परंपरेतील धार्मिक ग्रंथांचे वाचन, पठण केले जाते. विहारातील तसेच घरातील बुद्धांच्या मूर्तीची फुले वाहून, दिवे ओवाळून पूजा केली जाते. बोधिवृक्षाचीही पूजा केली जाते आणि त्याच्या फांद्यांना पताकांनी सुशोभित केले जाते. वृक्षाच्या आसपास दिवे लावले जातात. झाडाच्या मुळाशी दूध आणि सुगंधी पाणी घातले जाते.

## थोडक्यात

### सरकारने नैतिक अधिकार गमावला: काँग्रेसची केंद्रावर टीका



**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानदरम्यान आपण मध्यस्थी केली असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्यानंतर केंद्र सरकारने ''सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे,'' अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी मंगळवारी केली. तर ट्रम्प यांच्या दाव्यामुळे पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची आणि संसदेचे विशेष अधिवेशन घेण्याची काँग्रेसची मागणी अधिकच गरजेची ठरत असल्याचे पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी 'एक्स'वर लिहिले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्द्यावर स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी गेहलोत यांनी पक्षाच्या मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. गेहलोत म्हणाले की, देशातील जनतेला खात्री होती की, ''भारतीय सैन्यदले उत्तम कामगिरी करत आहेत आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतील, जेणेकरून तो देश भविष्यात पुन्हा त्यांच्या भूभागावर दहशतवादी तयार करणार नाही. लष्करी कारवाई अचानक थांबवण्यात आल्यामुळे जनतेमध्ये उमटलेल्या भावनेमुळे भाजपमध्ये गोंधळ आहे. त्यामुळे त्यांनी जनतेला शांत करण्यासाठी देशव्यापी तिरंगा यात्रेचा निर्णय घेतला आहे.

### 'ऑपरेशन सिंदूर'नंतर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या सुरक्षेत मोठी वाढ



**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमधील तणाव लक्षात घेता, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने त्यांची सुरक्षा वाढवली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्याला बुलेटप्रूफ कार देण्यात आली आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने त्यांच्या सुरक्षेत बुलेटप्रूफ कार जोडली आहे. त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानीही सुरक्षा वाढवण्यात आली आहे. जयशंकर यांना आधीच झेड-श्रेणीची सुरक्षा आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांची सुरक्षा -श्रेणीवरून -श्रेणीमध्ये अपग्रेड करण्यात आली. या सुरक्षेसाठी सीआरपीएफ कमांडो तैनात आहेत. केंद्रीय मंत्र्यांच्या सुरक्षेसाठी ३३ कमांडो नेहमीच तैनात असतात. अलिकडच्या काळात भारत आणि पाकिस्तानमधील सीमेवर तणाव वाढला असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. एवढेच नाही तर, पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर सुरू केले, ज्यामध्ये पाकिस्तान आणि पीओके दहशतवादी छावण्यांना लक्ष्य केले गेले.

### मायक्रोसॉफ्टमध्ये दुसरी मोठी नोकरकपात; तब्बल ६ हजार जणांना नारळ




**वॉशिंग्टन :** मायक्रोसॉफ्ट कंपनीने दुसरी मोठी नोकरकपात जाहीर केली आहे. जागतिक स्तरावरील कर्मचाऱ्यांपैकी ३ टक्के कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केले जाईल. याचा परिणाम सर्व स्तरावरील टीममधील हजारो कर्मचाऱ्यांवर जाणवेल. या नोकरकपातीच्या या फेरीत सुमारे ६ हजार कर्मचारी असतील, असे मायक्रोसॉफ्टने म्हटले आहे. मायक्रोसॉफ्टमध्ये एकूण २ लाख २८ हजार कर्मचारी काम करतात. दरम्यान, व्यवस्थापन स्तर कमी करणे आणि कामकाज सुलभ करण्याच्या उद्देशाने ही नोकरकपात केली जात असल्याचे सांगण्यात आले आहे.''गतिमान बाजारात कंपनीला यशस्वी करण्यासाठी गरजेच्या असलेल्या संघटनात्मक बदलाची आम्ही कार्यवाही करत आहोत,'' असे मायक्रोसॉफ्टच्या प्रवक्त्याने सीएनबीसी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले.ही नोकरकपातीचा विशेषतः मध्यम व्यवस्थापन पदावरील कर्मचाऱ्यांवर परिणाम होऊ शकतो. बिझनेस इनसाइडरने याआधी दिलेल्या वृत्तानुसार, मायक्रोसॉफ्ट कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित यंत्रणेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असून त्यांचा अभियांत्रिकी प्रतिभेला प्राधान्य देण्याचे उद्देश आहे.बिझनेस इनसाइडरने सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, कामावरुन कमी करण्यात आलेले कर्मचारी ६० दिवसांपर्यंत पेरोलवर राहतील.

# पाकिस्तानच्या राजकारणात वाहणार बदलाचे वारे

## तुरुंगातूनही इम्रान खानने खेळली तिरपी चाल

नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान तुरुंगात असले तरी त्यांनी केलेल्या दोन हालचालींमुळे देशाच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. एका बाजूला त्यांनी भारताचे नाव घेत पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडले, तर दुसऱ्या बाजूला त्यांनी लंडनस्थित आपल्या दोन मुलांना आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्यासाठी सक्रिय केले. या दोन्ही डावपेचांमुळे शाहबाज शरीफ सरकार आणि लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्यावर मोठा दबाव निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाकिस्तानी दैनिक 'एक्सप्रेस ट्रिब्यून' च्या वृत्तानुसार, इम्रान खान यांनी आदियाला तुरुंगातून दोन महत्त्वाचे संदेश पाठवले आहेत. पहिला संदेश लंडनमधील त्यांच्या मुलांना, तर दुसरा पाकिस्तानमधील पत्रकारांना, जे इम्रानच्या बाजूने लेखन करतात.

इम्रान खान यांनी पहिल्या संदेशात पाकिस्तान सरकारवर मानसिक लढाईत अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या मते, युद्धस्थितीत ६० टक्के लढाई मानसिक पातळीवर लढली जाते, आणि भारत यामध्ये अग्रेसर आहे. त्यांनी म्हटले की, ''भारत पुन्हा हल्ला करण्याच्या तयारीत आहे, आणि तरीही



पाकिस्तान सरकार युद्धबंदीचा आनंद साजरा करत आहे.'' ते पुढे म्हणाले की, ''सरकार जनतेच्या हितासाठी नाही, त्यामुळे जनतेने आता रस्त्यावर उतरून या सरकारविरोधात उठाव करावा.'' या विधानातून इम्रानने एकप्रकारे सत्ताधाऱ्यांविरुद्ध जनआंदोलनाची हाक दिली आहे.दुसऱ्या संदेशात, इम्रान खान यांनी लंडनमध्ये असलेल्या आपल्या दोन्ही मुलांना त्यांच्या सुटकेसाठी जागतिक पातळीवर आवाज उठवण्यास सांगितले. या संदेशानंतर दोघेही मुलगे सक्रिय झाले असून त्यांनी विदेशी मीडियाला मुलाखती देऊन पाकिस्तानमधील लोकशाहीची स्थिती उजेडात आणली आहे.त्यांनी मुलाखतीत सांगितले, ''पाकिस्तानमध्ये सध्या खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात नाही. आमचे वडील अन्यायकारकपणे तुरुंगात आहेत. आम्ही जगभरातील लोकशाहीवादी देशांकडून मदतीची मागणी करत आहोत.'' त्यांनी हेही स्पष्ट केले की, ''पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर उघड करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. ही दीर्घकालीन लढाई असेल.''इम्रान खान तुरुंगात गेले असले तरी, त्यांच्या लोकप्रियतेत कोणतीही घट झाली नाही. खैबर पख्तूनख्वा, सिंध आणि गिलगिट-बाल्टिस्तान या भागांमध्ये त्यांच्या पक्षाचा प्रभाव आजही तितकाच आहे. विश्लेषकांचे म्हणणे आहे की, ''इम्रान खान यांची कारागृहातूनही जनतेवर पकड आहे'', आणि हेच त्यांचे मुख्य राजकीय भांडवल आहे.

## पाकिस्तानने २० दिवसांनी बीएसएफ जवानाला भारताच्या केले स्वाधीन

नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था

२३ एप्रिलपासून पाकिस्तान रेंजर्सच्या ताब्यात असलेले बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉ यांना बुधवारी सकाळी भारतीय अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. अमृतसरमधील अटारी येथील संयुक्त चेकपोस्टवर हे हस्तांतरण झाले, अशी माहिती बीएसएफने दिली. सुरक्षा अधिकाऱ्यांकडून शॉ याची सविस्तर माहिती घेतली जात आहे. एका अधिकृत निवेदनात बीएसएफने म्हटले आहे की, ''आज सकाळी १०:३० वाजता, कॉन्स्टेबल पूर्णम कुमार शॉ यांना




बीएसएफने अटारी-वाघा सीमेवर पाकिस्तानकडून परत घेतले. कॉन्स्टेबल पूर्णम कुमार शॉ २३ एप्रिलला रात्री फिरोजपूर सेक्टरच्या परिसरात ऑपरेशनल ड्युटीवर असताना चुकून पाकिस्तानी हद्दीत गेल्याने त्याला पाक रेंजर्सनी ताब्यात घेतले होते.'' ही प्रक्रिया शांततेत आणि नियमानुसार पार पडली, असे बीएसएफने म्हटले आहे. शॉ हे १८२ व्या बटालियनचे बीएसएफ जवान आहेत.

## अमेरिका आणि सौदी अरेबियात मोठा संरक्षण करार

### १४२ अब्ज डॉलर्सची ही शस्त्रास्त्र खरेदी करणार

वॉशिंग्टन, दि.१४ वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या मध्य पूर्व देशांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांनी पहिली भेट सौदी अरेबियाला दिली. दौऱ्यादरम्यान ट्रम्प यांनी सौदीचे क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांची रियाधमध्ये भेट घेतली. या दौऱ्यात अमेरिका आणि सौदी अरेबियामध्ये मोठा करारा करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौदीसोबत अमेरिकेने १४२ अब्ज किमतीच्या संरक्षण करारावर स्वाक्षरी केली आहे. सौदी अरेबियाची ही आतापर्यंतची सर्वात मोटी डील मानली जात आहे. व्हाईट हाऊसने या कराराला अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा करारा म्हटले आहे. व्हाईट



हाऊने दिलेल्या माहितीनुसार, या करारांतर्गत सौदी अरेबियाला -१३० वाहतूक विमाने, क्षेपणास्त्रे, रडार प्रणाली आणि अनेक अत्याझुनिक शस्त्रे अमेरिकेकडून दिली जाणार आहेत. अमेरिकेच्या लॉकहीड मार्टिन, बोईंद आणि नॉथ्रॉप ग्रमुन यांसारख्या अमेरिकन कंपन्यांनकडून सौदी अरेबियाला शस्त्र पुरवठा केला जाणार आहे.
पूर्ण

ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर हा त्यांच्या पहिला अधिकृत विदेश दौरा आहे. यामध्ये त्यांनी पहिली भेट सौदीला दिली असून यानंतर ते यूएई आणि कतारला भेट देणार आहेत.दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांच्या आखाती देशांच्या दौऱ्याला अधिक महत्त्वपूर्ण मानले जात आहे. आखाती देशांमधून अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत मोठी गुंतवणूक व्हावी या उद्देशाने ट्रम्प यांचा हा दौरा आहे. यामुळे अमेरिकेला आर्थिक स्थिरता प्राप्त होईल.
सौदीकडून शस्त्रास्त्र कराराला मंजुरी मिळाल्यानंतर, यूएस डिफेन्स कोऑपरेशन एजन्सीने सांगितले की, शस्त्रास्त्रांची विक्री मित्र देशांच्या संरक्षणाला बळकट देणारी आहे. यामुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा उद्दिष्टांना पाठिंबा मिळे. तसेच आखाती प्रदेशांमध्ये राजकीय स्थिरता आणि आर्थिक प्रगती होईल. अमेरिका आणि सौदी अरेबियातील हा सर्वात मोठा करार आहे.
सौदी अरेबियाने अमेरिकेत सुमारे ६०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक १ ट्रिलियनपर्यंत वाढवण्याची इच्छा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. अमेरिका सौदी अरेबियाला काही काळात ३.३ अब्ज डॉलर्सच्या किमीतीची अत्यादुनिक लढाऊ विमाने पुरवणार आहे. सौदी अरेबियाला दिल्या जाणाऱ्या शस्त्रांमद्ये १००० -१२०-८ या प्रगत प्रणालीची लढाऊ विमाने आहेत.

## पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या चीनला जोरदार दणका; भारताने केली डिजिटल स्ट्राईक

बिजिंग, दि.१४ वृत्तसंस्था

भारताने आपल्या एका शत्रू देशाला म्हणजेच पाकिस्तानला धडा शिकवला असून आता चीनवरही मोठी कारवाई केली आहे. भारत सरकराने चीनचे ग्लोबल टाईम्स ब्लॉक केले आहे. भारत सरकारने सोशल मीडियावरील चीनचे ग्लोबल टाईम्स अकाउंट बंद केले आहे. यामागचे कारण म्हणजे, ग्लोबल टाईम्सने भारताविरुद्ध खोट्या बातम्या पसरवण्याचा प्रयत्न केला. यामुळे ड्रॅगनविरोधात ही कारवाई करण्यात आली आहे.
ग्लोबल टाईम्स हे चीनचे मुखपत्र आहे. हे मुखपत्र चीनचे अध्यक्ष शी जिपिंग यांच्या अजेंडानुसार कार्य करत. ग्लोबल टाईम्सने भारताविरोधात खोट्या बातम्या पसरवल्या असे सांगण्यात येत आहे. ग्लोबल टाईम्सवरील कारवाईपूर्वी भारताने अरुणाचल प्रदेशाबद्दल चीनच्या दुष्ट हेतूही स्पष्ट केला. तसेच



भारताने चीनचे एक्स न्यूज चे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील अकाऊंट देखील भारतामध्ये बॅन केले आहे.
अरुणाचल प्रदेशातील काही ठिकाणांची नावे बदलण्याचा चीनने प्रयत्न केला, परंतु भारताने याला स्पष्टपणे नकार दिला आहे. भारताने स्पष्ट शब्दात सांगितले की, चीनचा हा प्रयत्न हास्यास्पद भाग आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग होता , आहे आणि राहिल हे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. चीनने अरुणाचल प्रदेशातील काही ठिकाणांची नावे जाहीर केली होती. यावर भारताने टिका केली आहे. तसेच चीनने अरुणाचल प्रदेश दक्षिण तिबेटचा भाग आहे. दरम्यान भारताच्या परराष्ट्र मंत्रीलयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी चीनच्या या दाव्याला प्रत्युत्तर दिले आहे. जयस्वाल यांनी म्हटले की, चीनने भारतातील अरुणाचल प्रदेशांतील ठिकाणांची नावे बदलण्याचा व्यर्थ आणि हास्यास्पद प्रयत्न केला आहे. भारत सरकार चीनच्या या निर्णयाला स्पष्ट नकार देते. तसेच अरुणाचल प्रदेश हा भारताचाच भाग होता, आहे आणि राहिले असेल जयस्वाल यांनी स्पष्ट शब्दात ठणकावून सांगितले आहे. पाकिस्तानसोबतच्या तणावादरम्यान चीनने पाकिस्तानला पाठिंबा दर्शवला होता. चीनने म्हटले होते की, पाकिस्तानच्या सार्वभौमत्वासाठी, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य जपण्यासाठी पाकिस्तानसोबत आहे. तसेच चीनने भारताच्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईला खेदजनक म्हणून देखील संबोधले होते.

## अनिता आनंद कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री

ओटावा, दि.१४ वृत्तसंस्था

कॅनडा मध्ये एक नवा इतिहास रचला गेला आहे. देशातील ओकविल ईस्टच्या खासदार अनिता आनंद यांना कॅनडाच्या नव्या परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. पहिल्यांदाच एका हिंदू वंशाच्या महिलेला इतकं प्रतिष्ठित पद कॅनडामध्ये मिळालं आहे. १३ मे च्या दिवशी भगवद्गीतेवर हात ठेवून त्यांनी कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्यासह मणिंदर सिंधू, रुबी सहोता आणि रणदीप सराय हे सगळेही सरकारमध्ये महत्त्वाची जबाबदारी सांभाळत आहेत.



५८ वर्षीय अनिता आनंद यांची आई सरोज तमिळी तर वडील एस. व्ही. आनंद पंजाबी वंशाचे डॉक्टर होते. अनिता या केंटविल, नोवा स्कॉटिया या ठिकाणी लहानाच्या मोठ्या झाल्या. क्वीन्स विद्यापीठ आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठ या ठिकाणी त्यांनी शिक्षण घेतलं. २०१८ मध्ये त्या ओकविलच्या खासदार झाल्या, त्यवेळी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये खासदार होणाऱ्या त्या पहिल्या हिंदू वंशाच्या नेत्या ठरल्या.

## हमासच्या ताब्यातील अमेरिकेच्या नागरिकाची सुटका

**देर अल-बलाह :** ट्रम्प प्रशासनाप्रती सद्भावना म्हणून हमासने सोमवारी गाझा पट्टीत १९ महिन्यांहून अधिक काळ ओलिस ठेवलेल्या एका इस्रायली-अमेरिकन सैनिकाची सुटका केली. एडन अलेक्झांडर याला रेड क्रॉस आणि नंतर इस्रायली सैन्याच्या स्वाधीन करण्यात आले, असे इस्रायली सैन्याने सांगितले. अलेक्झांडर असे नाव लिहीलेला शर्ट त्याने घातला होता. तेल अविवमध्ये त्यांचे कुटुंबीय त्यांना नेण्यासाठी जमले होते.
अलेक्झांडर यांची सुटका झाल्याचे जाहीर झाल्यावर त्यांची आजी, वरदा बेन बारुच यांना विशेष आनंद झाला. तेल अविवच्या होस्टेज स्केअरमध्ये शेकडो लोकांनी जल्लोष केला. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने सीमापार केलेल्या हल्ल्यात अलेक्झांडरला दक्षिण इस्रायलमधील त्याच्या लष्करी तळावरून पळवून नेण्यात आले तेव्हा तो १९ वर्षांचा होता. या हल्ल्यामुळे गाझामध्ये युद्ध सुरू झाले होते. मार्चमध्ये इस्रायलने हमाससोबत आठ आठवड्यांचा युद्धविराम मोडल्यानंतर एखाद्या ओलिसाची सुटका होण्याची ही पहिलीच घटना होती. या सुटकेमुळे हमास आणि इस्रायल दरम्यान नव्याने युद्धबंदीच्या चर्चेचे वातावरण निर्माण होऊ शकते. इस्रायलने आपले आक्रमण तीव्र केले जाणार असल्याचे म्हटले आहे. त्यात गाझाचा संपूर्ण प्रदेश ताब्यात घेऊन तेथील लोकसंख्येपैकी बहुतेकांना विस्थापित करण्याचा समावेश आहे.युद्धबंदी संपण्याच्या काही दिवस आधी, इस्रायलने पॅलेस्टिनी भूप्रदेशात प्रवेश आणि सर्व मदतीचे मार्ग रोखले त्यामुळे मानवीय संकट आणखी वाढले आणि नाकेबंदी उठवली नाही तर दुष्काळ पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## कर्नल सोफिया कुरेशींच्या घरावर हल्ला?

नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था

पहलगामवरील हल्ला आणि त्यानंतर ऑपरेशन सिंदूरमुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. हा तणाव फक्त सीमेवरच नाही तर सायबर हल्ल्यातूनही दिसून येत आहे. अपप्रचार करून गोंधळ निर्माण करण्यासाठी सोशल मीडियावर अफवा पसरविण्याचे प्रयत्न होत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर प्रकाशझोतात आलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव झाला. त्यांच्या देशभक्तीबद्दल सर्वांनाच अप्रूप वाटले. मात्र सोफिया कुरेशींच्या बेळगावमधील घरावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असलेल्यांनी हल्ला केल्याची अफवा सोशल मीडियावर उठविण्यात आली. कर्नाटक पोलिसांनी याची दखल घेऊन सदर पोस्ट डिलीट केली आहे.
एक्सवर अनीस उद्दीन या अकाऊंटवरून सदर




खोटी पोस्ट शेअर करण्यात आली होती. कर्नल सोफिया कुरेशी आणि त्यांच्या मुलावर हल्ला झाला असून घराला आग लावण्यात आल्याचा उल्लेख या पोस्टमध्ये करण्यात आला होता. सोफिया कुरेशी यांच्या घराबाहेर मुस्लीम समाजाविरोधात द्वेषपूर्ण घोषणा दिल्या गेल्या, असाही दावा पोस्टमध्ये करण्यात आला होता. सदर अकाऊंटचे लोकेशन कॅनडामधील ब्रिटिश कोलम्बिया येथील दाखवले गेले. या अकाऊंटवरून ४०५ जणांना फॉलो करण्यात आले होते. तर त्याचे ३१ फॉलोअर्स होते. विशेष म्हणजे हे अकाऊंट व्हेरिफाईड ब्लू टीक असलेले अकाऊंट होते. तसेच पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान मोहम्मद अली जीना, लष्करप्रमूख असीम मुनीर आणि इतर लष्करी अधिकाऱ्यांचा फोटो अकाऊंटला जोडण्यात आलेला होता. एक्सवरील_ या आणखी एका अकाऊंटवरून अशाच प्रकारची पोस्ट टाकण्यात आली होती. या पोस्टमध्ये लिहिले गेले, '' ने पुन्हा एकदा द्वेष पसरविला. भारतीय लष्कराच्या अधिकारी आणि प्रवक्त्या कर्नल सोफिया कुरेशी यांना लक्ष्य करण्यात आले आहे. बेळगावमधील त्यांच्या घरावर मध्यरात्री ३ वाजता हल्ला करण्यात आला. मुलगा समीर गंभीर जखमी झाला आहे. तर घर पेटवून देण्यात आले. कुरेशी यांचे कुटुंब सध्या दिल्लीत लष्कराच्या संरक्षणाखाली आहे.''बेळगावचे पोलीस अधीक्षक डॉ. भीमाशंकर गुलेद यांनी सदर पोस्ट व्हायरल झाल्यानंतर अशाप्रकारची घटनाच घडली नसल्याचे स्पष्ट केले.

## 'पुन्हा दहशतवादी छावण्या उभारणार; शाहबाज शरीफ यांनी खुली केली देशाची तिजोरी

नवी दिल्ली, दि.१४ वृत्तसंस्था

दहशतवादाविरोधात लढण्याचे नाटक करणाऱ्या पाकिस्तानचा खरा चेहरा पुन्हा एकदा जगासमोर उघड झाला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय लष्कराने नष्ट केलेल्या दहशतवादी तळांचे पुनर्वसन करण्याची घोषणा पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारने केली असून, या हल्ल्यात मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या कुटुंबीयांना कोट्यवधी रुपयांची भरपाई देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.
विशेष म्हणजे, जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझहर याच्या कुटुंबातील १४ दहशतवादी या कारवाईत ठार झाले होते. या मृत दहशतवाद्यांच्या कुटुंबांना १४ कोटी पाकिस्तानी रुपये दिले जाणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. इतकेच नव्हे, तर जखमी दहशतवाद्यांना १० ते २० लाख रुपये, तसेच त्यांच्या अड्ड्यांची पुनर्बांधणीही सरकारतर्फे केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात



आले आहे.
६ आणि ७ मेच्या मध्यरात्री भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिजबुल मुजाहिदीन यांसारख्या संघटनांच्या छावण्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. या ठिकाणी भारताविरोधात दहशतवादी कारवायांची आखणी सुरू होती. या हल्ल्यांमध्ये पाक लष्कराच्या ११ जवानांचा मृत्यू आणि ७८ जण जखमी झाले. भारतीय लष्कराच्या नेमक्या आणि धडाडीच्या कारवाईमुळे पाकिस्तानची संरक्षण व्यवस्था कोलमडली आणि त्यांनी भारताविरुद्ध पुन्हा हल्ल्याचा निष्फळ प्रयत्न केला.
याशिवाय, शाहबाज शरीफ सरकारने मारल्या गेलेल्या पाकिस्तानी जवानांच्या कुटुंबियांना १ ते १.८ कोटी रुपये, निवृत्तीच्या तारखेपर्यंत पूर्ण वेतन आणि भत्ते, मुलीच्या लग्नासाठी १० लाख रुपये आणि घरासाठी १.९ ते ४.२ कोटी रुपये देण्याची घोषणाही केली आहे. जखमी जवानांनाही त्यांच्या दर्जानुसार २० ते ५० लाख रुपयांपर्यंत भरपाई देण्यात येणार आहे.

**जगभरात संतापाची लाट**

पाकिस्तान सरकारच्या या निर्णयामुळे जगभरात संतापाची लाट उसळली आहे. दहशतवाद्यांना 'शहीद' घोषित करून त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा वर्षाव करणे, आणि त्यांची अड्डे पुन्हा उभारणे, हे आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब आहे. भारतासह अनेक देशांनी पाकिस्तानचा हा दुटप्पी आणि धोकादायक पवित्रा उघडकीस आणला आहे. शांतता आणि दहशतवादविरोधी लढ्याचे ढोंग करणाऱ्या पाकिस्तानने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की तो अजूनही दहशतवाद्यांचा पंखा धरून आहे.

**दहशतवाद्यांना सन्मान आणि मदत, पाकिस्तान सरकारचा अजब निर्णय**

या संपूर्ण घटनाक्रमावर प्रतिक्रिया देताना पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी एक धक्कादायक घोषणा केली. दहशतवाद्यांना शहीद मानून त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत, घरांची उभारणी, मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी आणि उपचाराचा खर्च सरकार उचलेल असे त्यांनी जाहीर केले. या घोषणेनुसार, मृत दहशतवाद्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपये, जखमींना १० ते २० लाख रुपये, तसेच छावण्यांची पुनर्बांधणी करण्यासाठीही निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## राजकीय पक्ष आणि आयोगाचीही कसोटी!

गेल्या पाच वर्षांपासून ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला असला, तरी हा मार्ग तितकासा सरळ, सरधोपट नाही. त्यात पाऊस, मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, प्रभाग रचना आदी गतिरोधक असून, निवडणूक आयोगाला आणि प्रशासनाला त्यावर मात करावी लागेल. महायुती आणि महाविकास आघाडी या महाराष्ट्रातील दोन प्रमुख आघाड्यातील पक्षही अपवाद वगळता निवडणुकीला स्वतंत्रपणे सामोरे जाण्याची शक्यता असल्याने त्यांचीही कसोटी आहे. महाराष्ट्रात काही जिल्हा परिषदांत आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांवर जात असल्याने तिथले ओबीसी आरक्षण कमी करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या पन्नास टक्क्यांहून अधिक आरक्षण देता येणार नाही, या निर्णयाची अंमलबजावणी करताना महाराष्ट्रातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसीच्या जागा कमी झाल्या. सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण असले पाहिजे, असा ओबीसींचा आग्रह होता. त्यासाठी काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता होतील, नंतर होतील अशा आशेवर स्थानिक नेते अवलंबून होते. अनेकदा तयारी करूनही नेत्यांच्या उत्साहावर पाणी पडले. नेत्यांचा खर्च पाण्यात गेला. ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणाला धोका निर्माण झाल्याचा मुद्दा राज्यात राजकारण पेटवण्यास कारणीभूत झाला होता. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर महाराष्ट्रातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या. चार-पाच जिल्हा परिषदा वगळता राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या दोन ते पाच वर्षांपासून निवडणुका झालेल्या नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरण असल्याने निवडणुका झाल्या नसल्या, तरी आता निवडणुका जाहीर करताना सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधींचे धोरणात्मक निर्णयांचे अधिकार कसे प्रशासकांच्या हाती गेले आणि त्याचा कसा गैरवापर झाला, याचे उदाहरण देताना चिंता व्यक्त केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेण्याचा नियम असतानाही केवळ न्यायप्रविष्ट बाबीमुळे काही संस्थांच्या दोन, तीन, तर काही संस्थांच्या पाच वर्षांत निवडणुका होऊ शकल्या नाहीत. राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार नोकरशाहीच्या हाती एकवटला आहे. सत्तेचे केंद्रीकरण हा एकाधिकारशाहीकडे जाणारा मार्ग असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांतील अनुभवाच्या जोरावर आमदार, खासदार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत; परंतु पाच वर्षे या संस्थाचा कारभारच नोकरशाहीकडे होता. त्यामुळे नेतृत्व घडवणाऱ्या कार्यशाळाच बंद असल्यासारखी स्थिती होती. पाच वर्षांत राजकीय पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. या काळात काहींचे नेतृत्वच संपले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकांच्या समस्यांना वाचा फोडणारे लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकांनी मनमानी कारभार केला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाच वर्षे लोकप्रतिनिधी नसल्याने जनता आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील संपर्काचा दुवाच हरवला होता. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करताना नोंदवलेले निरीक्षणही अतिशय महत्त्वाचे आहे. जवळपास दोन ते पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला दिले; मात्र मोठ्या प्रमाणात करावी लागणारी तयारी, प्रभाग रचना, मतदार यादी अद्ययावतीकरण आणि पावसाळ्याचा कालावधी पाहता प्रत्यक्ष निवडणुका गणेशोत्सवानंतरच होतील, अशी चिन्हे आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही तशी मुभा आयोगाला दिली आहे. २०२२ पूर्वीच्या पद्धतीनुसार ओबीसींना २७ टक्के राजकीय आरक्षण देण्याच्या सूचनाही सर्वोच्च न्यायालयाने केल्या आहेत. असे असले, तरी न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकांच्या अधीन हे आरक्षण असल्याने ओबीसी आरक्षणावर टांगती तलवार कायम आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार आठवड्यांत जाहीर करून चार महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असले, तरी त्याची अंमलबजावणी करणे राज्य निवडणूक आयोगाला अशक्य आहे. आदेशाचे पालन करावयाचे झाल्यास राज्यात किमान तीन महिने निवडणूक आचारसंहिता लागू होऊन शासकीय यंत्रणेचे बरेचसे कामकाज ठप्प होण्याची भीती आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना दिलेली स्थगिती न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने उठवली. आयोगाचा कायदा, नियम व कार्यपद्धतीनुसार निवडणुकीआधी सर्वप्रथम मतदारयाद्यांची पुनर्रचना करून ती अंतिम करावी लागते. त्याचदरम्यान मतदानयंत्रणेची तयारी, प्रभागरचना अंतिम करून आरक्षणाची सोडत काढणे आदी कामे केली जातात व त्यानंतर निवडणुकीची तारीख जाहीर होते.

## शिक्षक आंदोलन





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

**ज्योतिबा साऊने पुण्यात**
**शून्यावर शाळा काढली**
**आज मात्र शाळा शून्यात**
**शासन काढायला निघाली**

**जगाचा भाग्यविधाता**
**रस्त्यावर तो उतरते**
**शासन अन्यायकारक**
**संच मान्यता लादते**

**काय करणार शासन**
**शिक्षण बंद करून**
**दरोडे टाकतील विद्यार्थी**
**डोक्याचे कमरेला गुंडाळून**

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



स्वराज्य रक्षक शिवराय छावा ।
घेतो शंभू धावा रक्षणासी ।।

बुद्धिवंत शंभू ज्ञानवंत शंभू ।
शूरवीर शंभू यशवंत ।।

औरंगजेबाला उरून पुरले ।
धोक्याने मारले गद्दारानी ।।

बुद्धी आणि शक्ती क्षत्रिय, पंडित।
होते अलौकिक शंभू राजे ।।

शत्रूंचीही माय माय जाणायचे ।
शंभू करायचे स्त्री रक्षण ।।

शूरवीर आणि कविमन होते ।
ज्ञायप्रिय होते शंभूराजे ।।

# घर असावं घरासारखं!



विचारायण
साधना काळबांडे
9767993827



(आज जागतिक कुटुंब दिवस)

**घर असावं घरासारखं**
**नकोत नुसत्या भिंती**
**तिथे असावा प्रेम जिव्हाळा**
**नकोत नुसती नाती.....**

या विमल लिमये यांच्या सुंदर ओळी म्हणजे प्रत्येक कुटुंबासाठी आहेत. प्रत्येकाच्या जीवनातील कुटुंब हा जिव्हाळ्याचा विषय असतो. जन्म घेतल्या पासून तर मरेपर्यंत कुटुंब आपल्या सोबत असते. जीवनात सुखदुःख सोबतीलाच असते. ते आले की प्रत्येकाला कुटुंबाची आवशक्यता असते. जीवनात प्रत्येक व्यक्तीला कुटुंबाचे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे समाजातही प्रत्येक कुटुंबाला महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंबाशिवाय समाज हा पूर्णच होऊ शकत नाही. कुटुंब म्हणजे काय तर नात्याची गुंतलेली एक माळ असते आणि ती माळ अभंग राहणे आवश्यक असते.ती माळ जर भंगली तर कुटुंबातील प्रत्येक नाते हे वेगवेगळे होते आणि एकमेकांपासून दूर जाते त्याला आपण कुटुंब म्हणू शकत नाही.कारण कुटुंब म्हणजे एक मानसिक,शारीरिक,भावनिक,आधाराचे महत्वाचेआणि हक्काचे स्थान आहे. कोणताही मनुष्य असे म्हणू शकत नाही की मला कुटुंबाची त्याच्या आधाराची काही गरज नाही. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धत असायची. सर्व नातीगोती घरात सुखासमाधानाने एकत्र नांदत होती. सर्व नाती एकत्र असल्याने कुटुंबात प्रत्येकाला सुरक्षितता वाटायची. भावनिक, मानसिक, शारीरिक आधार मिळायचा. त्यामुळे जीवनात दुःख आले तरी आपल्या मागे अनेकांचा आधार आहेत ही भावना माणसाला दुःख दूर करण्यास मदत करायची त्यामुळे कौटुंबिक वातावरण प्रत्येकाला मिळायचे.. मोठ्यांचा मानसन्मान ठेवणे तसेच संस्कृतीचे पालन, अनेक परंपरांचे पालन प्रत्येक कुटुंबामध्ये व्हायचे. त्यामुळे आपोआपच प्रत्येकावर एक प्रकारचा संस्कार पडत होता आणि प्रत्येकाचे जीवन हे कुटुंबात घडत होते. प्रत्येक कुटुंब मिळून समाज बनत असतो. प्रत्येक कुटुंब घडले तर आपोआपच समाज सुद्धा घडतो समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वातावरण चांगले ठेवण्यास मदत होते.प्रत्येक व्यक्तीची प्रगती म्हणजे कुटुंबाची प्रगती आणि प्रत्येक कुटुंबाची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती होय. पूर्वीच्या काळी आधुनिक तंत्रज्ञान नसले. तरी किंवा आजच्यासारखी आधुनिक काळ नसला तरीही कुटुंब मात्र एकत्र बांधलेले असायचे. कुटुंबाच्या गरजा आपल्या कुटुंबातच पूर्ण व्हायच्या. समाज आपले सामाजिक कर्तव्य म्हणून एकमेकांना मदतीचा हात द्यायच्या. परंतु काळ बदलत गेला आणि पर्यायाने प्रत्येक कुटुंबाची परिस्थिती ही वेगवेगळी झाली. स्वतःच्या प्रगतीसाठी अनेकांनी कुटुंब सोडलं आणि कुटुंबातील व्यक्तींची संख्या ही कमी होऊ लागली. त्यामुळे काही ठिकाणी अनेक नाती दुरावल्यासारखी झाली. जणू कुटुंबात एक प्रकारची स्मशान शांतता आली. कुटुंबातील सुसंवाद होईनासा झाला. भावनिक आधार निर्माण होऊन समाजामध्ये एकता निर्माण होण्यासाठी या दिवसाचे खूप महत्त्व आहे. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीला समाजातील आपली भूमिका कळावी कारण कुटुंब हे समाजाचा पाया असतो आणि पाया पक्का असेल तेव्हाच हा समाज टिकून राहतो.ही उदात्त भावना हा दिवस साजरा करण्यामागे होती आणि तेव्हापासूनच हा दिवस आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन म्हणून साजरा केला जातो कारण मानवी जीवनामध्ये प्रेमाला खूप महत्त्व आहे. प्रत्येकाला प्रेमाची किंमत कळावी. आपल्याला एकमेकांच्या आधाराची गरज आहे तसेच एकत्र येऊन एकतेला महत्त्व द्यावे. वैयक्तिक विकासाबरोबर सामाजिक एकता,समुदायिक भावना प्रत्येकामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. प्रत्येक कुटुंब जर मजबूत झाले तर पर्यायाने समाज मजबूत होईल. आणि देश मजबूत होईल. पण प्रत्येकाने, कुटुंबातील व्यक्तीने प्रत्येक नात्याला महत्त्व देण्यात साठी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी तर संपूर्ण विश्वालाच आपले कुटुंब मानले आहे आणि त्या कुटुंबाच्या कल्याणासाठी पसायदान लिहिलेले आहे. या पसायदाना मध्ये त्यांनी संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी एक प्रकारे आशीर्वादच मागीतलेला आहे.लोकांना चांगले विचार आणि कर्म करण्याची प्रेरणा मिळावी, चांगली जीवन जगण्याची प्रेरणा मिळावी त्यासाठी पसायदान एक विचारसरणी आहे. आपल्या पसायदानातून संत ज्ञानेश्वरांनी जगाला प्रेम,सहकार,सज्जनतेचा मार्ग दाखवलेला आहे आणि चांगले जीवन जगण्यासाठी एक प्रेरणा दिलेली आहे. सर्व प्राणीमात्रांमध्ये मित्रत्वाची भावना निर्माण होणे हा उदात्त विचार त्यामध्ये दिसून येतो. सर्वांमधील दृष्ट भावना दूर व्हावी. वाईट प्रवृत्ती नष्ट होऊन सकारात्मक दृष्टी प्रत्येकाला मिळो तसेच सर्व प्राणीमात्रांमध्ये प्रेमाची भावना निर्माण व्हावी ही विनंती संत ज्ञानेश्वर यांनी भगवंताकडे केली आहे.मानवाने माणुसकीचा धर्म जपावा तेव्हाच प्रत्येकाचे जीवन हे सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघावे.. संपूर्ण विश्वाला कुटुंब म्हणून विश्वाच्या कल्याणासाठी संत ज्ञानेश्वरांनी हात जोडून विश्वप्रार्थना केली आहे ते म्हणजे पसायदान. जगात शांतता नांदावी, समृद्धी, ज्ञान कायमस्वरूपी राहावे त्यासाठी आपल्या हाताची ओंजळ करून संत ज्ञानेश्वरांनी भगवंताकडे पसायदान मागितलेले आहे. जे जगात पापी आहेत त्यांच्या मधील अज्ञान,अंधार नाहीसा व्हावा आणि सर्वांच्या चांगल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी त्यांनी पसायदान लिहिलेलं आहे. प्रेम,मैत्री, हे मानवी जीवनाचे खरे सूत्र आहे. आपल्या कर्तव्याची प्रत्येकाला जाणीव व्हावी.व्यक्तीच्या अंगी विविध कला,अध्यात्मिक पणा असावा तसेच समाजात संघर्ष निर्माण होऊ नये.मानवी मनाला आतून आनंदला व्हावा. पापी आणि दुराचारी प्रवृत्ती नष्ट व्हावी.यासाठी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानाचा हा प्रसाद संपूर्ण विश्वाला दिलेला आहे म्हणजेच आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा सर्वांसाठीच आहे. प्रत्येक कुटुंबासाठी प्रत्येक व्यक्तीसाठी आहे. व्यक्ती घडला तर समाज घडेल.अंधार नष्ट होऊन सगळ्यांच्या जीवनामध्ये प्रकाश येईल.प्रत्येक मनुष्यामध्ये सतत रज,तम मोह, मद, मत्सर दिसून येतात त्यातील चांगले गुण अंगी राहून वाईट गुणांना दूर प्रत्येक व्यक्तीने करावे. तेव्हाच प्रत्येक कुटुंब सुखी होईल.पर्यायाने समाजात शांतता, सुख-समृद्धी नांदेल आणि जगाचे कल्याण होईल.

**प्रत्येका साठीच कुटुंब सागर**
**प्रेमाची घागर कायमच**
**कुटुंब वाहत्या प्रवाह नदीचा**
**तुडुंब पाण्याचा डोह जणू**
**प्रेम वात्सल्याची असे साठवण**
**ठेवा आठवण कुटुंबाची**
**विश्वच कुटुंब पसायदानात**
**प्रेमच जगात असावेच**

# कुटुंबात हवे सहनशीलता आणि शांतीचे जल



दिन विशेष
नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

हिंदू समजुतींनुसार मानवी जीवनास चार आश्रमांत ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम असे विभागले गेले आहे. त्यांतील गृहस्थाश्रमात कुटुंबास फार मोठे महत्व आहे. खर तर आज देशात आज घटस्पोटाच्या अनेक घटना घटतांना आपल्याला दिसून येत आहेत. अनेकदा किरकोळ कारणावरून घटस्पोटा पर्यंत अनेक जोडपे जातांना दिसतात. विवाह टिकविण्यासाठी खर तर कुटुंबात हवे सहनशीलता आणि शांतीचे जल! खर तर माणसामधील नाती ही आपल्या जन्मावरून, विवाहावरून अथवा एखाद्याला दत्तक घेण्यावरून निर्माण होतात. कुटुंबसंस्था एकत्र अथवा विभक्त अशी दोन्ही प्रकारची असू शकते. विभक्त कुटुंबसंस्थेत आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी असे प्राथमिक घटक असतात. एकत्र कुटुंबसंस्थेत इतर दुय्यम नातेसंबंधाचा अंतर्भाव होतो. एकत्र कुटुंबसंस्थेत आजी-आजोबा, आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी, काका-काकू, त्यांची मुले-मुली असे घटक असतात. साधारणतः वडील हा कुटुंबाचा प्रमुख असतो. मातृसत्ताक पद्धतीत माता ही कुटुंबाची प्रमुख असते. भारतीय संस्कृतीत एकत्र कुटुंब व्यवस्थेला एक वेगळेच महत्व आहे. प्राचीन काळापासून अगदी रामायण-महाभारताच्या काळात आपण पहिले, तर एकत्र कुटुंब व्यवस्थेचे मूळ आपल्या मातीत हजारो वर्षापासून रुजलेले आपल्याला दिसून येतात. एकत्रित कुटुंब व्यवस्थेची गृह्यव्यवस्थापन पद्धती, कुटुंबातील नियम, नियम आचरण, संस्कार व नात्यातील ओलावा याचे एक वेगळेच महत्व आहे. आज जवळपास एकत्र कुटुंबपध्दती नाहीशी झालेली आहे, असे म्हणायला हरकार नाही. कारण आज प्रत्येकाला विवाह झाल्यावर वेगळ, स्वतंत्र राहायला आवडत चालल आहे. आज बायका संसाराला हातभार म्हणून नोकर्या करायला लागल्या आहेत. त्यामुळे नवरा-बायको दोघे नोकरीसाठी बाहेरच असतात. त्यांची मुले शाळेत जाणारी असली तरी, त्यांना डब्ब्यात पोळी-भाजी ऐवजी केक, ड्रायफूड असे काही तरी दिले जाते. खर तर कुटुंब म्हटले म्हणजे एक माळच आहे. ही माळ प्रेमाच्या धाग्याने गुंफल्या जाते. कुटुंबात राहणारा प्रत्येक व्यक्ती हा महत्वाचा घटक असतो. संकटाच्या क्षणी संपूर्ण कुटुंब एकत्र कुटुंबपद्धतीत एकजुटीने संकटाचा सामना करतात. कुटुंब टिकवायचे असेल अर्थात विवाह टिकवायचे असेल, तर कुटुंबातील



प्रत्येक सदस्यांमध्ये आपसात प्रेमभाव असणे गरजेचे आहे. ज्या कुटुंबात प्रेम नसेल, तर ते कुटुंब, कुटुंब नसून स्मशान आहे असे समजावे. आपल्याला माहीत आहे, स्मशानात अनेक प्रेत असतात; परंतु एकमेकांना कधी भेटत नसतात किंवा बोलत नसतात. ज्या कुटुंबात सासू-सून, पती-पत्नी आणि पिता-पुत्र एकत्र राहत असूनही एकमेकांना बघून आनंदित होत नसतील, खुश होत नसतील, तर ते कुटुंब स्मशान नाही काय? खर तर कुटुंबात प्रेम आणि समर्पण असेल तर असे वाटते, जणू जीवन हे स्वर्ग आहे. खर तर आपण जर आपल्या कुटुंबाला खऱ्या अर्थाने स्वर्ग बनवू इच्छित असाल, तर सासू-सून, पिता-पुत्र आणि पती-पत्नी यांनी एकमेकांसोबत एक करार करावा. या दोघांतील एक आग झाले, तर दुसर्याने पाणी व्हावे. तसेच जीवन जगत असतांना आपल्या कुटुंबात पाण्याची व्यवस्था करावी कारण कुटुंबातील कोणाच्या मनात केव्हा क्रोध नावाची आग पेटेल, हे आपण सांगू शकत नाही.

क्रोध हा खर तर आगेसारखाच आहे. आपण आपल्या कुटुंबात सहनशीलता आणि शांतीचे जल तयार ठेवावे कारण या क्रोधाच्या आगेमुळे कुटुंब केव्हा पेट घेईल, सांगता येणार नाही. पती आग झाला, तर पत्नीने पाणी व्हावे. सासू आग झाली, तर सासर्याने पाणी व्हावे. पिता आग झाला, तर पुत्राने पाणी व्हावे. मग पहा कुटुंबात कधीच वाद होणार नाही कधीच भांडण होणार नाही व किरकोळ कारणांनी घटस्पोट होणार नाहीत. आपल्याला खऱ्या अर्थाने कुटुंब टिकवायचे असेल, तर लहान मुलांच्या भांडणात कुटुंबातील मोठ्या व्यक्तींनी कधीच हस्तक्षेप करू नये. तसेच जीवन जगतांना कुटुंबात सासू-सुनेच्या भांडणात पिता-पुत्राने कधीच हस्तक्षेप करू नये कारण कुटुंबात एकत्र राहतांना सासू-सुनेत वाद होऊ शकते. दिवसा झालेले सासू-सुनेचे भांडण रात्री कुटुंबात परतल्यावर त्या सासू-सुना आपापल्या पतीकडे तक्रार करू शकतात. अशा वेळी पतीने त्यांची तक्रार शांतपणे ऐकून घ्यायला हवी. तसेच थोडीफार सहानुभूतीदेखील दाखवायला हवी; परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर काल झालेले सारे विसरायला हवे, तरच आपल्या कुटुंबाचे ऐक्य टिकून राहू शकते हा सुखी कुटुंबाचा महामंत्र आहे.

आज आपल्या भारतात विभक्त कुटुंबपध्दती सगळीकडे रुजत आहे. क्वचितच लोक आज आपल्याला भारतात सापडतात, जे आपल्या कुटुंबात आपल्या वृद्ध आई-वडिलांना श्रद्धेने व आदराचे स्थान देतात, त्यांची काळजी घेतात. खर तर आज आपल्या भारतीय कुटुंब व्यवस्थेला वृद्धाश्रमाची गरज भासत आहे. जुन्या काळी मुलाच्या आणि सुनेचे भांडण झाले तर वृध्द माता-पिता किंवा वृध्द आजी-आजोबा त्यांना समजावून सांगण्याची मुख्य भूमिका निभावित असत परंतु आज बदलत चाललेल्या जीवनशैलीमुळे व ढासळत चाललेली नैतिक मूल्य यामुळे वृध्द माता-पित्याला किंवा वृद्ध आजी-आजोबाला नवीन पिढी सोबत ठेवण्यास तयार नाहीत त्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखविली जाते.

आज १५ मे आपण ''जागतिक कुटुंब दिन'' संपूर्ण जगात साजरा करत आहोत. आज देशात किरकोळ कारणांनी वाढत चाललेल्या घटस्पोटाबाबत सर्वांनी विचार करायला हवा. कुटुंब कशे टिकविता येतील याबाबत सर्वांनी विचार करायला हवे. कुटुंब टिकविण्यासाठी खर तर कुटुंबात हवे सहनशीलता आणि शांतीचे जल! हे आपण कधीच विसरू नये. ''जागतिक कुटुंब दिन' साजरा करतांना भारतातील सर्व कुटुंब गुण्या गोविंदाने नांदव तसेच सुख संपन्न व समृध्द जीवन जगावं एवढीच अपेक्षा!

# भारतीय लोकशाहीत संसद नव्हे संविधान सर्वश्रेष्ठ...!



विचारमंथन
डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060

भारताला स्वातंत्र्य देण्यापूर्वी १९४६ मध्ये इंग्रजांनी भारतात कॅबिनेट मिशन पाठविले होते. या कॅबिनेट मिशनच्या सूचनेवरून स्वतंत्र भारताचा राज्यकारभार कसा चालविला जाईल याबाबतचे नियम, निर्देश, अटी, संकेत तसेच नागरिक व सरकार यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि अधिकार निर्धारित करण्यासाठी संविधान निर्माण करावे असे ठरले. त्यासाठी संविधान सभा गठीत केली गेली. संविधान सभेने देशातील भिन्न संस्कृती, विभिन्न भाषा, विविध धर्म आणि असंख्य जाती लक्षात घेऊन न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या तत्त्वावर आधारित देशाला एकसंघ राष्ट्र म्हणून उभे करण्याचा संकल्प करून जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाही संविधान तयार केले.

आम्ही भारतीय लोकांनी या संविधानाला २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान सभेत स्वीकृत करून अधीनियमित व अंगीकृत केले आणि त्याची २६ जानेवारी, १९५० पासून अंमलबजावणी सुरू झाली. आज त्याला ७५ वर्षांचा काळ पूर्ण झाला. याचा अर्थ आपण संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. या अमृत महोत्सवी वर्षात संविधानाबाबत विविध पातळीवर चर्चा होत असून लोकांमध्ये संविधानाची ओळख व्हावी म्हणून अनेक उपक्रम राबविले जात आहेत. अशातच केंद्र सरकारने संसदेत फारसी साधक बाधक चर्चा न करता आणि विरोधी पक्षाला विश्वासात न घेता बहुमताच्या बळावर अनेक विधेयके संमत करून घेतली. तसेच हिंदू मुस्लिम वाद वाढवा यासाठी मुद्दाम वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकही संमत केले. मात्र सरकारच्या या निर्णयाविरुद्ध काही लोकं सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने लोकांचे अपील स्वीकारून सरकारचा निर्णय संवैधानिक आहे किंवा नाही तसेच तो कोणत्या भूमिकेतून घेतला याबाबत आपली भूमिका मांडली.

सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेवर भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी वादग्रस्त विधान करतांना ✻''सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि सर्वोच्च न्यायालय हे देशात वाढत्या धार्मिक तणावासाठी जबाबदार आहेत. देशातील प्रत्येक मुद्दा सर्वोच्च न्यायालय सोडवणार असेल तर संसदेची गरज नाही.''✻ अशी टिप्पणी केली. न्यायपालिकेवर हल्ला करणाऱ्या या टिप्पणी बद्दल खासदार निशिकांत दुबे यांच्याविरुद्ध न्यायालयाने स्वतःहून अवमान खटला चालवावा अशी मागणी करणारी याचिका एका वकिलाने कोर्टात दाखल केली. या जनहित याचिकेवर सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. या सुनावणी दरम्यान खासदार दुबे यांच्या टीकेचे खंडन करतांना न्यायालयाने सांगितले की, ''संवैधानिक लोकशाहीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका संविधानाच्या चौकटीतच काम करतात. संविधान हे आपल्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. संविधानच तिन्ही स्तंभांना दिलेल्या अधिकारांवर मर्यादा आणि निर्बंध लादते. न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार




संविधानाने न्यायपालिकेला प्रदान केला आहे. सरकारने केलेले कायदे त्यांच्या संवैधानिकतेची चाचणी घेण्यासाठी तसेच न्यायालयीन अर्थ लावण्यासाठी न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन आहेत. म्हणून जेव्हा संवैधानिक न्यायालय त्यांच्या न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधिकाराचा वापर करतात तेव्हा ते संविधानाच्या चौकटीतच काम करतात. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी न्यायपालिकांबाबतचे केलेले विधान अत्यंत बेजबाबदार आणि लक्ष वेधून घेणारे आहे. त्यांच्या विधानातून संविधानिक न्यायालयांच्या कामकाजाबद्दल त्यांचे अज्ञान दिसून येते असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदविले असून त्याचवेळी न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करणार नसल्याचे म्हटले आहे. कारण न्यायालये फुलांसारखे नाजूक नाहीत की अशा हास्यास्पद विधानांमुळे कोमेजून जातात. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेल्या निर्णयाबाबत दिनांक ९ मे, २०२५ रोजी पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक लोकसत्ता मधील ✻''संसद नव्हे, संविधान सर्वश्रेष्ठ''✻ या मथळ्याची बातमी वाचली आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाचा मनस्वी आनंद झाला. त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे मनःपूर्वक अभिनंदन.

अलिकडे संसद सदस्य आणि सत्तेतील लोकांना असे वाटते की, सर्वोच्च न्यायालयाने सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करू नये, कारण आम्ही लोकनियुक्त प्रतिनिधी आहोत. त्यामुळे आम्हीच सर्वोच्च आहोत असा त्यांचा भ्रम झालेला आहे. पण त्यांचा हा भ्रम सर्वोच्च न्यायालयाने धुडकावून लावत संसदीय वर्चस्वाचा दावा खोडून काढला आहे.

न्यायालयीन पुनरावलोकन हे संविधानाने न्यायपालिकेला दिलेले कार्य आहे आणि न्यायालये कायद्यांच्या घटनात्मकतेची चाचणी घेतात, तेव्हा ते संविधानाच्या चौकटीत काम करतात. न्यायालयीन निर्णय हे कायदेशीर तत्त्वांनुसार घेतले जातात, राजकीय, धार्मिक किंवा सामुदायिक विचारांना अनुसरून नाही. मात्र सरकारचे सर्व निर्णय कायदेशीर तत्त्वानुसारच घेतले जातात असे म्हणता येत नाही कारण त्यावर कधी राजकीय लाभ, धार्मिक भावना आणि सामुदायिक विचारांचा प्रभाव असतो.

सामान्य नागरिक एखाद्या कायद्याची वैधता तपासण्यासाठी न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधिकाराचा वापर करून न्यायालयात जातात तेव्हा ते त्यांच्या मूलभूत आणि कायदेशीर अधिकारांच्या पूर्ततेसाठी न्यायालयात येतात. त्यांच्या याचिकांचा न्यायालयाकडून विचार करणे म्हणजे संवैधानिक कर्तव्य पार पाडणे आहे, असे न्यायालयाने आपल्या या निर्णयात स्पष्ट करत न्यायालये हस्तक्षेप करतात हा राज्यकर्त्यांचा आक्षेप खोटा ठरविला आहे.

भारतीय लोकशाहीत संविधान सर्वोच्च आहे याबाबत कोणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. मात्र सत्तेची नशा डोक्यात भिनलेले आणि कायदा, संविधान, न्यायालयीन प्रक्रिया, सरकारची जबाबदारी आणि मर्यादा इत्यादीबाबत अज्ञानी असलेले बिनडोक लोकं सत्तेत जातात त्यामुळे त्यांच्यात संवैधानिक नीतिमत्तेचा आणि संविधानाच्या व कायद्याच्या अभ्यासाचा अभाव असतो. या अज्ञानातून किंवा द्वेषभावनेतून ते सतत संविधानावर निरर्थक, बेकायदेशीर आणि अतार्किक टीका करून संविधान बदलण्याची भाषा करतात. सरकारची सत्ता सर्वश्रेष्ठ असल्याचा दावा करून मनमानी निर्णय घेतात. त्यांना कोणत्याही प्रकारची टीका किंवा विरोध नको असतो म्हणजे ते मनमानी करून हुकूमशहा सारखे वागले तरी कोणीही त्यांच्याविरुद्ध बोलू नये असे त्यांना वाटते. यासाठीच तर वेगवेगळे निमित्त आणि कारणे निर्माण करून त्यांनी सामान्य माणसं, विचारवंत, लेखक, पुरोगामी चळवळीतील सामाजिक नेते, निर्भिड, निरपेक्ष व निःष्पक्ष पत्रकार यांच्यावर बंधने लादली आहेत. त्यांना अटक करण्याच्या धमक्या देऊन त्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तोच प्रयत्न सर्वोच्च न्यायालयासह संपूर्ण न्यायव्यवस्थेवर लागू करण्याचा त्यांचा कुटील डाव आहे. अशा परिस्थितीत सामान्य माणसांच्या हितासाठी, देशात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता अधिक सुदृढ व्हावी आणि धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाही राज्य टिकून राहावे यासाठी सर्वोच्च न्यायालयाची खंबीर आणि संवैधानिक भूमिका फार महत्त्वाची असून देशाला अराजकतेपासून दूर ठेवण्यास समर्थ आहे आणि हीच संविधाची खरी शक्ती असून संविधान सर्वश्रेष्ठ आहे. जय भारत, जय संविधान...!

## लोकजागर

# पुण्याचे हरित रक्षक



देशभरातील सर्वाधिक सक्रिय स्वयंसेवी संस्था असलेल्या शहरांमध्ये पुण्याचा समावेश पहिल्या पाच क्रमांकातील शहरांमध्ये होतो. एवढेच नव्हे तर सर्वाधिक निसर्गाबद्दल जागरूक आणि संवेदनशील नागरिक असलेल्या शहारांमध्येही पुणे पुढे आहे. अर्थात निसर्ग सेवा करणे हे सोपे काम नाही. एकीकडे प्रत्येकाला जीवनशैली सुधारण्यासाठी शहराचा विकास व्हावा, असा विचार घराघरातून पुढे येत असताना, प्रशासनासमोरही विकास हेच प्राधान्य असताना या विचारशक्ती विरोधात लढण्याचे आव्हान या निसर्ग सेवकांनी स्वीकारेल आहे. विकास प्रकल्पांमध्ये खो घालणारी मंडळी अशी टीका सातत्याने होत असताना प्रवाहाच्या विरोधात जाऊन सारंग यादवाडकर, विनोद जैन, सुजीत पटवर्धन, विवेक वेलणकर, सुनील जोशी, विनोद बोधनकर, ॲड. असीम सरोदे, प्रभाकर कुकडोलकर, राजीव पंडित असे अनेक कार्यकर्ते पर्यावरणासाठी लढत आहेत.

**लोकसेवार्थ**

या मंडळींचा विकासाला विरोध नाही; परंतु त्यात पर्यावरणाचा विचार झाला पाहिजे, शाश्वत विकासाचा प्राधान्य मिळावे, हा त्यांचा उद्देश आहे. शहरातील पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी विविध संस्थातर्फे राबविण्यात येत असलेल्या अभिनव उपक्रमांमुळेच नागरिकांमध्ये आजही निसर्गाप्रती काही अंश संवेदनशीलता टिकून आहे. निसर्गाबद्दल तरुणांमध्ये असलेल्या कुतूहलाला चालना देण्यासाठी प्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ किरण पुरंदरे यांनी २००४ मध्ये नेचरवॉक संस्था स्थापन केली. शास्त्रज्ञ, संशोधकांच्या भाषेत नव्हे तर सर्वसामान्यांच्या भाषेत लोकांपर्यंत निसर्गाचा खजिना पोहोचविण्याचा या संस्थेचा उद्देश पुढे अनुज खरे आणि त्यांच्या टीमने संस्थेची व्याप्ती वाढवली. गेल्या २४ वर्षांपासून संस्थेतर्फे पर्यावरणाबद्दल जागृतीसाठी असंख्य प्रकाराचे कार्यक्रम राबविण्यात आले असून, विविध क्षेत्रातील शेकडो निसर्गप्रेमी संस्थेशी जोडले गेले आहेत. संस्थेच्या स्थापनेपूर्वीपासून सुरू करण्यात आलेल्या कट्टा या उपक्रमाला आता २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी भरणारा या निसर्ग कट्टा सर्वासांठी विनामूल्य खुला असतो. अवघ्या पाच वर्षांच्या मुलांपासून ते ७५ वर्षांचे आजोब असे विविध वयोगटातील लोक या कट्ट्याचे सभासद झाले आहेत.

निसर्गातील विविध पैलूंवर काम करणारी मंडळी हौसेने कट्ट्यावर येऊन नागरिकांना मार्गदर्शन करतात. वाईल्ड इंडिया या उपक्रमातून संस्थेने मुंगीपासून हत्तीपर्यंत, दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या विविध राज्यातील जंगलांवर आधारित अनेक दुर्मिळ चित्रपट दाखविले आहेत. अनेक प्रसिद्ध वन्यजीव फोटोग्राफर संस्थेशी जोडलेले आहेत, दर काही दिवसांनी आयोजित करण्यात येणाऱ्या त्यांची छायाचित्रांचे प्रदर्शने म्हणजे पर्वणीच ठरते. तसेच दरवर्षी पक्षी विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी होणाऱ्या बर्ड फेस्टही आयोजित केले जाते.विविध क्षेत्रांतील उत्साही मंडळी निसर्गप्रेम या एका धाग्यातून तीस वर्षांपूर्वी एकत्र आली. यातूनच शशी पटवर्धन, श्रीधर केतकर, डॉ. रमेश गोडबोले यांच्या टीमने निसर्ग सेवक संस्थेची स्थापना केला. या संस्थेने शहराला स्मृतिवन आणि स्मृतिउद्यान हे दोन अभिनव प्रकल्प दिले.

ऱ्हास झालेल्या नैसर्गिक अधिवासांना पुनरुज्जीवत करण्याचे ध्येय निश्चित करून स्थापन करण्यात आलेली इकॉलॉजिकल सोसायटी एक नामांकित संस्था. पर्यावरणाबद्दल शिक्षण, संशोधनाला प्रोत्साहन आणि जनजागृती या तीन सूत्रांचा आधार घेऊन ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ डॉ. प्रकाश गोळे यांच्या पुढाकाराने १९८२ मध्ये सोसायटीची स्थापन केला. या संस्थेतर्फे गेल्या तीन दशकांमध्ये पानशेत धरणाच्या मागील बाजूस जंगलाचे पुनरूज्जीवन, पाणथळ जागांचा विकास, कुरण विकास असे प्रकल्प राबविले आहेत. मुठा नदीच्या विकासाचा विचार अलीकडील काही वर्षात सुरू झाला; पण संस्थेने वीस वर्षांपूर्वीच मुठा नदीवर रिव्हर फ्रंट प्रकल्प कसा होऊ शकतो, या संशोधनपर अहवाल केला होता. संस्थेने १९९९मध्ये सुरू केलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनाचा अभ्यासक्रमाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आत्तापर्यंत संस्थेचे एक हजारांहून अधिक विद्यार्थी निसर्ग संवर्धन क्षेत्रात कार्यरत आहेत.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 41

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | ब | ल | व | त्ता | र |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | म | त | म | तां | त | र | | | | | |
| | | | | | | ड | | | | | | | |
| | | | | | | व | | | | | | | |
| | | | | | | नृ | | | | स | | | |
| ढ | क | ल | गा | डी | | त्य | | | | र | | | |
| | | | | | | | | | | ब | | | |
| | | | | | | | | | | रा | | | |
| | | | | | | | | | | ई | | | |
| | | | | | | | | | | | | | |

### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
- उभा
- कम
- कव
- कळी
- कोड
- कोस
- खंत
- चल
- ताक
- ताबा
- दिल
- धड
- धुनी
- नड
- नीत
- बल
- भाई
- भाक
- भान
- भार
- भाष्य
- मध
- रत
- रत
- रवा
- राव
- लव
- वास
- वास्तु
- शशी
- शीत
- सुर
- सुरा
- स्थिर
- हात
- हाव

**तीन अक्षरी**
- अनिल
- ओसरी
- उदय
- कसब
- कस्तुरी
- कीटक
- खंदक
- तथास्तू
- नंबर
- नुपूर
- पानगा
- प्रलय
- बदक
- बहाणा
- भराडी
- महाल
- वजीर
- शालक
- सुगावा

**चार अक्षरी**
- उपचार
- दैनंदिनी
- धनवान
- निरुत्तर
- बटलर
- मधुमती
- रवानगी
- वरचढ
- वस्तूस्थिती
- शाबासकी
- सरकार

**पाच अक्षरी**
- उदरभरण
- कलमवार
- कोनमापक
- ढकलगाडी
- तांडवनृत्य
- दीड शहाणा
- बलवत्तर
- लकडापूल
- लतकोडगा
- भविष्यवादी
- सरबराई

**अन्य अक्षरी**
- मत मतांतर

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | र | ण | | स | ब | ला | | म | क | र | सं | क्रा | त |
| म | जा | | | व | | ज | टा | यू | | सा | ग | | |
| व | | बा | गु | ल | बो | वा | | र | ज | त | | | अ |
| य | ज्ञ | | | त | ल | ब | | | का | ळ | भै | र | व |
| स्क | | | ठे | | का | | छा | | त | | र | | रो |
| | सा | व | का | र | | उ | पा | स | ना | | व | रा | ह |
| सा | | रू | | क्त | | र्म | | र | का | ना | | म | |
| ख | म | ण | | वा | व | ट | ळ | | | म | | बा | ष्प |
| र | त | | अ | हि | त | | | ना | मो | नि | शा | ण | |
| | म | न | मा | नी | | म | | | | र्दे | | | |
| | तां | | व | | कृ | त | यु | ग | | श | कु | नी | |
| | त | प | स्या | | षी | | रे | व | ती | | व | | तु |
| त | र | | | कृ | | दा | न | त | | अं | त | रा | ळ |
| सू | | ए | क | पा | ठी | | स | | व्या | ध | | ख | स |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 420

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | | 3 | | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | | | 9 |
| | | | | 10 | 11 | | | | | | 12 | | | 13 | |
| 14 | | | | | | | 15 | | | | | | 16 | | |
| | | | | | 17 | 18 | | | | | 19 | | | | |
| | 20 | | 21 | | | | | 22 | | 23 | | | | | |
| 24 | | | | | 25 | | 26 | | | 27 | | | | 28 | |
| | | 29 | | 30 | | | 31 | | | | | | 32 | | |
| 33 | | | 34 | | | | | | | 35 | 36 | 37 | | | |
| | | 38 | | | | 39 | | | 40 | | 41 | | | 42 | |
| | | | | 43 | | | | | 44 | 45 | | | | | |
| 46 | | | | | | 47 | | 48 | | 49 | | | 50 | | 51 |
| | | 52 | 53 | | 54 | | | 55 | | | | 56 | | | |
| 57 | | | 58 | | | | 59 | | | 60 | | | 61 | 62 | |
| | | 63 | | | | 64 | | | 65 | | | 66 | | | |
| | 67 | | | | | | 68 | | | | 69 | | | | 70 |
| 71 | | | | | 72 | | | | | 73 | | | | 74 | |

**—: आडवे संकेत :—**

1) पिशाच्च झालेला विद्वान ब्राह्मण
4) भाषांतर, स्पष्टीकरण
7) रडण्याचा उमाळा
10) हातचलाखी, इंद्रजाल
12) खेळण्याची वेळ, द्वेष, मत्सर
13) सन्मानाची एक पदवी
14) सुंदर अवयव असलेली स्त्री
15) राखण करणारा, पालक (हिं.)
16) ज्याला कुणी जिंकू शकत नाही असा
17) राष्ट्रभाषेत औषध
21) देखावा दाखविणे
23) मृतास जीवंत करणारी एक वनस्पती
24) मनातल्या कल्पना शब्दांच्या द्वारे प्रगटविण्याचे साधन, बोली
25) विष्णूचा चवथा अवतार
27) प्रसिद्धी, लौकिक
29) एक शुभकारक चिन्ह
31) खेळात अपयशी होणे
32) चित्ताकर्षणासाठी केलेला खोटा हावभाव
33) मृदु
34) एक वृक्ष विशेष
35) मोठे शहर
38) कुटुंब, जात, वंश
39) गुण दोष विवेचन, साधक बाधक टीका
41) काळजी, सांभाळ
42) अग्निची ज्वाला
43) चापट
44) सैन्याचा समुदाय
46) पुढील अर्धा भाग
47) कर्ज देणारा
49) तुझे (सं.)
52) कैफ, धुंदी
54) अक्षरापुढील 'आ' काराची उभी रेघ
55) उणे करणे, कमी करणे
56) कोंबड्याचे आरवणे
57) अधिकार पद,
58) लहान मुलगी
59) पत्नीचा भ्राता
60) दिवाणी कोर्टातला अंमलदार,
61) आकाशयान, अंतराळातून प्रवास करण्याचे साधन
63) नाकाने किंवा तोंडाने आत बाहेर घेतलेला किंवा सोडलेला वायू
64) एखाद्याचे वाईट व्हावे म्हणून केलेला वाक्यप्रयोग
65) ग्रंथाचा भाग, तुकडा
66) हरकत, विरोध, आडकाठी
67) हुंगण्यासाठी असलेली तंबाखुची पुड
68) एखादी गोष्ट सिद्ध करण्याचा नियम
69) जनावरांचा समुदाय, जमाव
71) कृपा, अनुग्रह
72) लग्नास आलेली मंडळी
73) घरात असलेले एक औषधोपयोगी झाड
74) पान, पडणे

**—: उभे संकेत :—**

1) स्त्री संग परित्यागाचे व्रत आजन्म किंवा काही काळापर्यंत करणारा ब्राम्हण
2) वनगाय
3) शिक्षा, दंड (हिं.)
5) पैंजण, चाळ
6) द्वारपाल
7) मुलीच्या लग्नाच्या वेळी वधूच्या पित्यातर्फे वर पक्षास देण्यात येणाऱ्या वस्तु वा रोख रक्कम
8) रात्रीच्या वेळी हवेच्या आर्द्रतेमुळे भूतलावर पडणारे थेंब
9) खाली उतरणे, ग्रंथातील उतारा
11) टेलिव्हीजनचे मराठीकरण
13) कबूल, अनुकूल, तयार
16) पृथ्वी, धरणी
18) माकड, बंदर
19) दुर्गती, वाईट स्थिती,, पचडा
20) मुलाची पत्नी
21) स्तुतीपत्रक, प्रशंसा करणारे पत्र
22) प्राणघातक विषारी द्रव्य
23) अंक, आंकडे
24) जादुगरी, हातचलाखी
26) मागच्या इतिहासाकडे सिंहासारखे अभिमानाने वळून पाहणे
28) विशेषतः थंडीच्या दिवसातील पहाटेची झोप
30) दु:ख, चावी, किल्ली
32) दागिना, पर्वत
36) भावनादर्शक अभिनय
37) दृष्टी
38) श्रीकृष्णाने एका करंगळीवर उचललेला प्रसिद्ध पर्वत
39) उपासना, पूजा
40) एखाद्या गोष्टीची अतिशय आवड, छंद
43) चेहऱ्यावर वगैरे पडलेला पांढरा डाग
45) खोड, दुर्गुण
46) यज्ञाच्या शेवटी सर्व देवतांना दिलेली आहुती
48) अपक्क, लहान, कोमल
50) शरीराचे हावभाव, अभिनय
51) ललकारणे, युद्धास बोलावणे
53) चांगल्या कामाबद्दल पाठ थोपटणे
54) वडिलांचा भाऊ
59) लहान मुलांचा एक बैठा खेळ
60) हलका नसलेला, वजनदार
62) वजन, तोल
63) हिंस्त्र पशू, मांसभक्षक पशू
65) खेद, खिन्नता
66) कंटाळा, सुस्ती
67) तशा प्रकारे, त्यासारखा
69) लावालावी, भांडण
70) पुत्र, मुलगा

(उत्तर पुढील अंकी )

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | क | ला | का | र | | | क | म | ला | क | र | | | आ | का |
| म | | ग | | स | | आ | स | | व | | फ | | ज | का | त |
| न | | व | | दा | द | र | | न | वा | | | क | ल | श | |
| | धा | ड | | र | | मा | र्गा | रे | ट | थॅ | च | र | | गं | गा |
| स्ने | | | | | श | र | | श | | | क्र | | कं | गा | ल |
| ह | ता | श | | बा | ला | | सु | | गं | गा | ध | र | | | |
| स | ज | व | णे | | का | र्ति | के | य | | | र | | वा | न | र |
| म्मे | | | | कै | | | शि | स | का | री | | | द | | म |
| ल | लि | ता | प | वा | र | | नी | | | | अं | ज | न | | |
| न | | रा | | री | ग | न | | अ | | ना | बा | द | | | डा |
| | अ | पू | र्ण | | | ट | | शो | क | | बा | | | सा | व |
| खं | ज | र | | अ | ना | व | श्य | क | | स | ई | प | रां | ज | पे |
| | रा | | अ | ना | व | र | | च | क | मा | | त | ग | | च |
| अ | म | र | ना | थ | | ला | | क्र | | धा | | क | | स | |
| पा | र | | मि | | क | ल | ह | | धा | न | | र | म | जा | न |
| र | | आ | का | श | | | वा | स | र | | क | णे | र | | ऊ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज व्यवसायात नवीन भागीदारी. नोकरीत पदोन्नती असू शकते. तुम्ही मित्रा पर्यटनस्थळी सहलीला जाऊ शकता.

**वृषभः** आज जुने मालमत्तेचे वाद मिटेल. तुम्ही संपत्ती मिळवू शकता. व्यवसायाशी संबंधित व्यापारी वर करा. स्थिती उत्पन्नाचे संकेत आहेत.

**मिथून :** तुमच्या वैवाहिक जीवनात तुम्ही जोडलेले तुम्हाला विशेष जीवन आणि आनंदाने खूप आनंद होईल. पती-पत्नीतील आसक्ती आणि आकर्षण विकासेल.

**कर्क :** आज तुमच्या हृदयात प्रेमाचे बीज अंकुरेल. तुम्हाला कोणी-तरी आवडू. विद्यार्थी नवीन मित्र मित्र करतील. सामाजिक कार्यात निस्वार्थपणे काम केल्याबद्दल तुमचा सन्मान होईल.

**सिंह :** आज तुमची आई असू शक-ते. कुटुंबात वादात पडणे देणे. अन्यथा प्रकरण पोलिसीच असेल. मूळ प्रेमसंबंधांमध्ये मतभेद होऊ शकतात.

**कन्या :** आज तुम्ही चांगले पैसे कमवू शकता. न्यायालयीन कामात सहभागी होणाऱ्या लोकांना विशेष लाभ मिळेल. तुमची समजूतदारपणा व्यवसायात फायदेशीर ठरेल.

**तुळ :** आज अभ्यास आणि अध्यापनात रसेल. शासन तंत्र शिक्षण घरापासून दूर जावे. कामाच्या ठिकाणी परिश्रमपूर्वक काम करण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** आज तुमचे आरोग्य चांगले. . सुंदर तो परिस्थिती. प्रवास करताना तुमची आरोग्याची विशेष काळजी घ्या.

**धनु :** आजच्या बाबींमध्ये निर्णय घ्या. तुमची गुप्त धोरणे उघडे पाडणे. सामाजिक कार्य आणि धार्मिक कार्यात रसेल.

**मकर :** आज तुम्ही आर्थिक प्रयत्न करू शकता. आधी जोडलेले पैसे. नवीन प्रोत्साहन, अतिरिक्त वाहन खरेदी करण्याची संधी आहे. उल्लेचे उत्पन्न चालू तुमचा खर्च देखील त्याच्या पक्षात असेल.

**कुंभ :** आज, कानाशी संबंधित कोणत्याही गंभीरतेने त्रस्त असलेल्या लोकांना प्रगती चिंतेचा सामना लागू करू शकतो. आरामदायी सुविधा लक्ष द्या. अयोग्य दिनचर्येपासून सावध रहा.

**मीन :** आज, ज्या लोकांकडून तुम्हाला आर्थिक मदतीची अपेक्षा आहे ती ताकद दाखवून तुमचा विश्वासघात करतील. आदर्शांच्या कमतरते मूळ तुमचे काही काम बिघडेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### सरन्यायाधीश गवई यांच्या नियुक्तीचा महानगरात जल्लोष



**अकोला:** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपदी न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती झाल्याच्या पार्श्वभूमीवर अकोला शहरात आणि जिल्हा न्यायालयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अकोला बार असोसिएशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मिष्टान्न वाटप करून जल्लोष करण्यात आला.या विशेष प्रसंगी बार असो.चे अध्यक्ष ॲड. हेमसिंह मोहता यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली. यावेळी महाराष्ट्र ॲण्ड गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मोतीसिंह मोहता, माजी अध्यक्ष ॲड. महेंद्र शाह, ॲड. सी. एन. वानखडे यांनी न्यायमूर्ती गवई यांच्या कार्यप्रवासाची माहिती उपस्थितांना दिली.न्यायमूर्ती भूषण गवई यांचे अकोल्याशी विशेष ऋणानुबंध असून, त्यांनी जिल्हा न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती दर्शविली होती. तसेच ९ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा न्यायालयात उभारण्यात आलेल्या बाबासाहेबांच्या चित्राचे अनावरण देखील त्यांच्या हस्ते झाले होते. या कार्यक्रमात ॲड. इल्यास शेखानी, ॲड. अली राजा खान, ॲड. परवेज मुजाहिद, ॲड. आयुब नौरंगाबादी आदींनी विधिज्ञ व पक्षकारांना मिष्टान्न वाटप करून सरन्यायाधीश गवई यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ सचिव ॲड. शिवम शर्मा यांनी केले.उपस्थित मान्यवरांमध्ये ॲड. संतोष वाघमारे, ॲड. प्रशांत ठाकरे, ॲड. दीपक काटे, ॲड. अनिस अहमद, ॲड. राहुल इंगळे, ॲड. बी. एम. इंगळे, ॲड. अब्दुल शकील, ॲड. इजहार रशीद, ॲड. अहमद रजा खान, ॲड. आमिर खान, ॲड. धीरज शुक्ला, ॲड. सचिन इंगोले, ॲड. विनय आठवले, ॲड. इजाज देशमुख यांच्यासह बहुसंख्य विधिज्ञ, कर्मचारी व पक्षकारांचा सहभाग होता.

### काढून ठेवलेला कांदा कापणीच्या कामाची लगबग!

**बाळापूर:** सध्याच्या परिस्थितीत काढून ठेवलेला उन्हाळी कांदा पीकाची कापणी च्या कामाची लगबग सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे रब्बी हंगामात तालुक्यात गहू हरभरा उन्हाळी ज्वारी बाजरी मका तिळ पीकासह उन्हाळी कांदा पीकाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात येत असते तर सध्याच्या परिस्थितीत उन्हाळी कांदा पीकाला कालावधी पूर्णत्वास असुन कांदा पीकाची कापणी करण्यासाठी काढून ठेवलेला कांदा कापणीच्या कामाची लगबग निदर्शनास येत आहे तर मागील आठवड्यात तालुक्यात वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस पडल्याने लिंबू भाजीपाला तसेच कांदा पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे मुळात कांदा पीकाची कापणी केल्यावर शेतातच झाडाखाली किंवा झाड नसलेल्या शेतात सावलीची व्यवस्था करण्यात येवून जवळपास आठ ते दहा दिवस कांदा शेतातच ठेवला जातो परंतु वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस पडल्याने तसेच मागील अलीकडच्या दिवसात वातावरणात होणारा फेरबदल तसेच ढगाळ वातावरण यामुळे कांदा उत्पादक शेतकरी कांदा पीकाची कापणी करून ताबोडतोब साठवणूक करीत आहेत त्यामुळे साठवणूक करण्यात असलेला कांदा आजमितीस असलेले उष्णतामान नुकसान कारक असल्याचे कांदा उत्पादक शेतकरी यांच्या कडून सांगितले जात आहे .

## निधन वार्ता

### कुसुम खिरकर



**अकोट:** बोर्डी येथील प्रतिष्ठित नागरिक गजानन खिरकर यांची आई कुसुम जगन्नाथ खिरकर यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या मागे दोन मुली,दोन मुल,सुना,नातवंड,मोठा आप्तपरिवार आहे.

### दीपक सोळंके



**मुर्तिजापूर:** लकडगंज जुनी वस्ती येथील रहिवासी तथा विदर्भ मतदार दैनिकाचे तालुका प्रतिनिधी रोहित सोळंके यांचे जेष्ठ बंधू दिपक साहेबराव सोळंके यांचे दि.१४ में रोजी सकाळी ९.०० वाजता हृदयविकारामुळे दुःखद निधन झाले आहे. आपल्या मागे ते एक मुलगा, पत्नी, भाऊ असा बराच मोठा आप्त परिवार मागे सोडून गेले आहेत.त्याच्या वर दि.१५ में रोजी सकाळी ९.०० वाजता खदान हिंदू स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.

### भीमराव धांडोरे



**गुडधी:** येथील रहिवासी आणि हसतमुख स्वभावाने सर्वांच्या मनात आपले स्थान निर्माण करणारे भीमराव हिरामण धांडोरे (वय ८० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दिनांक १४ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या अंतिम यात्रा बुधवार, दिनांक १५ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गुडधी येथील त्यांच्या राहत्या घरून निघणार आहे.ते अत्यंत प्रेमळ, शांत आणि मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या निधनाने गावात शोककळा पसरली आहे.

# पावसामुळे रस्ते झाले तलाव

## महापालिकेच्या भोंगळ कारभारावर नागरिक संतप्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** अकोल्यातील रामनगर परिसरातील रस्त्यावर साचलेले पाणी, महापालिकेच्या निष्क्रियतेचे उदाहरण ठरले आहे. मंगळवारी आलेल्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. नाल्यांची योग्य व्यवस्था आणि बांधकाम न झाल्याने रस्त्यांवर पाणी साचत आहे, महापालिकेने पावसाळ्यापूर्वी आवश्यक नियोजन न केल्याने नागरिकांच्या हालअपेष्टांची परिस्थिती निर्माण झाली आहे.

मे महिन्यात उष्णतेचा चटका बसत असतानाच मंगळवारी दुपारी अचानक



आलेल्या विजांच्या कडकडाटासह वाऱ्याच्या झंझावाताने आणि मुसळधार पावसाने शहरात अक्षरशः हाहाकार माजवला. अवघ्या काही मिनिटांच्या पावसाने अकोल्यातील रस्ते जलमय झाले असून, अनेक ठिकाणी पाणी साचून राहिल्याने नागरिकांच्या हालांना अंत राहिला नाही. शहरातील डाबकी रोड, सिटी कोतवाली परिसर, रामदास पेठ, जठरपेठ,रामनगर सह शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर तलावासारखी स्थिती निर्माण झाली. पावसाळ्यापूर्वी नाल्यांची

» महापालिकेच्या भोंगळ कारभारामुळे शहरातील सांडपाणी व्यवस्थापन ढासळले असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे. पाणी साचल्यामुळे डासांचे साम्राज्य वाढण्याची शक्यता असून, आजारांचीही भीती व्यक्त केली जात आहे.शहरातील नागरिकांतून संताप व्यक्त होत असून, महापालिका प्रशासनाने याबाबत तत्काळ कारवाई करावी आणि आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

स्वच्छता, जलनिकासी व्यवस्था दुरुस्त करणे महत्त्वाचे असते, परंतु नेहमीप्रमाणे यंदाही महापालिकेने याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे. उन्हाळ्याच्या काळातच नियोजन करून नालेसफाई केली असती, तर शहरवासीयांना अशा त्रासाला सामोरे जावे लागले नसते.

# शांतीनिकेतन इंग्लिश स्कूलचा सलग सातव्या वर्षीही १०० टक्के निकाल



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १४ :** येथील शांतीनिकेतन इंग्लिश स्कूलचा सतत सातव्या वर्षीपण कोणतेही शिकवणी वर्गाला न जाता स्वतः प्रयत्न केले तर विध्यार्थी यश संपादन करू शकतो हे सिद्ध करून शाळेचा १०० टक्के निकाल लावला आहे. आणि तोही सेल्फ स्टडी करून शाळेचे तसेच त्याच्या पालकांचे विध्यार्थ्यांनी नाव लौकिक केले. शाळेतून प्रथम येणारा युग इंगळे, मृण्मयी चहाकर, साहिल गोपनारायण यांनी सिद्ध केले. शाळेतून एकूण २१विध्यार्थी परीक्षेत प्रविष्ठ झाले होते. त्यात प्रथम युग इंगळे (८८%), द्वितीय मृण्मयी चहाकर, (८७.४०%)तृतीय साहिल गोपनारायण,(८७.४०%), ख़ुशी उगले (८६.२०%), ओम डहाके (८६.२०%), आदित्य शेकोकार (८४.४०%), मयुर ठोकणे (८२.४०%), मंथन घनोट (७६.४०%), श्रुती चांदुरकर (७२.८९%), राजवीर अनभोरे (७२.२०%), श्रावणी गोरले (७०%), शेख अकमल (६८.८०%), सम्राट चक्रनारायण (६६.८०%), समीक्षा वर्घट (६४.४०%), विपुल कळंब (६४.२०%), सार्थक तातूरकर (६३.२९%)सार्थक घाटे (५८.६०%), जिशान उल्ला खान (५६.४०%), चंचल पांडे (५३.६०%), मो. अनस (५३%), प्रथमेश घाटे (४७.२०%) सर्व विध्यार्थी, पालक व संपूर्ण शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थे चे अध्यक्ष प्रतिभा गवळी,सचिव प्रशांत चहाकर, प्रवीण चहाकर, मनिष लेव्हरकर, दीपाली तिडके, प्रशांत गवळी, जयश्री चहाकर यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले. असे शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री तिडके यांनी सांगितले.

# छत्रपती संभाजी महाराज हे शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक - डॉ. अंधारे



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे,प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक लेखक प्राचार्य डॉ रमेश अंधारे, इतिहास विभागाचे प्रमुख डॉ नाना वानखडे,आय.सी.आय.सी बँक चे शाहुल चितोडे,महाविद्यालयाचे प्रबंधक राजेश गीते,शिवशंकर मोडक, विलीन धोत्रे, शेगोकार उपस्थित होते. जेष्ठ साहित्यीक कवी लेखक प्राचार्य डॉ प्रकाश अंधारे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रम व शौर्याची गाथा सांगितली. प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नंतर स्वराज्याचे रक्षण छत्रपती संभाजी महाराज यांनी कशा पध्दतीने केले या बद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ नाना वानखडे,संचालन व आभार प्रदर्शन रोहन बुंदेले यांनी केले.

# वैशाख पौर्णिमेच्या लखख प्रकाशात काटेपूर्णा अभयारण्यात पार पडली प्राणीगणना

## निसर्गप्रेमींना बिबटासह वन्यजीवांचे थरारक दर्शन



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ : वैशाख पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात न्हालेलं जंगल, सभोवती नीरव शांतता आणि मचाणावर बसलेले डोळस निसर्गप्रेमीहीच होती काटेपूर्णा अभयारण्यात पार पडलेल्या प्राणीगणनेची जिवंत झलक. रात्रभर जागून प्राण्यांच्या हालचाली टिपत काहींना बिबटाचंही थरारक दर्शन झालं. जंगलातील प्रत्येक आवाज, पानवठ्यावर उमटणाऱ्या पावलांचे प्रतिबिंब, आणि त्या चंद्रप्रकाशातील अनुभव, निसर्गाशी नातं अधिक घट्ट करत गेला.**

वैशाख पौर्णिमेच्या तेजस्वी चंद्रप्रकाशात वाशीम-अकोला सीमेवरील काटेपूर्णा अभयारण्यात वन्यजीवांची वार्षिक प्राणीगणना उत्साहात पार पडली. १२ मे रोजी दुपार पासून सुरू झालेल्या या उपक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या सुमारे १०० हून अधिक निसर्गप्रेमींनी रात्रभर मचानावर जागून निसर्गसंपदेला डोळ्यांत साठवले.

अभयारण्यात नैसर्गिक व कृत्रिम अशा पानवठ्यांजवळ १० मचाने उभारण्यात आले होते. रात्रीच्या गारव्यात आणि चंद्रप्रकाशात वन्यप्राणी पाणी पिण्यासाठी पानवठ्यांवर आले, तेव्हा त्यांच्या हालचालींची नोंद निसर्गप्रेमींनी घेतली. काटेपूर्णा अभयारण्य हे बिबट, नीलगाय, चितळ, सांबर, रानडुक्कर, रान कुत्री तसेच दुर्मिळ पक्ष्यांच्या वास्तव्याने नटलेले आहे. या गणनेदरम्यान एकूण ३६९ प्राण्यांची नोंद झाली असून, यात बिबट (३), चितळ (८७), नीलगाय (६४), रानडुक्कर (६), (५७), कोल्हा (९), उदमांजर (५), रानमांजर (६),रानकुत्री (३) सया (४), वानर (७५) अस्वल ( १) समावेश होता. काही पर्यटकांना मध्यरात्री बिबटाचे प्रत्यक्ष दर्शनही घडल्याने थरारक अनुभव मिळाला.

वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांनी सांगितले की, ''प्रत्येक वर्षी वैशाख पौर्णिमेला 'निसर्ग अनुभव' या उपक्रमांतर्गत प्राणीगणनेचे आयोजन केले जाते. यंदा अवकाळी पावसामुळे थोडा अडथळा झाला तरीही उपक्रम यशस्वी झाला.''

प्रकृतीच्या कुशीत मिळालेला हा अनुभव निसर्गप्रेमींना आयुष्यभर आठवणीत राहील, अशी भावना सहभागी पर्यटकांनी व्यक्त केली.

# घनकचरा संकलनासाठी तीन निविदा प्राप्त

## कागदपत्रांची पडताळणी सुरू ; निविदा उघडणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** शहरातील घनकचरा संकलनाचे काम कंत्राटदाराला देण्यासाठी महापालिकेने निविदा प्रसिद्ध केली असून तिन निविदा प्राप्त झाल्या आहेत. अद्याप ह्या निविदा उघडल्या नसून कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे.

अकोला शहरात दीड लाखाहून अधिक मालमत्ता आहेत. यामध्ये निवासी मालमत्तांसह व्यावसायिक आस्थापना तसेच इतर प्रतिष्ठान असून सद्यस्थितीत महापालिका स्तरावर ट्रॅक्टर व कचरा घंटागाड्यांद्वारे कचरा संकलनाचे काम सुरू आहे. मात्र, प्रभावीपणे कचरा संकलनाचे काम होत नसल्याने अनेक ठिकाणी कचरा साचलेला दिसून येत आहे. घनकचरा संकलनात महापालिकेचा मोठ्या प्रमाणात खर्च होत असून घनकचरा व्यवस्थापनाचे उद्दिष्ट पूर्ण होत नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशानुसार स्वच्छता विभागाने घनकचरा संकलनाचे काम देण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. सदर कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या असून कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. घनकचरा संकलनाचे दर ठरविण्याचे अधिकार महापालिकेला राहणार आहेत. सद्यस्थितीत घरोघरी कचरा संकलनासाठी ३० रुपये महिना आकारला जातो. तर लहान व्यावसायीकांकडून १०० आणि मोठ्या व्यावसायीकांकडून २०० रुपये महिना आकारला जातो. हे दर ठरविण्याचे अधिकार महापालिकेकडेच राहणार आहेत.

### १२ लाखांचा खर्च वाचणार

शहरातून दैनंदिन अडीचशे मेट्रिक टन घनकचरा संकलित केला जात असून या कचऱ्यावर भोड या ठिकाणी प्रक्रिया करून जैविक खत निर्मिती तसेच बायोगॅसपासून विज तयार केली जात आहे. कचरा गोळा करणाऱ्या वाहनांवर महिन्याकाठी १२ लाख रुपयाचे डिझेल लागते. तसेच देखभाल दुरुस्तीचा खर्चही करावा लागतो. या खर्चाच्या तुलनेने महापालिकेला कोणताही महसुल मिळत नाही. मात्र हे काम कंत्राटी पद्धतीने दिल्यानंतर संबंधित कंत्राटदार मिळणाऱ्या उत्पन्नातून काही टक्के रक्कम महापालिकेला रॉयल्टी म्हणून देईल. त्यामुळे मनपाचा खर्च वाचणार आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अकोला:** समाजकल्याण विभागाचा मागासवर्गीयांसाठी राखीव निधी इतर खात्यांकडे वळविण्यात आल्याच्या निषेधार्थ राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन दिनांक १४ मे रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या या निर्णयामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, प्रशिक्षण योजना, बार्टीमार्फत परदेशी शिक्षणासाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती तसेच विविध कर्ज योजनांवर विपरित परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली. समाजकल्याण खात्याचा निधी आधीच अपुरा व वेळेवर न मिळणारा असताना, तो इतर खात्यांमध्ये वळविला जाणे हा सरळ अन्याय असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, समाजातील सर्वात दुर्बल घटकांसाठी कार्यरत असलेल्या योजना सरकारकडून दुर्लक्षित केल्या जात आहेत. या निर्णयामुळे हजारो गरजू विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असून, शिक्षण व आर्थिक स्वावलंबनाच्या संधीही कमी होतील.

# मांडेकर परिवारात १०० वर्षांच्या तपस्वी आजीची उत्तम देखभाल!

## आज जागतिक एकत्र कुटुंब दिन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १४ :** दिवसेंदिवस घरातील वृध्द, आई-वडिलांची सेवा दुरापास्त होत चालली असून, त्यांच्या म्हातारपणाच्या त्रासापासून दूर कसे राहता येईल ही पद्धत दिसून येत असताना जुने शहरात पाच बंधूंचा मांडेकर परिवार एकत्र कुटूंबात नांदत असून, आईची १०० व्या वर्षानंतरही सेवा घडत असल्याने धन्यता मानत आनंद व्यक्त करीत आहे.





परिवारातील कर्ते पुरुष महादेव मांडेकर आज ८० वर्षाचे आहेत तर त्यांची आई श्रीमती रमाबाई रामभाऊ मांडेकर यांनी शंभरी पार केली आहे. परिवारात महादेव, पुरुषोत्तम, गोपाल, रामदास, ज्ञानेश्वर हे पाच भाऊ व त्यांच्या पत्नी सौ. लताबाई, सौ. नंदाबाई, सौ.सीमाताई, सौ. शिलाताई, सौ. वर्षाताई यांच्या वैचारिक देवाण-घेवाण व त्यागमय कार्यपद्धतीत चुकीच्या बाबींकडे नजर अंदाज करण्याच्या धोरणाने मांडेकर परिवार आजही संयुक्त कुटुंब पद्धतीने नांदत आहे. सुख-दुःखाच्या जीवनक्रमाच्या टप्प्यात प्राधान्य देत सामाजिक, सांसारिक जबाबदारीने परिवारातील सदस्य कार्यरत आहेत. स्वर्गीय रामभाऊ यांनी केलेल्या उत्तम संस्काराची, धार्मिक आचरणाची जाणीव ठेवून मांडेकर परिवारातील अनेक सदस्य सामाजिक, धार्मिक व कौटुंबिक कार्यात अग्रेसर आहेत. परिवारात बुद्धीची देवता गणपती यांचा दहा दिवसांचा उत्सव पारंपारिक पद्धतीने व उत्साहात साजरा केला जातो तर निर्जला एकादशीच्या दिनी २४ तास धार्मिक वेद-पठणासह अभिषेक केला जातो. ऋषभ राजाचा सण पोळा, परिवारात वर्षात उत्तम कामगिरी करणा-या सदस्याला प्रोत्साहन, २१ मे रोजी वडिलांची पुण्यतिथी नव सदस्यांना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी नियमित स्वरूपात उपक्रम आयोजित केले जातात. या धावपळीच्या काळात रमाबाईनी शंभरी कशी पार केली हे परिवाराला जाणवले नाही म्हणून त्यांचा शतकाचा सुवर्णक्षणाचा सोहळा आईच्या माहेरवासी यांच्या उपस्थितीत मंगल वाद्य, वेद-पठणासह नैसर्गिक (शेतीवर) वातावरणात घेवून कृतज्ञता व्यक्त केली गेली. संयुक्त परिवारात आपल्या जीवनकार्यात ज्ञानेश्वर मांडेकर यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षाच्या अभ्यासाने प्रगती केलेली असल्याने सुयोग्य विचारांसह आचरण करीत जीवनातील चढउतारांना सकारात्मक विचारसरणीने मात करीत अनेक कार्यांना पूर्णत्वास नेले आहे तसेच आपल्या शिक्षकी पेशातील प्रदीर्घ अनुभव परिवाराच्या उन्नतीकरिता वापर करुन जबाबदारी पूर्ण करीत आहे. परिवारात मुख्यतः व्यापार हा व्यवसाय मुळापासून असल्याने नवपिढी परिवाराच्या नियंत्रणात पुढे नेत आहे. परिवारात आज प्रत्यक्ष २३ सदस्य असून, सात मुलींचा मोठा गोतावळा हा नियामित परिवाराचा भागच आहे तसेच नियमित वैचारिक देवाण- घेवाणीकरिता मोठा मित्र परिवार, हितचिंतक याचा सहवास लाभलेला असल्याने वैचारिक संपर्कात जीवनातील सत्यता सर्व सदस्य अनुभवतात. संयुक्त परिवारात लोकशाही विचारसरणीनुसार कार्याला मांडेकर परिवाराने प्राधान्य दिले असल्याने सदस्यांना कार्य करण्यास पूर्णतः स्वातंत्र्य आहे.

योग्य-अयोग्य बाबीची चर्चा करण्यात येवून परिवारातील सदस्य शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक-धार्मिकदृष्या अग्रेसर असल्याचे दिसून येते. रामायणामधून त्यागमय जीवन व महाभारतामधील जीवन काळात कर्तव्यास प्राधान्य यांचा वैचारिक मेळ ठेवण्यात येवून सकारात्मक धोरणानुसार कार्य करण्यात येते. घरी दररोज तुकडोजी महाराजांची प्रार्थना सामुदायिकरित्या गायन करून जीवनाच्या सत्यतेचा परिचय, अनुभव केला जातो.

# दहावीच्या परीक्षेत मनपा विद्यार्थ्यांची गगनभरारी

## मनपा शाळेचा ९०.२८ टक्के निकाल - मराठी माध्यमातून श्लोक हटवारला ९४.६० टक्के - गुणवत्तायादीत मुलींची संख्या अधिक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकालातून नागपूर महानगरपलिकेच्या विद्यार्थ्यांनी गगनभरारी घेतली आहे. मनपा शाळेचा निकाल ९०.२८ टक्के लागला आहे. दुर्गानगर माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी श्लोक गोविंद हटवार हा ९४.६० टक्के गुणांसह पहिला आला आहे मागासवर्गीयांत जयताळा माध्यमिक शाळेची कोमल रविंद्र भिसे हिने ९२.८० गुणांसह पहिला क्रमांक पटकाविला. मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी माध्यमांच्या महापालिकांच्या शाळांमधून गुणवत्तायादीत चमकलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींची संख्या अधिक आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक



**श्लोक हटवार**
**९४.६० टक्के**

डॉ.अभिजीत चौधरी,अतिरिक्त आयुक्त वैष्णवी.बी., यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. मनपाच्या मराठी माध्यमातून श्लोक हटवारने ९४.६० टक्के टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. हिंदी माध्यमातून पायल संतोषकुमार हिने ९०.६० टक्केगुण मिळावत प्रथम क्रमांक मिळविला. उर्दू मध्यामातून रुकय्या परवीन हिने ८६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला असून, इंग्रजी माध्यमातून अर्बिना नाज ईजाज अहमद ही ८५.६ टक्के गुण मिळवत प्रथमस्थानी आली. याशिवाय दिव्यांग विद्यार्थ्यांमधून छकुली जाधव हिने ८०.४० टक्के गुण मिळविले. कोमल भिसे हिने ९२.८० टक्के गुण मिळवत मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

### आठ शाळांचा निकाल १०० टक्के



मनपाच्या आठ शाळांचा १०० शंभर टक्के लागला असून, नऊ शाळांचा निकाल ९० टक्क्यांपेक्षा अधिक, तर १० शाळांचा ७५ ते ९० टक्क्यांदरम्यान निकाल लागला आहे. मनपाच्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल मनपाचे शिक्षणाधिकारी साधना सयाम यांनी अभिनंदन केले आहे. शालांत परीक्षेत एकूण १,०२९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी एकूण ९२९विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. इंग्रजी माध्यमातून पहिले तिन्ही गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी जी. एम. बनातवाला या शाळेचे आहेत. मनपा शाळांमधून एकूण ७४ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण झाल़े तर, २६६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीमध्ये यश संपादन केल़े म मागील वर्षी शालांत परीक्षेमध्ये शाळांचा निकाल ८७.५९ टक्के लागला होता. यावर्षी त्यात वाढ होत निकाल ९०.२८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

**(मराठी माध्यम):** श्लोक गोविंद हटवार : दुर्गानगर माध्यमिक शाळा, नागपूर, कोमल रविंद्र भिसे : जयताळा माध्यमिक शाळा, नागपूर, आरुषी गणेश सोनवाने : दुर्गानगर माध्यमिक शाळा, नागपूर

**हिंदी माध्यम :** पायल संतोषकुमार वर्मा संजयनगर माध्यमिक शाळा, नागपूर, लखन चमनलाल येरणे संजयनगर माध्यमिक शाळा, नागपूर, नितू ईदलाल सोंदिया संजयनगर माध्यमिक शाळा, नागपूर, अंजली विनोद पटेल सुरेंद्रगड माध्यमिक शाळा, नागपूर

**उर्दू माध्यम :** रुकय्या परविन एम.ए.के. माध्यमिक शाळा, नागपूर, हबिबा खातुन सोहेल खान ताजाबाद माध्यमिक शाळा, नागपूर, निझालीया कौसर अंसारी कामगारनगर माध्यमिक शाळा, नागपूर

**इंग्रजी माध्यम :** अर्बिना नाज ईझाझ अहमद जी.एम.बनातवाला माध्यमिक शाळा, उम्मे झैनाब मो. शमीम मंसुरी जी.एम.बनातवाला माध्यमिक शाळा, हुस्ना परिवहन इरशाद अहमद जी.एम.बनातवाला शाळा

**दिव्यांग:** छकुली जाधव डॉ. राममनोहर लोहिया माध्यमिक शाळा

**मागासवर्गीय :** कोमल भिसे जयताळा माध्यमिक शाळा, नागपूर

## थोडक्यात

### स्मार्ट सिटीतील बाधितांना मुद्रांक शुल्कात सवलत

**नागपूर :** नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्यांना मौजा पुनापूर येथे 'होम स्वीट होम' योजनेंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्टा दस्त नोंदणीसाठी केवळ एक हजार रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुंबईत झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला आहे.
पूर्वी या २८ घरांच्या नोंदणीसाठी सुमारे ४० ते ४५ हजार रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार होते. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांसाठी आकारल्या जाणाऱ्या एक हजार रुपये मुद्रांक शुल्काच्या धर्तीवर ही सवलत देण्याची मागणी जोर धरत होती. त्यानुसार अत्यल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या या घरांसाठी शुल्क कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### अकरावी प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनेच

**नागपूर :** यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून राज्यातील अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पद्धतीनेच राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णत: ऑनलाइन पद्धतीनेच राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना त्वरित नोंदणी करायची आहे. नोंदणी न झालेल्या संस्था प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आता इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन फॉर्म क्रमांक १ भरावे लागणार असून शाखा व प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदवण्याकरीता १९ ते २८ मे २०२५ पर्यंतचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांनी आपले फॉर्म क्रमांक १ आणि २ भरावे लागणार आहे.

## अभिनंदन! यशस्वितांचे



आरोही मिलिंद काळे
९७ टक्के



स्पर्श राजू काळे
८६ टक्के



रुद्रानी डाहाके
७७.४० टक्के



वैष्णवी जांभुळकर
७०.२०

# विद्यापीठाच्या उपकेंद्रास नागपूरमध्ये जमीन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाच्या नागपूर येथील उपकेंद्रास मौजे चिंचोली (ता. कामठी जि. नागपूर) येथील २० हेक्टर २३ आर जमीन देण्याचा निर्णय मुंबईत मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. गृह मंत्रालयाच्या अखत्यारित गुजरातमधील गांधीनगर येथील राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव विद्यापीठ आहे. या विद्यापीठाचे उपकेंद्र नागपुरात सुरू करण्यात येणार आहे. सदरचे केंद्र विश्वास सेल, पोलिस हेल्प सेंटर इमारत, परसोडी-सुभाषनगर, नागपूर येथील इमारतीत तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर कार्यरत करण्यात येणार आहे. केंद्रासाठी २०२५-२८ साठी केंद्रीय गृह मंत्रालयाने १२० कोटी अनुदान मंजूर केले आहे. मात्र, कायमस्वरूपी प्रांगण उपलब्ध व्हावे यासाठी चिंचोली (ता.कामठी) येथील ही जमीन देण्यात येणार आहे. या उपकेंद्राचा फायदा न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई व अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक प्रयोगशाळा व लघु प्रयोगशाळांमधील अधिकारी, कर्मचा०यांना होणार आहे. तसेच न्यायाधीश, पोलिस अधिकारी, कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी तसेच सरकारी अभियोक्ता यांना होणार आहे. यातून न्यायदान प्रक्रिया अधिक गतिमान होण्यासाठी मदत होणार आहे.

# महाबोधी बुद्धविहार मुक्तीसाठी धरणे

**नागपूर, दि. १४ :** महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ राष्ट्रीय अनुसूचित जाती जनजाती विकास परिषद, नवी दिल्ली (महाराष्ट्र प्रदेश) यांच्या वतीने नागपूर येथील संविधान चौकात एकदिवसीय धरणे आयोजित करण्यात आले. बिहारमधील बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध भिक्खूंच्या ताब्यात देण्याच्या मागणीसह बौद्ध धम्माच्या संरक्षण आणि प्रसारासाठी जनजागृती या प्रदर्शनाच्या माध्यमातून करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय अनुसूचित जाती जनजाती विकास परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष इंजिनीअर रवी सोमकुवर, डॉ. ऋषिकेश मेश्राम, प्रवीण पाटील, डॉ.मुकुंदा जोगेकर डॉ.माया गायकवाड, सारिका वाघमारे, दिनेश वानखेडे, अरविंद दुपारे, चंद्रूशेखर देशभ्रतार, संदीप नवनागे यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. बौद्ध अनुयायी आणि नागरिकगण मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.

# कामठीतील रुग्णालयाचा विस्तार होणार

## सहा एकर जमिनीची उपलब्धता; कन्हान, मोहपा, मोवाड रुग्णालयांचे श्रेणीवर्धनही

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** नागपूर शहर विस्तारत असून, त्याठिकाणी आरोग्याच्या सेवा योग्य पद्धतीने होणे अपेक्षित आहे. कामठी येथील ५० खाटांचे रुग्णालय १०० खाटांचे करण्यात यावे. त्याच्या बांधकामासाठी पाच एकर जागेची आवश्यकता असली तरी एकर जागा उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मंत्रालयात नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाचे विविध विषय, राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी, कर्मचारी समायोजन कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर दूरदृश्यप्रणालीद्वारे नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नागपूर जिल्ह्यामध्ये बांधण्यात आलेल्या जिल्हा रुग्णालयासाठी पदांची आवश्यकता होती. याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. तर आहार, सुरक्षा, वस्त्रधुलाई आणि स्वच्छता सेवा कंत्राटी पद्धतीने राबविण्याबाबतच्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात आली आहे. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी पदमान्यता, नवीन शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जुन्या दवाखान्यांचे श्रेणीवर्धन करणे याबाबतचाही आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान, मोहपा, मोवाड या रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रुग्णालयामध्ये रुपांतर करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. उमरेड येथील ट्रामा केअर युनिटचा पदनिर्मिती प्रस्ताव, जिल्हा रुग्णालयास मंजूर ३५ कोटीचा निधी वितरित करणे आणि डागा रुग्णालयास २० कोटीची आवश्यकता होती. त्यापैकी १३ कोटी रुपये मिळाले असून उर्वरित ७ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. हा निधीही वितरित करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### कुहीत ५० खाटांचे रुग्णालय

- ग्रामीण रुग्णालय कुही येथे सध्या ३० खाटांचे रुग्णालय असून, त्याचे श्रेणीवर्धन करून ते ५० खाटांचे करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.



## CAPTION — गरज सरो अन् ...



**नागपूर :** नागपुरात गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानक ते मेडिकल चौकादरम्यान कामगार भवन हा महत्त्वाचा चौक असून, सर्वांत जास्त वाहतूक आणि रहदारी अस्ते याठिकाणी केबलिंग वा तत्सम कामांसाठी जमिनीत खड्डे करून ते बुजविण्यात आलेत; परंतु त्यावर डांबरीकरण केलेले नाही.

# माजी मंत्री राजेंद्र मुळकांचा जनता दरबार

**नागपूर, दि. १४ :** देवलापार, रामटेक, पारशिवनी, कन्हान येथील जनसंपर्क कार्यालयात माजी मंत्री राजेंद्र मुळक यांचा जनता दरबार पार पडला. जनता दरबारात माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी उपस्थित राहून बुद्ध पौर्णिमानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यांनी यावेळी जनतेशी संवाद साधला. तसेच, प्रत्येक नागरिकाची समस्या गांभीर्याने ऐकून संबंधित विभागांना तत्काळ कार्यवाहीसाठी सूचना केल्या. नागरिकांकडून आलेली निवेदने स्वीकारत त्यांच्या प्रश्नांवर लवकरच तोडगा काढण्याची ग्वाही दिली. जनता दरबाराच्या माध्यमातून भविष्यातही जनतेच्या हितासाठी कार्यरत राहू, असा विश्वास माजी मंत्री मुळक यांनी व्यक्त केला.

# चिंचघाट उपसा सिंचन योजनेला गती द्या

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आढावा बैठकीत निर्देश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** नागपूर : नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात चिंचघाट उपसा सिंचन योजना हा प्रस्तावित महत्त्वपूर्ण सिंचन प्रकल्प आहे. कृषी क्षेत्रात सिंचन सुविधा वाढवून शेतक०यांना पाण्याची उपलब्धता करून देणे आहे. त्यामुळे तंत्रिक बाबी पूर्ण करून प्रकल्पाला गती द्यावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. यासंदर्भात मुंबई पार पडलेल्या बैठकीत मंत्री बावनकुळे बोलत होते. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव डॉ. संजय बेलसरे, मुख्य अभियंता पराते व नागपूरचे संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, की चिंचघाट उपसा सिंचन प्रकल्पामुळे अवर्षणग्रस्त भागास पाण्याची उपलब्धता होणार आहे. या योजनेतून कुही तालुक्यातील सर्वसाधारण क्षेत्रातील १८ गावांतील एकूण ३७१५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात यावे. प्रकल्पास आवश्यक असणा०या मंजुरी, तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसाठी नोडल अधिका०याची नेमणूक करण्यात यावी चिंचघाट उपसा सिंचन प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी जलसंपदा विभागामार्फत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे जलसंपदा मंत्री महाजन यांनी बैठकीत सांगितले.

# मनपा, जिप निवडणुकीआधी भाजपात बदल

## दयाशंकर तिवारी नागपूर शहराध्यक्षपदी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** आगामी महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने नागपूर शहर आणि ग्रामीणमध्ये महत्त्वपूर्ण संघटनात्मक बदल केले आहेत. माजी महापौर दयाशंकर तिवारी यांची नागपूर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यात एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये ५८ जिल्हाध्यक्षांची निवड नुकतीच जाहीर करण्यात आली असून, याचाच एक भाग म्हणून नागपुरातही हे बदल झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली. मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका तत्कालीन शहराध्यक्ष बंटी कुकडे यांच्या नेतृत्वात लढवण्यात आल्या होत्या. मात्र, आता त्यांच्या जागी नव्या चेहऱ्याचा शोध सुरू होता, ज्याची परिणती तिवारी यांच्या नियुक्तीत झाली. अनेक तरुण नावांच्या चर्चेनंतर अनुभवी दयाशंकर तिवारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बदलांमुळे पक्षाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नवीन ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### ३६ जिल्ह्यांना नवे नेतृत्व!

- नागपुरातील बदलांच्या अनुषंगाने, भारतीय जनता पार्टीने संपूर्ण महाराष्ट्रात संघटनात्मक फेरबदल केले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन, पक्षाने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबई या विभागांतील एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये ५८ नवीन जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर केली आहे. या व्यापक बदलांमुळे पक्षाला राज्यभरात नवी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

### असा आहे तिवारींचा अनुभव!

- दयाशंकर तिवारी यांचा नागपूर महानगरपालिकेतील आणि पक्षांतर्गत कामाचा अनुभव दांडगा आहे. त्यांनी यापूर्वी नगरसेवक, महापौर (२०२१-२२), सत्तापक्षनेता, नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त आणि स्थायी समिती अध्यक्ष यांसारखी महत्त्वपूर्ण पदे भूषवली आहेत. यासोबतच, त्यांनी भाजपचे प्रवक्ता, शहरमंत्री आणि भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष म्हणूनही पक्षाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. त्यांच्या याच अनुभवाचा फायदा पक्षाला अपेक्षित आहे.

### भाजपची द्विदल रणनीती!

- नागपूर जिल्हा परिषद ताब्यात घेण्यासाठी भाजपने ग्रामीण भागासाठी दोन स्वतंत्र विभाग तयार केले आहेत. रामटेक विभागाचे प्रमुख म्हणून माजी सभापती आनंद राऊत यांची निवड करण्यात आली असून, यात रामटेक, उमरेड, कामठी या विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. तर, काटोल विभागाची जबाबदारी मनोहर कुंभारे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. या विभागात हिंगणा, काटोल आणि सावनेर या मतदारसंघांचा समावेश असेल.

# छत्रपती संभाजी महाराजांना जयंतीनिमित्त आदरांजली



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १४ :** जगाच्या इतिहासात १४० लढाया करून एकही लढाईत पराभव आणि तह न पत्करणारे महापराक्रमी, महान योद्धा, प्रजाहितदक्ष, न्यायी, स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीनिमित्त संभाजी राजे यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपायुक्त विजया बनकर, शिक्षणाधिकारी साधना सयाम, सहाय्यक आयुक्त श्याम कापसे, जनसंपर्क अधिकारी मनिष सोनी, प्रमोद हिवसे, अमोल तपासे, स्वप्नील लोखंडे, जितेश धकाते, अंकित यादव उपस्थित होते.

## मातुश्री शिक्षण सेवा मंडळ,अकोला




अजिंक्य भारत ला
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

**प्रकाशराव देशमुख**
(अध्यक्ष)
मातुश्री शिक्षण सेवा मंडळ अकोला.

**सौ.नलिनीताई देशमुख**
(सचिव)
मातुश्री शिक्षण सेवा मंडळ अकोला.

---

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



**श्री गजानन दत्तात्रय भांबुरकर**
महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटना अमरावती विभागीय सचिव

शुभेच्छुक



शिवदास अंबादास भारसाकळे

- विजय धांडे(साहित्यिक )
- राजेश साविकार (पत्रकार)

---




दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**श्रीयश शंकरराव चौधरी**
मंचनपूर (सावरा)
राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्रजी पवार पक्षाचे अकोट तालुका अध्यक्ष

---

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी मजदूर युनियन

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा






| राधेश्यामजी मर्दाने | करण लक्ष्मीनारायण महातो | अब्दुल सलीम | प्रमोद मर्दाने |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र प्रदेश महासचिव | प्रदेश सचिव | जिल्हा कोषाध्यक्ष | जिल्हाध्यक्ष |

---

## वंचित बहुजन युवक आघाडी आसेगाव बाजार सर्कल

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा







- अक्षय गजानन धांडे — अक्षय रा.सावरा
- उर्मिला अक्षय धांडे
- सम्राट निलेश वानखडे
- मीराताई धम्मपाल धुंदे
- धम्मपाल भाऊ धुंदे — आसेगाव बाजार सर्कल अध्यक्ष वंचित बहुजन युवक आघाडी राहणार देऊळगाव तालुका अकोट

---

## विदर्भ मंडळ अधिकारी संघ नागपूर,जिल्हा शाखा अकोला

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

- गणेश भारती, मंडळ अधिकारी अकोट विभाग
- विशाल शेरेकर, मंडळ अधिकारी, कुटासा विभाग
- अनिल ओइंबे, मंडळ अधिकारी, मुंडगाव विभाग
- विष्णू सौदागर, मंडळ अधिकारी,आसेगाव
- भूपेश चौबे, मंडळ अधिकारी, उमराव विभाग
- प्रभुदास होपळ, मंडळ अधिकारी,अकोलखेड विभाग
- मनोहर अढाऊ, मंडळ अधिकारी,मुंडगाव विभाग

तथा समस्त ग्राम महसूल अधिकारी अकोट

---

सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर

सक्षम सामाजिक संघटन अकोट
सक्षम

दैनिक अजिंक्य भारत
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

---

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
**मनोज बाबुलालजी चंदन**
भारतीय जनता पार्टी, अकोट

---

## नरसिंग विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच विद्यालय अकोट

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
राजेश श्रीधर जोशी (मुख्याध्यापक) नरसिंग विद्यालय अकोट
शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी

---

## अकोट तालुक्याचे आराध्य दैवत नरसिंग महाराज



दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

---

## शिक्षण विभाग नगर परिषद, अकोट

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

- **मधुसूदन व्यवहारे,** मुख्याध्यापक, न.प.प्रा.म. शाळा क्र. ६
- **सुनील वडाळ** मुख्याध्यापक, न.प. प्रा. मराठी शाळा ७ व ८
- **मुक्तारशाह नूरशाह** मुख्याध्यापक,न. प. वरिष्ठ प्रा. उ. शाळा क्र. १
- **नाजेमा खातून** मुख्याध्यापिका, न. प. प्रा. उ. शाळा क्र. २
- **अ. आरिफ अ. रसूल** मुख्याध्यापक, न. प. प्रा. उ. शाळा क्र. ३
- **अमान खा सलाम खा** मुख्याध्यापक, न. प. प्रा. वरिष्ठ उ. शाळा क्र. ४
- **श्रीमती प्रतिभा लाडोळे** मुख्याध्यापिका, न.प. प्रा. म.शाळा क्र.५
- **मो. आसिफ शाह** मुख्याध्यापक,न. प. वरिष्ठ प्रा.उ.शाळा क्र. ६
- **महेंद्र राऊत,**शहर समन्वयक



**सुनील तरोळे**
प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, न. प. अकोट.

---

## श्री सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अकोट

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
संस्थाचालक, प्राचार्य,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी
श्री सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अकोट

---

## श्री शिवाजी महाविद्यालय अकोट

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
प्राचार्य, प्राध्यापक, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी श्री शिवाजी महाविद्यालय दर्यापूर रोड अकोट

---

दैनिक अजिंक्य भारत
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा



**डॉ. चैतन्य वंदना प्रविण रावणकार**

- सदस्य, समाजोन्नती बहुद्देशीय संस्था, अकोट
- आजीवन सभासद, श्रध्दासागर, अकोट
- सदस्य, विठ्ठल रूक्मीणी संस्थान कवठा बु.

---






दैनिक अजिंक्य भारत
प्रथम वर्धापन
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
**दिलीप हरिश्चंद्र बोचे**
शिवसेना उपजिल्हाप्रमुख (उबाठा)
अकोला जिल्हा

---

## बाबू जगजीवनराम वरिष्ठ प्राथमिक व कनिष्ठ महाविद्यालय

( कला, वाणिज्य, विज्ञान शाखा ) आसरा कॉलनी,अकोट

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
प्राचार्य/ मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, बाबू जगजीवनराम शिक्षण संकुल आकोट
मो. ९०२८३३२९०८,९०११८४७२०८

---

जाहिरात संकलन: विशाल सुभाषराव आग्रे अकोट तालुका विशेष प्रतिनिधी दै.अजिंक्य भारत मो. ९८२२२६१६९१



दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


ऋषिकेश लोणकर
शिवसेना शेतकरी तालुका प्रमुख एकनाथ शिंदे


अक्षय म.घायल
अध्यक्ष श्री शंभुराजे प्रतिष्ठान, अध्यक्ष विर शिवाजी गणेशोत्सव मंडळ, युवासेना-अकोला जिल्हा, महाराष्ट्र राज्य


शुभम ग. गावंडे
संत्रा उत्पादक शेतकरी, रामापूर


रविंद्र देवराव घोरड
संत्रा उत्पादक शेतकरी रामापूर


चेतन ध. गुरेकार
सामाजिक कार्यकर्ता, बोर्डी


शिवराम डिक्कर
तालुका अध्यक्ष कॉंग्रेस, एनएसयुआय, अकोट


शिरीष प्र. महल्ले
संत्रा उत्पादक शेतकरी शिवपूर


कुणाल शे. कुलट
उपजिल्हाध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ, आकोला

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


नरेंद्र मनोहर सोनोने
नायब तहसीलदार महसूल, अकोट

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


R. S. Traders
Proprietor Rajesh Savarkar

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


निनाद संजय मानकर
जिल्हाध्यक्ष,
अकोला जिल्हा युवक कॉंग्रेस (ग्रामीण)



दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शाळा समिती, कर्मचारी वृंद.

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
जि.प.व. प्रा. सेमी इंग्रजी शाळा, कासोद, शिवपूर
श्री. गोपाल वानखडे सर
(उच्च.श्रेणी मुख्याध्यापक)
श्री. दत्ता नागरे सर (प.शि.)
सौ.सुनिता बिहाडे मॅडम (वि.शि.)
श्री. भास्कर ढोरे सर.(स.अ.)
कु. राजकन्या शिवरकर मॅडम (स.अ.)
कु. रागिणी खोटरे मॅडम (वि.शि.)

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
जिल्हा परिषद वरिष्ठ, प्राथमिक शाळा, सुकळी
* प्रविण खारोडे मु. अ.
* शिवदास मोरे
* मनोज मांडवे
* ज्ञानेश्वर खापरकार
उपकेंद्र बोर्डी
* डॉ.फरहीन खानम (समुदाय आरोग्य अधिकारी)
* चेतन गावंडे (आरोग्य सेवक)
* आर.पी.भोवर (आरोग्य सेविका)

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
मिलिंद मधुकरराव झाडे (अध्यक्ष)
नितीन मधुकरराव झाडे (सचिव)

आस्की कॉम्प्युटर एज्युकेशन
"मधु-प्रेम", नया सराफा, जयस्तंभ चौक, आकोट मो. 9370 317 217
आस्की किड्स पब्लिक स्कूल
कृ.उ.बा.स. जवळ, पोपटखेड रोड, आकोट. मो. 9822 217 317
आस्की किड्स, प्रि-स्कूल
पार्वती विला, सोमवार वेस, आकोट. मो. 8698 217 317

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
वसुंधरा ज्ञानपीठ, अकोट
अवधुत कॉलनी, कॉलेज रोड, अकोट


शालेय इमारत

Admission Open
● प्रशस्त ईमारत ● वर्ग 10 चा 100% निकाल
● डिजीटल वर्गखोल्या ● प्रशिक्षित व अनुभवी शिक्षकवर्ग ● पालकांना आपलीशी वाटणारी शाळा
● स्वतंत्र संगणक कक्ष

नेमाडे हॉस्पिटल
डॉ. श्याम नेमाडे
MBBS, MD, FDM, FICM
डॉ.रोहिणी नेमाडे
BHMS

उपलब्ध सेवा व उपचार
- २४ तास इमर्जन्सी सेवा सुरू आहे.
- मधुमेह हृदयरोग रक्तदाब थायरॉईड छाती रोग, लिव्हर किडनी व पोटाचे इतर आजार
- कॅन्सर हरनिया हायड्रोसिल शरीरावरील गाठी इ.ऑपरेशन
- स्त्रियांचे सर्व आजार व प्रसुती गरोदर मातांची तपासणी व उपचार
- बालकांच्या सर्व आजारांवर उपचार
- विषबाधा, जळलेले व अपघातांचे उपचार
- नाक, कान, घसा उपचार
- संधीवात, हाडांचे आजार व त्वचारोग उपचार


संपर्क : मो. 9867308084
आप्पास्वामी कॉलनी, सिटी पोलिस स्टेशन समोर, अकोट जि. अकोला

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


ॲड. महेश सुधाकरराव गणगणे
कार्याध्यक्ष, अकोला जिल्हा कॉंग्रेस कमिटी अकोला
पक्षनेता, अकोट विधानसभा मतदारसंघ (कॉंग्रेस)

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


ह.भ.प. गणेश महाराज शेटे
आंतरराष्ट्रीय परमहंस यात्रा कंपनी,
अध्यक्ष योग योगेश्वर संस्थान वरूर जऊळका
ता. अकोट जि अकोला

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


जगन प्रल्हादराव बगाडे
* प्रगतीशिल तथा प्रयोगशील शेतकरी
* धरतीपुत्र जैविक शेती मिशन शेतकरी
* उत्पादन कंपनी तालुका अध्यक्ष अकोट.

संचालक मंडळ : अनिलभाऊ निमकर्डे, मेघश्यामभाऊ फुसे, योगेशभाऊ हाडोळे, विजयभाऊ नवले, रामभाऊ ओळंबे, सागर मानकर, विपुल अवारे, गोपालभाऊ डोके, सचिन अवारे, गणेश बोंडे, जीवन भोपडे.


दै. अजिंक्य भारतवर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आकोट शिक्षण संस्था, आकोट
द्वारा संचालित


अध्यक्ष
ॲड. मोहन आसरकर




श्री सरस्वती शिशू मंदिर
श्री सरस्वती प्राथमिक मराठी शाळा
श्री सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय
श्री सरस्वती कॉन्व्हेंट
श्री सरस्वती विद्यालय
• जनरल सायन्स • कॉम्प्युटर सायन्स • ॲनीमल सायन्स • आर्टस • कॉमर्स

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


श्री. अतुल भालतिलक
कार्याध्यक्ष माऊली बहुउद्देशीय संस्था, अकोट

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा


टिंबर असोसिएशन
पोपटखेड रोड, नेहरू टिंबर मार्केट, अकोट

जाहिरात संकलन :-
देवानंद पाटील खिरकर
अकोट, तालुका प्रतिनिधी
मो. नं. ८८८८१५१९०५



अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, गुरूवार दि.१५ मे २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### लाखनवाडा गावावर विमानाच्या घिरट्या; नागरिकांमध्ये घबराट

**लाखनवाडा :** बुधवारी सकाळी १० वाजता चे दरम्यान लाखनवाडा गावावर विमानाने अनेक घिरट्या घातल्यामुळे नागरिकामध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले होते कारण सध्या भारत पाकिस्थान युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि अशा कालावधीत गावावर विमानाने अनेक घिरट्या घालणे हे नागरीकांना संशयास्पद वाटले होतो आणि त्याा बाबत नागरीका मध्ये उलट सुलट चर्चा सुध्दा सुरु होती याबाबत चौकशी केली असता ग्रामपंचायत व पोलीस सुत्रांकडून माळालेल्या माहिती नुसार अमरावती येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होत असल्यामुळे विमानाचा मार्ग सराव म्हणून सदर विमान घिरट्या घालत असल्याचे समजले तेंव्हा नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला बच्चे कंपनी मध्ये मात्र हा कुतूहलाचा विषय झाला होता

### कृष्णाई स्कूलच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**खामगाव :** काल १३ मे रोजी १० वीचा निकाल घोषित करण्यात आला. यामध्ये कृष्णाई स्कूलने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. या शाळेतून प्रथम क्रमांक सक्षम गजानन वानखडे ११.८०% द्वितिय क्रमांक जान्हवी सुदर्शन जाधव ९१.२०% व तृतीय क्रमांक आदित्या कैलास साबे ८९.२०% गुण प्राम केले. सर्व उत्तीर्ण विध्यार्थ्यांचे कृष्णाई स्कूल ज्युनिअर कॉलेज खामगावचे अध्यक्ष जनार्दन हेड पाटील तसेच शाळेचे सचिव हर्षद हेड पाटील, चेतन हेड पाटील, वृषाली हेंड पाटील, ईश्वरी हेड पाटील तसेच स्कूलचे प्राचार्य रवी वानखडे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले असून सर्व विद्याव्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या त्याच प्रमाणे स्वाती स्लंत्री शिल्पा पिडीयार, दीनी देशमुख, निकिता धोत्रमनाहा घोगले, दायभागका कर्मचारी लिपिक वैभव साहे. योगश अंभोरे यानी विद्याध्यादिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

### पाणी टंचाई निवारणार्थ सैलानी नगर गावासाठी टँकर मंजूर

**बुलडाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील सैलानी नगर गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. सैलानी नगर येथे ३२५ पशुधन व ४ हजार ५०० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ९४ हजार २०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्राकाव्दारे कळविले आहे.

# अमरावती विभागात जिल्ह्याने बाजी मारली

## बुलडाणा जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९५.५२ टक्के

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.१४




दहावीचा निकाल आज घोषित करण्यात आला. त्याातअमरावती विभागात बुलढाणा जिल्ह्याने बाजी मारली आहे. आज मंगळवार १३ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन निकाल जाहीर करण्यात आला. गतवर्षीही मुलींनीच बाजी मारली होती. यावर्षीही मुलीच विभागात अव्वल राहिल्या. त्यांनी हा विजयी जल्लोष कायम ठेवला आहे. अमरावती विभागाचा निकाल ९२.९५ टक्के लागला आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्याचा निकाल ९५.५२ टक्के एवढा लागला असून जिल्हा विभागात प्रथमस्थानावर आहे. दहावीच्या परिक्षेसाठी जिल्ह्यातून ३९ हजार ५०९ एवढ्या विद्यार्थ्यांनी परिक्षेसाठी अर्ज भरले होते. त्यापैकी ३८ हजार ९९६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात परिक्षा दिली, यापैकी ३७ हजार २५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये २० हजार २७६ विद्यार्थी तर १६ हजार ९७६ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांची टक्केवारी ९४.५३ टक्के तर मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९६.७४ टक्के एवढी आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही तेराही तालुक्यात मुलीचं अव्वलस्थानी आहेत. जिल्ह्याचा निकाल ९५.५२ एवढा निकाल लागला आहे. यामध्ये बुलढाणा तालुक्याचा निकाल ९७.४१ टक्के, मोताळा तालुका ९५.८९, चिखली तालुका ९७.१८ , दे.राजा ९६.४२, सिं.राजा ९७.९४, लोणार ९५.०५, मेहकर ९६.८९, खामगाव ९४.०१, शेगाव ९३.९३, नांदूरा ९३.७४, मलकापूर ९३.८६, ज.जामोद ९२.९२, संग्रामपूर तालुक्याचा ९२.४२ टक्के निकाल लागला आहे, त्याची टक्केवारी ९५.५२ एवढी आहे. ३८ हजार ९९६ परिक्षार्थीपैकी २०,२७६ मुले तर १६,९७६ मुली असे एकूण ३७,२५२ विद्यार्थी पास झाले आहेत.

निकालात विभागात बुलढाणा जिल्ह्याने बाजी मारली असून जिल्ह्याचा निकाल ९५.५२ टक्के एवढा आहे. द्वितीयस्थानी वाशिम जिल्हा असून त्याचा निकाल ९५.४१ टक्के एवढा आहे. अमरावती जिल्हा तृतीयस्थानी असून त्याचा निकाल ९२.८६ टक्के, यवतमाळ जिल्हा ९१.५१ टक्के आहे. अकोला जिल्ह्याचा ८९.३५ टक्के निकाल लागला असून तो विभागात सर्वात कमी आहे.

## एनसीसीतर्फे १३ महाराष्ट्र बटालियनमध्ये मॉकड्रील



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१४

स्थानिक १३ महाराष्ट्र बटालियन खामगांव येथे एनसीसी तर्फे कमांडिंग ऑफीसर कर्नल ओमेश शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकार निर्देशित मॉकड्रील घेण्यात आले. सुरवातीला युद्धजन्य परिस्थितीत कॅडेट्स नी आपली भूमिका कशी बजवावी तसेच फायरफाईटिंग,एयर क्राफ्ट याविषयी सुभेदार सचिन बोधे व सभेदार नागुसिंग राठोड यांनी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी एनसीसी कॅडेट्सना आग विजण्याची,जखमींना ताबडतोब प्राथमिक उपचार तसेच होणाऱ्या हवाई हल्ल्याचा वेध घेऊन त्याातून नागरीक संरक्षण अंतर्गत सामान्य नागरिकांचा बचाव व हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठीची सज्जता चे प्रात्याक्षिक घेण्यात आले.यावेळी एनसीसी ऑफिसर गणेश घोराळे,पो.कॉ.प्रविण आडे,नायब सुभेदार मग्गर चन्द,हवालदार मिलन राणा,सनबाबु गुरखाली, नितेश थापा, अभिषेक गुरुम व बटालियन चा संपूर्ण कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## संविधान पूजनाने पार पाडला बांगर व वानखेडे परिवाराचा लग्न सोहळा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१४




येथील वानखेडे व बांगर परिवाराचा लग्न सोहळा सर्वांनाच एक नवी दिशा व प्रेरणा देणारा ठरला. लग्न तर अनेक होतात परंतु सर्वांनाच एक नवी दिशा व प्रेरणा देणाऱ्या या लग्नसोहळ्याची चर्चा व विशेष कौतुक होत आहे.

नुकतेच ता.१३ मे रोजी मलकापूर येथील शिवाजी बांगर यांची जेष्ठ कन्या ची. सौ.का. दिव्या व नांदुरा तालुक्यातील वडनेर भोलजी येथील श्रीकृष्ण वानखेडे यांचे चिरंजीव विष्णू (दुर्गेश) यांचा लग्न सोहळा मलकापूर येथील ''पंचशील मुलांचे वस्तीगृहाचे प्रांगणात संपन्न झाला.अनेक कालबाह्य रूढी व रीती रिवाजांनी जखडलेल्या लग्न सोहळ्यातील साऱ्या धार्मिक विधीच्या आधी या नवदांपत्याच्या हातून भारतीय संविधानाची पूजा करण्यात आली. त्याानंतरच इतर सर्व धार्मिक विधी पार पाडण्यात आले. हीच या लग्नसोहळ्यातील विशेषता ठरली. सर्व जाती-धर्माच्या पुरोगामी विचारांच्या सुशिक्षित नवदांपत्याांना एक नवी दिशा व प्रेरणा देण्याची व प्रत्योक लग्न सोहळ्यात प्रथम संविधान पूजन करूनच पुढील कार्यक्रम आपापल्या धार्मिक रीती रीवाजाने पार पाडणारी ही चळवळ गेल्या दोन-तीन वर्षापासून या चळवळीचे प्रणेते सत्याशोधकी ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताजी हिवाळे हे महाराष्ट्रभर राबवत आहेत. त्याांच्या सहवासात व तालमीत तयार झालेले वधूचे वडील शिवा बांगर हे होत.

अशा या संविधान पूजनाचे महत्वविषद करताना दत्ताजींनी सांगितले की, यानिमित्ताने प्रत्योक नवदांपत्या ''प्रथम आम्ही भारतीय संविधानाची बांधिलकी स्वीकारूनच पुढील आयुष्यात पाऊल टाकत आहोत याचीच ते ग्वाही देतात असा हा राष्ट्रधर्म ही चळवळ नव्या पिढीच्या व उपस्थितांच्या मनामनात पेरत आम्ही अखंडपणे आमच्या शक्तीनुसार महाराष्ट्रभर पार पाडत आहोत. याबाबत अधिक स्पष्टता देताना ते म्हणाले. हा कार्यक्रम कोणत्याही राजकीय पक्षाचा व कोणत्याही गटा-तटाचा नाही. किंवा कुण्या संघटनेचा वा धर्मपंथाचा नाही अशीही चळवळ निव्वळ संविधानाप्रती फक्त समर्पित भावनेची आहे . या शृंखलेतील फक्त एक दुवा निमित्त मात्र आहे. ही चळवळ लोक चळवळ झालेली दिसते.भारत-पाक सीमेवर सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हा संविधान पूजनाचा राष्ट्रीय कार्यक्रम सर्वांनाच अंतर्मुख करून गेला.

## भारत माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा १०० टक्के निकाल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१४

भारत विद्यालय बुलढाणा शाळेने वर्ग १० वी च्या निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत यावर्षी घवघवीत यश संपादन केले आहे. भारत विद्यालयाचा यावर्षी निकाल १०० टक्के लागला आहे.

यावर्षी इयत्ता दहावीसाठी ३१० विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्याापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा निकाल १०० टक्के एवढा लागला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये ३१ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे. १३१ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केली आहे. शाळेमधून सर्वप्रथम शिवम शरद नागरे यांनी ९८% टक्के गुण प्राप्त केले आहे. मिहीर शरद माळी ९७.२०%, ओमराजे धर्मराज सोनवणे ९६.४०%, जतिन पुरुषोत्तम इंगळे ९६.२०%,रश्मी दिनकर पवार ९६ %,गायत्री सुरेश चव्हाण ९६%, सोमेश्वर विष्णू सपकाळ ९५.६०%हे विद्यार्थी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन यशस्वी झाले आहे. सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सीमा आगाशे, उपाध्यक्ष उदय देशपांडे, सचिव अंगद आगाशे तसेच संचालक मंडळातील सदस्य, मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड, उपमुख्याध्यापक मोहन घोंगटे, पर्यवेक्षक नवल गवई व सर्व शिक्षक वृंदाने अभिनंदन केले आहे.

यावर्षीपासून इयत्ता अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी भारत विद्यालय बुलढाणा या ठिकाणी विद्यार्थी सहाय्यता केंद्र स्थापन झालेले आहे.दिनांक १९ मे व २०मे रोजी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश अर्ज भरून देण्यात येतील आणि मार्गदर्शन करण्यात येईल.

## बुद्धपौर्णिमे निमित्त कॅन्डल मार्च

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
लाखनवाडा दि.१४

विश्वाला शांततेचा समतेचा बंधुत्ताचा संदेश देणारे तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त लाखनवाडा बु येथील कमलशील बुद्ध विहारापासून गावातील प्रमुख मार्गाने कॅन्डल मार्च काढून जगाला युद्ध नव्हे तर बुद्ध हवा आहे, बुद्धाचा मंबुद्धम् शरणम्गच्छामि, धम्मम शरणं गच्छामि, सर्वांसाठी मंगल मैत्री,तेरा मंगल,मेरा मंगल, सबका मंगल हो रे या घोषणेने गावातील प्रमुख मार्गाने कॅण्डल मार्च जेतवन बुद्ध विहाराजवळ त्रिसरण पंचशील धम्म वंदना, घेऊन खीरदान करण्यात आली.

यावेळी या कॅन्डल मार्च कैलास वाकोडे विनोद इंगळे, नामदेव सरदार, तुळशीराम सरदार, भारत वाकोडे, संदीप वाकोडे, अर्जुन वानखडे, माणिक वाकोडे, मनोहर वानखडे ,संतोष वाकोडे, प्रकाश वानखडे , राजेश तायडे,सतिष वानखडे, बिंबिसार इंगळे, विरल इंगळे,विशाल इंगळे, मिलिंद वाकोडे,योगेश वाकोडे,सागर वाकोडे, नैतिक वाकोडे,वैभव वाकोडे, सामाजिक कार्यकर्ते जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त सुमित वाकोडे इत्यादी सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग घेऊन कॅन्डल मार्च यशस्वी केला.

## लग्नाची हळद फिटत नाही तोच गणेश सीमेवर जम्मू येथे परतला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.१४



जम्मू येथे सैन्यात कार्यरत असलेला सिंदखेडराजा तालुक्यातील बाळसमुद्र येथील गणेश गजानन भंडारे हा स्वताच्या लग्नासाठी सुटीवर गावी आला होता. परंतु भारत व पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाच्या संरक्षणार्थ तातडीने तो आपल्या देशसेवेच्या कर्तव्यासाठी सीमेवर परतला आहे.

बाळसमुद्र येथील गणेश गजानन भंडारे हा युवक इंजिनिअरींगचे शिक्षण घेत असतांनाच सैन्यात भरती झाला आहे. त्याचा विवाह ठरल्यामुळे तो जम्मू येथील अकनूर वरुन नुकताच काही दिवसांपूर्वी सुटीवर गावी आला होता. ६ मे मंगळवारी लोणार तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ येथील गजानन राऊत यांची मुलगी शिवानी सोबत त्याचा विवाह पार पडला. त्याानंतर नवरीला घरी आणत असतांना सुखी संसाराची स्वप्ने दोघांनी पाहिली. परंतु लग्नाची हळद फिटत नाही तोच काल ९ मे शुक्रवारी तो आपल्या देशसेवेच्या कर्तव्यासाठी सीमेवर परतला आहे. सिमेवर परत जात असतांना त्याने अशा कठीण काळात देशसेवेपेक्षा कोणतेही मोठे काम नसल्याचे सांगत कुटूंबीय, मित्र व ग्रामस्थांना धीर देत देशसेवेचा स्वाभिमान बाळगून गणेश भंडारे आपल्या कर्तव्यावर परत गेला आहे.

## विद्या विकास विद्यालयात स्नेहमिलन सोहळा!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१४



कनिष्ठ महाविद्यालय कोलवड येथे झालेला स्नेहमेळावा म्हणजे एक हृदयस्पर्शी, भावनेने भरलेला आणि आनंदाने ओथंबणारा क्षण ठरला होता. ''आपलं गेट टुगेदर'' या शीर्षकाखाली साजरा झालेला हा कार्यक्रम, १९९८ ते २००६ या वर्षी शिक्षण घेतलेल्या पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचा आयुष्यातील एक सोनेरी अध्याय ठरला.

शाळेच्या प्रांगणात पावले ठेवतानाच मन मागे चाललं हाथ धरून वर्गात धावणारी मुले, पाठीवरची दप्तरे, शिक्षकांचा ओरडणारा आवाज, चित्रकला, हस्ताक्षर स्पर्धा, स्पोर्ट्स डे, शालेय सहल,स्नेहसंमेलन, नवीन वही पुस्तकांचा सुगंध ,वहीतील चिठ्ठ्या, चोरून खाल्लेली बोरं, चॉकलेट आणि टिफिन शेअर करणारी मैत्री. हे सर्व आठवणींच्या कपाटातून अचानक समोर आले. कार्यक्रमाची सुरुवात आणि सन्मान कार्यक्रमाची सुरुवात कै. बापूसाहेब पाटील यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून राष्ट्रगीताने झाली. मंचावर संस्थापक अध्यक्ष सुभाषराव पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक जवंजाळ तसेच व्ही. एम. उबरहंडे, ए. बी. उबरहंडे , मानत्कर , जाधव , धंदर , वैराळकर , अंभोरे, दळवी , नाईक , टेकाळे , इंगळे , मोरे , आदी शिक्षकगण यावेळी उपस्थित होते.

प्राथमिक शाळेच्या माजी शिक्षिका सौ. पाटील व सौ. जामेकर यांची उपस्थिती सर्वांना भावली जाधव यांनी सुरेल स्वागतगीत सादर करून वातावरण भक्तिरसात न्हाऊन टाकले. विविध माजी विद्यार्थ्यांनी आपापल्या आठवणी, यशाच्या वाटा आणि शिक्षकांविषयीचा आदर व्यक्त केला.

कार्यक्रमात तब्बल ७० हून अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. त्यात ज्ञानेश्वर पोफळकर, राजेश जाधव, प्रताप साळवंत, गणेश काटे, शिवराज काटे, निलेश जाधव, अनंता जाधव,सुरेश जाधव, प्रशांत जाधव, संदिप राजगुरे, अशोक बिबे,ज्ञानेश्वर जाधव, ज्ञानेश्वर सपकाळ, गजानन तायडे, विठ्ठल तायडे, विनोद जाधव,अनंता वैद्य, परमेश्वर लोखंडे, अमोल कल्याणकर,गणेश पडोळ, देविदास रिंढे, अनिल रिंढे, सचिन खरे, भागवत जाधव, संदिप जाधव, चंद्रकांत हिवाळे, हबीबखा पठाण,भागवत शेवाळे,संतोष धंदर, गजानन खडके, पवन भालेराव, अनंता पंडित, समाधान तायडे,योगेश पंडित, सोमनाथ काळे,रामेश्वर पंडित, विनोद पैठणे, प्रकाश पैठणे, अमोल रिंढे, दिपक पवार, मिलिंद इंगळे,तुकाराम खडके,राधा पंडित, मंदा जाधव, शुभांगी पंडित, सविता भोपळे, सुषमा जाधव,कुशवर्ता जाधव,राधिका जाधव,स्वाती जाधव,प्रीती सोनुने,मंदा सोनुने,कांता निंभोरे, निर्मला रदाळ, साधना वैद्य, सरला पवार,विजया रिंढे यांचा समावेश होता.

## सागर फुंडकर व सतीश राठी यांच्या वाढदिवसानिमित्त २० मे रोजी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१४

बाबुजी गोल्ड एडिबल ऑइल यांच्या सौजन्याने सागरदादा फुंडकर व बुलडाणा जिल्हा चेस सर्कलचे अध्यक्ष सतीशभाऊ राठी यांच्या वाढदिवसानिमित्त बुलडाणा जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणीचे आयोजन गुरुकुल ज्ञानपीठ, धाड रोड बुलडाणा येथे मंगळवार दिनांक २० मे २०२५ रोजी करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेची संलग्नता प्राप्त असलेली बुलडाणा जिल्हा चेस सर्कल, बुलडाणा यांच्या द्वारे आयोजीत महाराष्ट्र राज्य स्पर्धेकरिता बुलडाणा जिल्ह्यातुन खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये विविध गटामधील विजेत्याा खेळाडुंना सन्मान चिन्ह व राज्यस्तरीय स्पर्धेचे निवड पत्राक (प्रमाणपत्र) देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य मध्ये होत असलेल्या खालील वयोगटामध्ये अनुक्रमे (१ जानेवारी २०१६ नंतर जन्मलेले-९ वर्षाखालील) (१ जानेवारी २०१४ नंतर जन्मलेले-११ वर्षाखालील) (१ जानेवारी २०१२ नंतर जन्मलेले-१३ वर्षाखालील) (१ जानेवारी २०१० नंतर जन्मलेले-१५ वर्षाखालील (१ जानेवारी २००८ नंतर जन्मलेले-१७ वर्षाखालील) (१ जानेवारी २००६ नंतर जन्मलेले-१९ वर्षाखालील) (ओपन चॅम्पियनशिप) (वुमेन्स चॅम्पियनशिप) अशा आठ गटांची जिल्ह्यातून निवड चाचणी घेण्यात येणार आहे व खेळाडूची निवड करण्यात येणार आहे. ही स्पर्धा मंगळवार दिनांक २० मे २०२५ रोजी गुरुकुल ज्ञानपीठ, धाड रोड, बुलडाणा , जि. बुलडाणा येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेमध्ये १५ वर्षाखालील (मुले व मुली), १९ वर्षाखालील (मुले व मुली), वुमेन्स चॅम्पियनशिप व ओपन चॅम्पियनशिप या गटातील अनुक्रमे पहिले चार क्रमांक पटकावणाऱ्या विजेते खेळाडू यांना सन्मानचिंह व बुलडाणा जिल्ह्यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड पत्राक (प्रमाणपत्र) देण्यात येतील. ९ वर्षाखालील (मुले व मुली), ११ वर्षाखालील (मुले व मुली), १३ वर्षाखालील (मुले व मुली), १७ वर्षाखालील (मुले व मुली) या चार गटातुन पहिले दोन विजेते यांना सन्मानचिंह व बुलडाणा जिल्ह्यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड पत्राक (प्रमाणपत्र) देण्यात येतील. स्पर्धेची नोंदणी दिनांक १९ मे २०२५ दुपारी २ वाजे पर्यंत करण्यात येईल. ज्या खेळाडूंनी नोंदणी केली आणि ज्या गटामध्ये नोंदणी केली त्यांनाच सहभाग घेता येणार आहे याची दक्षता घेण्यात यावी.

स्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या खेळाडूं यांचा आधार कार्ड वर बुलडाणा जिल्हयाचा पत्ता असेल तरच त्यांना सहभाग घेता येईल, आपला सहभाग नोंदवण्याकरिता व इतर माहितीसाठी स्पर्धेचे मुख्यपंच दिपक चव्हाण ०७७९८१८३८९६ आणि सौ वर्षा बोबडे यांच्या सोबत संपर्क करावा अशी माहिती स्पर्धेचे मुख्य आयोजक तथा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे सहसचिव व बुलडाणा जिल्ह्या चेस सर्कलचे सचिव अंकुश रक्ताडे यांनी सांगितले.

## थोडक्यात

### लग्न वऱ्हाडाच्या वाहनावर वाहतूक पोलिसांची वक्रदृष्टी



**वाशीम :** शहरातील वाहतूक व्यवस्था ही पूर्णता मोडकळीस आली असून अवैध प्रवाशी वाहतूक जड वाहनांची ये जा बेशिस्त वाहतुकीमुळे वाशीम शहरातील पुसद नाका, पोष्ट ऑफीस चौक, हिंगोली नाका यांठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे. याचाच. त्रास. प्रवाशांना होत असून वाहतुक पोलीस केवळ लग्न वऱ्हाडाच्या आणि जनावरांच्या वाहनावर तुटून पडत असल्याचे चीत्र वाशीम शहरात दिसुन येत आहे वाशीम ते पुसद हींगोली रिसोड मालेगांव मेहकर शेलुबाजार किन्हीराजा या मार्गावर वाहनांची सदैव वदर्ळ असते. परंतू सर्वात. जास्त वाहतुकीची कोंडी ही पोष्ट ऑफीस जवळील वळण रस्यावर होत असून पुसद नाका हिंगोली नाका, पाटणी चौक, बाबासाहेब या परिसरात जास्त वाहतुक कोंडी होते. वाहतूक शाखेचे कर्मचारी हे लग्नाच्या वऱ्हाडाच्या गाडीवरच जास्त लक्ष देत आहेत. लग्न वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या वाहनावर बॅनर दिसले की वाहतुक त्यानवाहनाचाच जास्त पाठलाग करून तडजोड करतात. असाच प्रसंग पोष्ट ऑफीस चौकात दोन दिवस अशी घडला एकीकडे वाहनाच्या रांगा लागल्या असतांना लग्नाच्या वऱ्हाडाच्या गाड्या वाहतुक पोलिसांनी पोस्ट ऑफीस रोडवरच थांबवील्या. त्यामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. याकडे पोलिस अधीक्षकांनी लक्ष देणे आवश्यक झाले आहे.

### शिकवणी वर्ग न लावता समीक्षाने मिळविले स्वबळावर यश

**वाशीम** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च



माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल आज, १३ मे रोजी दुपारी १ वाजता अभासी पद्धतीने जाहीर केला. त्यामध्ये राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेची विद्यार्थीनी समीक्षा भगवान कोतीवार हिला ८० टक्के गुण मिळाले आहेत. समीक्षा ही काटा येथील रहिवासी असून, शिकवणी वर्ग न लावता जिद्द, चिकाटी आणि मेहनतीवर तिने हे यश मिळिवले आहे. साधारण कुटूंबातील असलेल्या समीक्षाने मिळिवलेल्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष, वर्गशिक्षक व आई, वडिलांना दिले आहे.

### यशवंतराव चव्हाण हायस्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा

**मंगरुळपीर :**स्थानिक यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूल आपल्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत याही वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण प्राप्त करून शाळेचे नावलौकिक केले यामध्ये उद्धव लांडे ९५.४० तन्वी पवार ९४.८० अनुष्का वाघमारे ९४.६० वैभव धोत्रे ९४.४० कुणाल भोंडणे ९४.४० शिवानी राठोड ९३.६० भक्ती बजाज ९३.०० सुमित तायडे ९३.०० अनुष्का सावके ९२.०० आस्था अवघण ९१.८० तुषार राठोड ९१.८० कस्तुरी सुखाडिया ९१.२० पार्थ मानेकर ९०.८० आणि सुशील नाचणे ९०.०० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले त्याचबरोबर शाळेतील विशेष प्राविण्य प्राप्त ५३ विद्यार्थी प्रथम श्रेणी २९ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणी मध्ये ११ विद्यार्थ्यांनी भरघोस गुण प्राप्त करून विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष ठाकरे तसेच सचिव चंद्रकांत ठाकरे मुख्याध्यापिका शारा राजन व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

### पांगरी नवघरे सरपंच पदाचे आरक्षण बदलण्यात यावे

**वाशिम :** मालेगाव तालुक्यातील पांगरी नवघरे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी नुकतीच आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये सरपंच पद 'अनुसूचित जमाती - पुरुष' या प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले आहे. मात्र, यापूर्वी म्हणजे २०२० मध्ये काढलेल्या आरक्षणात हे पद 'अनुसूचित जाती - महिला' या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले होते. मात्र त्या आरक्षणानुसार निवडणूकच झालेली नसल्याने मूळ लाभार्थी प्रवर्ग अद्यापही वंचितच राहिला आहे. त्यामुळे मूळ आरक्षण कायम ठेवण्याची मागणी चैताली विनोद बोरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.
२०१९ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीनंतर ग्रामपंचायतीचा कार्यकाळ मार्च २०२४ मध्ये संपुष्टात आला. त्यानंतर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. दरम्यान, २०२० साली सरपंच पद अनुसूचित जाती - महिला या प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात आले होते. मात्र निवडणूक न झाल्यामुळे त्या आरक्षणाचा लाभ प्रत्यक्षात मिळालाच नाही. अशा स्थितीत २०२५ मध्ये नवीन सोडत काढण्यात येऊन आरक्षण दुसऱ्या प्रवर्गासाठी देण्यात आल्याने हा अन्याय असल्याचे बोरकर यांनी स्पष्टपणे नमूद केले.ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून आजवर एकदाही राखीव प्रवर्गातील उमेदवाराला सरपंचपद मिळालेले नाही. त्यामुळे आधीच्या निश्चित आरक्षणाचा लाभ व्हावा, यासाठी अनुसुचित जाती महिला प्रवर्गाचे आरक्षणच कायम ठेवले जावे,ङ्घ अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली असून नव्याने काढलेल्या आरक्षणात तत्काळ फेरबदल करावा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# मुख्य मार्गावर यापुढे 'नो हॉकर्स झोन'

## हॉकर्स यांना व्यवसायासाठी नगर परिषदेकडून जागा मिळणार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** शहरातील वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या पाटणी चौकातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी १३ मेपासून नगरपरिषद, पोलीस आणि परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कारवाईला सुरुवात झाली आहे. या मोहिमेमुळे परिसरातील मुख्य रस्ता मोकळा झाला असून, नागरिकांनी यामुळे सुटकेचा श्वास घेतला आहे.
वाशिम शहरातील पाटणी चौक ते शिवाजी चौक व बालाजी मार्केट परिसरात वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झालेली होती. फळ, भाजी विक्रेते हे मुख्य रस्त्यावर त्यांच्या फळभाजीच्या गाड्या उभ्या करीत असल्याने तसेच व्यापाऱ्यांनी त्यांचे दुकानसमोर शेड उभारून अतिक्रमण केल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना खुप मोठा अडथळा निर्माण होत होता. व्यापाऱ्यांनी त्यांच्या दुकानातील माल रोडवर ठेवलेला असल्याने वाहतुकीस अडचणी निर्माण होत होती. यामुळे शहरातील अनेक नागरीक त्रस्त होते. दिवसेंदिवस वाहतुक समस्या गंभीर होत असल्याने मा. पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी याची दखल घेत कार्यवाही करण्याचे आदेशित केले.
त्यानुसार अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, लता फड, अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांचे मार्गदर्शनात नवदिप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक, उपविभाग वाशिम, पोनि रामकृष्ण महल्ले, पोनि



देवेंद्रसिंह ठाकुर, पोनि श्री संतोष शेळके व इतर पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच नगरपरिषद वाशिम मुख्याधिकारी निलेश गायकवाड व त्यांचे पथक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी वाशिम संग्राम जगताप व त्यांचे पथक अशा तीन विभागांच्या पथकांनी संयुक्त कार्यवाही करून वाशिम शहरातील पाटणी चौक ते शिवाजी चौक व बालाजी मार्केट परिसरातील फळभाजीच्या गाड्या, व्यापाऱ्यांनी रोडवर उभारलेली शेड इत्यादी अतिक्रमण काढून कार्यवाही केली आहे. व्यापाऱ्यांना त्यांचे दुकानातील माल रोडवर न ठेवणे बाबत सुचना दिल्या आहेत.
भाजीपाला व फळिवक्रेते यांना आवाहन करण्यात येते की आपल्याला नगरपरिषद वाशिम यांनी निर्देशित केलेल्या जागेतच आपण आपली दुकाने लावावित तसेच नागरीकांनी आपली वाहने पार्कींग करीता राखीव असलेल्या जागेतच उभी करावित जेणे करून वाहतुक समस्या उदभवणार नाही. कोणीही वाशिम शहरातील पाटणी चौक ते शिवाजी चौक व बालाजी मार्केट परिसरात रोडवर भाजीपाला व फळ गाडी उभी करणार नाही, तसेच दुकानसमोर शेड उभारून रोडवर दुकानातील माल ठेवणार नाही किंवा रोडवर आपले वाहन उभे करणार नाही अन्यथा प्रशासनातर्फे कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. असा इशारा देण्यात आला आहे.
पाटणी चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर फेरीवाले, भाजी विक्रेते आणि इतर व्यापाऱ्यांचे अतिक्रमण वाढले होते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता, तसेच अपघाताचा धोका देखील वाढला होता. संयुक्त कारवाईमुळे हे अतिक्रमण हटवण्यात यश आले असून, रस्त्यांची मोकळीक नागरिकांना जाणवू लागली आहे.
दरम्यान, हटवण्यात आलेल्या फेरीवाल्यांना बालाजी मार्केट आणि महात्मा फुले मार्केट येथे पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. यापुढे कोणतेही स्थानिक व्यापारी किंवा फेरीवाले रस्त्यावर अतिक्रमण करत असल्यास, त्यांच्या विरुद्ध कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

## विद्याभारती माध्यमिक शाळेच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** येथील विद्याभारती शाळेचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे. यावर्षी सुद्धा शाळेने आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतील ४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून सर्व ४५ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.
इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी श्रावणी वाटाणे ९७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर श्रुती सरकटे हिने ९५ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे.



तर प्रियंका सुर्वे ही विद्यार्थिनी ९४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे. तसेच पूनम नरवाडे ९३%, कृष्णा काष्टे ९१%, सानिका राऊत ९०% या विद्यार्थ्यांनी देखील उज्वल यश मिळवले आहे. आपले भविष्य उज्वल करण्यासाठी अविरत परिश्रम करून प्रयत्नांची पराकाष्टा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी शाळेने या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष प्रा.सुरेशराव मिटकरी तर प्रमुख पाहुणे शाळेचे उपाध्यक्ष तथा नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी नंदकिशोर मिटकरी, संचालक सुमित मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी, ए.पी.आय. (शहरी विभाग वाशिम ) प्रमोद इंगळे, पर्यवेक्षक विजय गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.
शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शाळेचे उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी तसेच ए.पी.आय. प्रमोद इंगळे यांनी सुद्धा यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांना भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. उपस्थित पालकांनी शाळेचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे यांनी विद्यार्थ्यांचे , शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निमके तर आभार प्रदर्शन कीर्ती कुलकर्णी यांनी केले.



शिवाजी नगर (काटा रोड) वाशिम येथील रहिवासी असलेले शिक्षक नत्थुजी बुंधे यांच्या परस बागेत फुललेला 'मे फ्लावर'

## भाजपा जिल्हाध्यक्षपदी चितलांगे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १४ :** सामाजिक, सांस्कृतीक व आरोग्य क्षेत्रात मागील दोन दशकापासून सक्रीय असलेले पुरुषोत्तम लालचंद चितलांगे यांची भारतीय जनता पार्टीच्या वाशिम जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे . त्यांच्या निवडीचे वृत्त समजताच जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांधे कुठे खुशी तर कुठे नाराजीचा सूर बघायला मिळाला.



पुरुषोत्तम चितलांगे यांनी भाजपाचे बुथ प्रमुख , शहर अध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस, प्रदेश कार्यकारणी सदस्य, विधानसभा, लोकसभा, निवडणुकीत विविध जबाबदाऱ्या तसेच पक्षाने विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे आजपर्यंत पार पाडल्या. लोकांच्या सेवेसाठी दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी शिबिर , नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर, वृक्षारोपन, गरजवंताना मदत असे अनेक विधायक कार्य करणारे पुरुषोत्तम चितलांगे हे जिल्हा अध्यक्ष झाल्यामुळे एका जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांला पक्षाने न्याय दिला . अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.
पुरुषोत्तम चितलांगे हे दोनवेळा भाजपाचे नगर सेवक होते . तसेच आमदार श्याम खोडे, सुरेश लुंगे व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन त्यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणुक सन २०१९ मध्ये लढविली होती . परंतु त्यामध्ये त्यांना अपयश आले.पक्षाचे प्रदेशावरील सर्व वरिष्ठ नेते, कोअर कमेटी, जिल्ह्यातील नेते, सर्व आमदार ह्यांच्या मार्गदर्शनात व सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते या सर्वांना विश्वासात घेऊन भाजपाचे कार्य बुथ पर्यंत पोहचुन सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहचण्याचा मी प्रयत्न करेल . असे मत यावेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी व्यक्त केले.

## जलतारा शोषखड्डे निर्मितीच्या कामांना गती द्या-तहसीलदार पळसकर



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** जलतारा जिल्ह्यात जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्र विकासासाठी जलतारा शोषखड्डे निर्मितीच्या कामांना गती द्या, सध्या ही कामे 'मिशन मोड'वर राबवा असे आवाहन तहसीलदार निलेश पळसकर यांनी वारा जहागीर येथे जलतारा योजनेचे प्रचार आणि प्रसार कार्यक्रमात दि १४ मे रोजी केले. यावेळी वाशीम नगरपरिषद चे माजी नगराध्यक्षा अशोक हेडा, जि प सदस्य अर्चना खोरणे , डिगांबर खोरणे, महसूल मंडळाधिकारी ईढोळे,कृषी मंडळाधिकारी गंगाधर इंगोले, तलाठी, रूपाली राऊत, सरपंच ज्योती धाडवे, महादेव लांभाडे, कृषी सहायक डी एम पाईकराव, विलासराव ढगे ,इत्यादींची उपस्थिती होती, जिल्हा अधिकारी व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून आणि शेतकरी व ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाने आतापर्यंत यूद्धपातळीवर जलतारा कामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली,असी माहिती तहसिलदार नीलेश पळसकर यांनी यावेळी दिली तसेच यावेळी अनेक जलतारा योजनेच्या शोषखड्डयाचे भूमिपूजन तहसिलदार यांच्या हस्ते करण्यात आले.
भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवणे शोषखड्डयांमुळे पाऊस आणि इतर पाण्या सहण्याचे स्रोत जमिनीमध्ये साठतात, ज्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते, पाणी टंचाई कमी करणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढल्याने, सिंचनासाठी आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध होते, कृषी उत्पादनात वाढ करणे इत्यादी बाबतीत जलताराचा फायदा होतो अशी माहिती कृषी सहायक डी एम पाईकराव यांनी दिली.

### १५०० शोषखड्डुयांचा अर्धा खर्च अशोक हेडा उचलणार

जिल्हाधिकारी व तहसिलदार वाशीम यांचा महत्वकांक्षी असणार्या व जनहितार्थ असलेल्या जलतारा योजनेला गती देण्याची वाशीम नगरपरिषद चे माजी नगराध्यक्षा अशोकभाऊ हेडा ह्यांनी आपल्या जन्मभूमी असलेल्या वारा जहागीर येथे १५०० शोषखड्डुयाचा अर्धा खर्च स्वतः उचलणार असल्याची घोषणा आज वारा जहागीर येथे केली आहे.

# रात्रभर मचानावर बसून निसर्गप्रेमींनी घेतली प्राण्यांची नोंद

## काटेपूर्णा अभयारण्यात पार पडली प्राणीगणना







दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १४ :** बौद्ध पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात न्हालेल्या रात्री काटेपूर्णा अभयारण्यात वन्यजीव गणनेचा रोमांचकारी अनुभव निसर्गप्रेमींनी घेतला. वाशीम-अकोला जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या या अभयारण्यात १२ मे रोजी दुपारी दोनपासून प्राणीगणना उपक्रमाला सुरुवात झाली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पर्यटकांनी रात्रीच्या गूढ शांततेत मचानावरून प्राण्यांचे निरीक्षण करत त्यांची नोंद घेतली.
सुमारे ६५०० हेक्टर क्षेत्रफळावर पसरलेल्या या अभयारण्यात नैसर्गिक व कृत्रिम पाणवठ्यांच्या ठिकाणी १० मचाने उभारण्यात आले होते. बौद्ध पौर्णिमा ही विशेष मानली जाते कारण त्या दिवशी चंद्रप्रकाश अधिक तेजस्वी असतो. याच कारणामुळे अनेक वन्यजीव रात्री पाण्यासाठी बाहेर पडतात. हीच संधी साधत वनविभागाने प्राणीगणनेचे आयोजन केले. या रात्री निसर्गप्रेमींना बिबट, चितळ, सांबर, काळवीट, नीलगाय यासारख्या प्राण्यांचे तसेच विविध पक्ष्यांचे दर्शन झाले.
रात्रभर चाललेल्या या उपक्रमात अनेक निसर्गप्रेमींनी वन्यजीवांचे आवाज, पक्ष्यांची किलबिल, आणि मचाणावरून दिसणारा चंद्रप्रकाशात न्हालेला निसर्ग अनुभवत प्राण्यांच्या हालचालींची काळजीपूर्वक नोंद घेतली. काही पर्यटकांना बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने त्यांचा अनुभव अविस्मरणीय ठरला.
वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांनी सांगितले की, वैशाख पौर्णिमेच्या रात्री दरवर्षी प्राणीगणना उपक्रम राबवला जातो. याला 'निसर्ग अनुभव' असे नाव दिले असून, यंदाही पर्यटकांनी ऑनलाइन बुकिंगच्या माध्यमातून सहभाग घेतला. यंदा आभाळ आणि अवकाळी पावसामुळे प्राणीगणनेवर काहीसा परिणाम झाला, तरीही अनेक प्राणी व पक्षी पाहायला मिळाले. वाशिमहून आलेले पर्यटक विकी डोंगरे म्हणाले, ही माझ्यासाठी अविस्मरणीय रात्र ठरली. रात्री बारा वाजता आमच्या मचाणाजवळील पाणवठ्यावर बिबट्याचे दर्शन झाले. निसर्गाची ती गूढ शांतता आणि वन्यजीवांचे सहज वावरणे अनुभवता आले.
या उपक्रमाचे नियोजन विभागीय वन अधिकारी निमजे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल एन. डी. तुपकर, वनरक्षक एन. ए. खोडके, पी. बी. यादव, ए. पी. पोटे, पी. डी. कांबळे, पी. के. राठोड आणि इतर कर्मचाऱ्यांनी केले.

**या प्राणीगणनेदरम्यान नोंदवले गेलेले एकूण प्राण्यांचे संख्यात्मक विवरण पुढीलप्रमाणे :**
**बिबट - ३, चितळ - ८७, चिंकारा - २, अस्वल - १, नीलगाय - ६४, रानडुक्कर - ५७, कोल्हा - ९, मोर - ३७, उदमांजर - ५, रानमांजर - ६, सायाळ - ११, ससा - ४, भेकडी - ५, वानर - ७५, रानकुत्रा - ३.**

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
आ. साजिद खान पठाण
विधानसभा सदस्य, अकोला पश्चिम, महाराष्ट्र राज्य

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
केल्विन सुबी (युवा समाजसेवक)
कमलजीत कौर (समाजसेविका)

अजिंक्य भारत ला वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सौ. विद्या गोळे
विमा व गुंतवणूक सल्लागार भारतीय जीवन विमा निगम, अकोला
प्रा. संजय गोळे
प्राजक्ता कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय अकोला.
अकोला जिल्हा उपाध्यक्ष
विदर्भ ज्युनिअर कॉलेज टीचर्स असोसिएशन नागपूर.
अकोला जिल्हा सचिव
महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ मुंबई
अकोला जिल्हा उपाध्यक्ष
कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी अध्यापक परिषद अकोला

KCC Living... to lifestyle | 37 साल से अविरत प्रवास... | तिन दशकांचा वारसा
डेव्हलपमेंट कन्सल्टंट अँन्ड बिल्डर्स
दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
स्वतःच्या नव्या घरात पदार्पण करा
लोटस पार्क
448 घरांची हायटेक टाऊनशिप
रु. 2.50 लक्ष
प्र.आ.यो.अंतर्गत सबसीडी* 1BHK फ्लॅट करीताच.
अत्याधुनिक DUPLEX
सर्व सुविधायुक्त Flats
RERA REGISTRATION NO. P50100047492
लोटस पार्क | 1 BHK FLATS | 2 BHK FLATS | 3 BHK FLATS | Duplex
MIDC शिवणी रोड, अकोला
लोटस ग्रीन
406 घरांची हायटेक टाऊनशिप
RERA REGISTRATION NO. P50100033083
लोटस ग्रीन | 1 BHK FLATS | 2 BHK FLATS | 3 BHK FLATS
गिता नगर, अकोला
* नियम व अटी लागू
पंकज कोठारीज् KCC
कार्यालय संपर्क
कोठारी कंस्ट्रक्शन कंपनी
१०३ रामी हेरीटेज, जुने आर.टी.ओ. ऑफिस समोर, अकोला
प्रकल्प पूर्णत्वाकडे...
97649 99715
87674 09727
93078 72332

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
किफायतशीर कर्ज हप्ता, सुलभ कर्ज प्रक्रिया
हाऊसिंग लोन 8.50% (फिक्स)*
बँकेचा वायदा फायदाच फायदा
Working Capital Limit नजरगहाण कर्ज Hypothication Loan 9 %*
No Prepayment Charges
सुलभ हप्त्यामध्ये परतफेडी साठी जास्तीत जास्त कालावधी
नको जमानत बिना कामी* कर्ज परतीची हवी हमी...
* अटी व शर्ती लागू
व्यापार, उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी आम्ही सादर करीत आहोत
कर्जावर किफायतशीर व्याजदर*
गोल्ड लोन 9.50%
टर्म लोन SSI UNIT 9.00%
प्रोफेशनल लोन 9.50%
शैक्षणीक कर्ज 7.50%
चार चाकी वाहन कर्ज 9.50%
वेअर हाऊस रसिद तारण कर्ज 9.50%
डॉक्टर्स लोन 8.00%*
NSC/LIC POLICY तारण कर्ज 9.00%
सौर ऊर्जा कर्ज 9.50%
अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा
दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि; अकोला
स्थापना : १९६९ | मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : "जनवैभव", जुने कॉटन मार्केट, अकोला (महाराष्ट्र) ४४४००१ Website : www.akolajanatabank.com E-mail : customercare@akolajanatabank.com

दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
डॉ. दिपक मोरे
गोविंद हॉस्पिटल, अकोला

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
काळे हॉस्पीटल
हृदयरोग | मेंदुरोग | किडनी विकार | दमा विकार | स्त्री रोग
आयकॉन हॉस्पीटल मागे, मारुती शोरुमच्या पुढे, न्यु भागवत प्लॉटस, जठारपेठ, अकोला. मो. 8600007921
डॉ. श्रीकांत काळे
M.B.B.S. (Gold Medalist)
M.D. (Medicine) J.J. Hospital, Mumbai
इकोकार्डियोग्राफी सोनोग्राफी सेवा उपलब्ध
कन्सल्टिंग फिजिशियन हृदयरोग,
मधुमेह, मेंदुरोग व किडनी विकार तज्ञ
डॉ. दिपाली काळे
M.B.B.S., D.G.O. (Mumbai)
स्त्री रोग तज्ञ

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
डॉ. सौ. सिमा पुरुषोत्तम तायडे
एम.बी.बी.एस, डि.जी.ओ.
अमृत हॉस्पिटल दुर्गा चौक अकोला.

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
विशाल दुबोले
मंगेश महल्ले
मे. एम. व्ही. कॅन्स्ट्रक्शण, अकोला

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
दै. अजिंक्य भारत वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
पंकज गांवडे
मा. नगरसेवक, म.न.पा. प्रभाग क्र. १९

दैनिक अजिंक्य भारतच्या
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
संग्रामभैय्या गावंडे
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट)

दैनिक अजिंक्य भारतच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त
Ambuja® GOLD
हार्दिक शुभेच्छा!
Soya Chunks
Edible Oils
Flours
Manufactured & Packed by :
GUJARAT AMBUJA EXPORTS LIMITED
"An ISO 9001:2015 Certified Company"
With Best Compliments From
Rtn. Brijmohan Chitlange
President Operations,
Gujarat Ambuja Exports Ltd Akola
Regd. Office & Consumer Care Cell :
Ambuja Tower, Opp. Sindhu Bhavan, Sindhu Bhavan Road, Bodakdev, PO, Thaltej, Ahmedabad - 380059
Consumer Care No. : 079-61556677
Email : info@ambujagroup.com

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलढाणा, गुरूवार १५ मे २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

**बुलडाणा** : राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे गुरुवार व शुक्रवार दि. १५ व १६ मे २०२५ रोजी दोन दिवसीय बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार गुरुवार दि. १५ मे रोजी मुंबई येथून शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे सोईनुसार आगमन व राखीव. शुक्रवार दि. १६ मे रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्राम गृह येथे अभ्यांगतांसाठी राखीव, दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक व दुपारी ३.३० वाजता खरीप आढावा(२०२५-२६) बैठकीला उपस्थिती. बैठकीनंतर शासकीय विश्राम गृह बुलढाणा येथे राखीव. त्यानंतर सोईनुसार पुणेकडे रवाना होतील.

### छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन



**बुलडाणा** : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, अजिंक्य घोडके निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, तहसीलदार संजीवनी मोकळे, वृषाली केसकर, प्रमोद करे जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

### पाणी टंचाई निवारणार्थ गावासाठी टँकर मंजूर

**खामगाव** : पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील हनवतखेड, गिरडा, मढ या तिन गावात पिण्याच्या पाण्याचा पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. हनवतखेड येथे १४७ पशुधन व ३९७ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १३ हजार ८२० लिटर्स, गिरडा येथे २५५ पशुधन व ९४० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे २० हजार ९०० लिटर्स व मढ येथे ४२५ पशुधन व २१३४ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ३० हजार ९०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९००-२३०० |
| गहु | २४००-२४७५ |
| मका | १७२५-२०२० |
| मोहरी | ५३००-५३०० |
| मलाई चना | ५८००-८४०० |
| तुर | ६२००-७२०० |
| हरभरा | ५५००-५६२५ |
| भुईमुग | ४५००-५७७५ |
| सोयाबीन | ३५००-४४२५ |

# उपविभागीय कार्यालयावर धडकला शेतकऱ्यांचा मोर्चा

## संपूर्ण कर्जमाफी व पीक विमा द्या : शेतकऱ्यांची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
सिंदखेड राजा , दि.१४

**गरज त्याला व मागेल त्याला कर्जमुक्ती तसेच पिक विमा देण्यात यावा या मागणी करता दिनांक १४मे रोजी उपविभागीय कार्यालय सिंदखेडराजा येथे हजारो शेतकरी बांधवांचा आक्रोश मोर्चा धडकला, सदर मोर्चाला सुरुवात पंचायत समितीच्या प्रारंगणातून करण्यात आले जय जवान जय किसान संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे पिक विमा मिळालाच पाहिजे अशा घोषणा देत मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला त्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले.**






यावेळी गजानन जायभाये यांनी आपले विचार व्यक्त केले,त्यानंतर शेतकरी मित्र दिलीप चौधरी त्यांनी सांगितले की संपूर्ण कर्जमाफी व पिक विमा मिळाला पाहिजेत ही लढाई शेवटपर्यंत सुरूच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले , संजीवनीताई वाघ ज्यांनी सुद्धा भाषण केलं यावेळी कृषी योद्धा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर खरात यांनी सांगितले की उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे शेतकऱ्यांचा अपमान करत असून मी कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिलेच नाही असे सांगतात लाडकी बहीण योजनेला निधी पुरवतात मात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी व शेतकऱ्यांचा राहिलेला पिक विमा देण्यासाठी मात्र टाळाटाळ करतात , सरकारला कर्जमाफी व राहिलेला पिक विमा देण्याकरता भाग पाडू , यावेळी शेतकऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावांच्या घोषणा दिल्या त्यानंतर शेतकरी योद्धा फाउंडेशनचे बालाजी सोसे यांनी सांगितले की संपूर्ण कर्जमाफी व मागील त्याालाच पिक विमा देण्यात यावा जर संपूर्ण कर्जमाफी व पिक विमा मिळाला नाही तर एक जून पासून समृद्धी महामार्गावर शेतकऱ्यासह रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला तर सहा जूनला हजारो शेतकरी मुंबईला मंत्रसलयावर नेऊ असे सांगितले शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढणार असल्याचे सोसे यांनी सांगितले तर आपल्या काही कार्यकर्त्यांना मोर्चामध्ये जाऊ नका अशा आशयाचे फोन काही नेत्याकडून आल्याचा गौप्यस्फोट सोसे यांनी केला शिवाय आपण कुठलेही निवडणूक लढवणार नाही यावेळी सोसे यांना अश्रू अनावर झाले , त्यानंतर उबाठा नेते छगनदादा मेहत्रे यांनी सुद्धा राज्य सरकारवर हल्लाबोल केला या सरकारला इथून पुढे निवडून देऊ नका जे आमदार विधानसभेमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती बद्दल पीक विमा बद्दल बोलणार नाहीत अशा आमदारांना गावबंदी लग्नबंदी करावी असे सांगितले त्याानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले की राज्य सरकार संपूर्ण कर्जमाफी देण्याचे टाळत असून जिल्ह्यामध्ये अनेक शेतकरी पिक विमा पासून वंचित आहे सरकारने सरसकट पिक विमा द्यावा आम्ही शेतकऱ्यांच्या सोबत शेवटपर्यंत असणार आहे एक जून पासून आपण रस्त्याावर उतरणार असल्याचे यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले तसेच ज्या बँकांनी शेतकऱ्यांच्या पैशाला होल्ड लावले आहेत बँकेच्या व्यवस्थापकांना धडा शिकवण्याचे काम आपण उद्यापासून करणार असल्याचे त्याांनी सांगितले.

सदर मोर्चामध्ये हजारो शेतकरी सहभागी झाले होते मोर्चा करांना पिक विमा व कर्ज मुक्तीचे अर्ज देण्यात आले होते. सदर मोर्चाला आमदार सिद्धार्थ खरात छगन मेहत्रे, बद्री बोडखे संजीवनी वाघ ज्ञानेश्वर, खरात पाटील, आयोजक बालाजी सोसे शेतकरी योद्धा कृती समिती दिलीप चौधरी गजानन जायभाये यावेळी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराजांना दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात अभिवादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१४

छत्रापती संभाजी महाराज जयंती निमित्या दिल्ली येथे आलेल्या रथ यात्रेत आणि महाराष्ट्र सदनात आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्या साधून ९ मे रोजी नासिक येथून छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन चरित्र विशद करणारी एक रथयात्रा निघाली होती. ही रथयात्रा छत्रपती संभाजीनगर, जयपूर मार्गे प्रवास करत आज १४ मे रोजी दिल्ली येथे आली. या रथयात्रमध्ये महाराष्ट्रातील



कानाकोपऱ्यातून सुमारे ३०० नागरिक सहभागी झाले होते.

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव ही या रथयात्रेमध्ये दिल्लीत सहभागी झाले. त्यानंतर दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रापती संभाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केलं .

यानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, छत्रापती संभाजी महाराजांचे कार्य हे सर्वांनाच प्रेरणादायक आहे. त्याांचे शौर्य, बाणेदारपणा आणि आत्मबलिदान आम्ही कधीही विसरू शकणार नाही.

दिल्ली येथील महाराष्ट्र साधनात झालेल्या छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवात महाराष्ट्रीयन नागरिक व महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्याा.

# मोटारसायकल आणि कारची समोरासमोर धडक; मोटारसायकलस्वार जागीच ठार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.१४

साखरखेर्डा ते लव्हाळा रोडवर काल रात्री ११:३० वाजता मोटारसायकल आणि कारची समोरासमोर धडक झाल्याने एका शिक्षकांचा जागीच मृत्यू झाला. मृतकाचे नाव वैभव दामोदर टाले वय २७ वर्ष रा. मलकापूर पांग्रा आहे.

गोरेगाव येथील शेळके कुटूंबातील लग्न सोहळा साखरखेर्डा येथील एका मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यासाठी मलकापूर पांग्रा येथील वैभव दामोदर टाले वय २७ वर्ष हाही कुटुंबासह हजर होता . लग्न सोहळा होण्यापूर्वी दोघा पती पतीत दागिन्यावरुन किरकोळ भांडण झाले . लग्न लागल्यानंतर रागाच्या भरात पती ही माहेरी सारशिव येथे चिमुकल्या मुलीला घेऊन गेली . ही माहिती वैभवला समजताच त्याााने मलकापूर पांग्रा येथे न जाता सारशिवकडे निघाला . त्याचवेळी साखरखेर्डा ते लव्हाळा रोडवर मोहखेड शिवारातील पंजाबराव ताठे यांच्या शेताजवळ हा अपघात झाला. लव्हाळा येथून साखरखेर्डा येथे एम एच ३८ एडी ३८०३ या भरधाव वेगाने आलेल्या कारणे जबर धडक दिली. तब्बल २० फुट मोटारसायकल फरफटत कारने नेली. तर वैभवच्या डोक्याला जबर मार लागल्याने रक्त श्राव झाला. त्याचवेळी पत्रकार अशोक इंगळे आणि सरपंच नितीन ठोसरे चिखली येथून एक लग्न सोहळा करुण साखरखेर्डा येथे येत होते. त्यांनी वैभवला रोडवर पडलेले पाहिले. तत्काळ याची माहिती साखरखेर्डा पोलीस स्टेशनला देण्यात आली. ठाणेदार गजानन करेवाड यांनी बीट जमादार रामदास वैराळ यांना घटणास्थळी पाठविले.

यावेळी वरोडी येथील सुमेध गवई , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप बेंडमाळी घटणास्थळी मदतीसाठी धाऊन आले. परंतू अपघात येवढा भिषण होता की , वैभव टाले यांचा जागीच मृत्यू झाला. वैभव टाले हा देऊळगाव राजा पंचायत समिती मधील जांभोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत होता. त्यांच्या मागे आई , दोन भाऊ , पती , एक मुलगी असा परिवार आहे .

# शिवाजी हायस्कूलचा ९८.५७ टक्के निकाल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.१४



शेतात मजूर महिलांसह कापूस वेचत असतांना महिलेच्या अंगावर विज पडून मृत्यू झाला. ही घटना (दि.१२) मे रोजी वीरपांग्रा येथे दुपारी घडली.

बिबी पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या वीरपांग्रा परिसरात अचानक विजांच्या गडगडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. अचानक बदललेल्या हवामानाने शेतकऱ्यांची धावपळ उडवली. वीरपांग्रा येथे शेतकरी महिला रंजना संदीप चव्हाण वय ३५ या कापूस वेचणीसाठी मजूर महिलांसह शेतात काम करीत होते. पावसाने जोर धरल्याने त्याांनी बचावासाठी लिंबाच्या झाडाचा आसरा घेतला. परंतु दुर्दैवाने झाडावर वीज कोसळली आणि रंजना चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला. या दुःखद घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या पावसामुळे सामान्य नागरिकांना उन्हाच्या तापापासून दिलासा मिळाला असला तरी, लग्नसराईतील नियोजन कोलमडले आणि शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. कांदा, भुईमूग आणि उन्हाळी ज्वारी पिकांचे नुकसान झाले आहे. काढणीला आलेले भुईमूग पावसात भिजल्याने शेतकरी चिंतेत आहेत. हवामानातील हा अचानक बदल शेतीसाठी घातक ठरत असून, शेतकऱ्यांमध्ये चिंता पसरली आहे. प्रशासनाने त्वरीत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिक व शेतकरी करत आहेत.

# कोलते महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.१४

पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती अत्यंत अभिमानपूर्वक व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या मुख्य कार्यालयासमोर दि. १४ मे २०२५ रोजी आयोजित या कार्यक्रमास महाविद्यालयाचे खजिनदार मा. सुधीरभाऊ पाचपांडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रापती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण



करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रा. निलेश बुंधे यांनी संभाजी महाराज यांच्या धैर्यशील, तत्वनिष्ठ आणि बलिदानमय जीवनावर प्रकाश टाकणारे माहितीपर भाषण केले. त्याांनी संभाजी महाराजांचा लढवय्या स्वभाव, धार्मिक सहिष्णुता आणि स्वराज्य रक्षणासाठी केलेले त्यागमय कार्य यावर सविस्तर माहिती उपस्थितांपुढे मांडली. या कार्यक्रमाला सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रा. योगेश सुशीर, प्रा. सुदेश फरफट, प्रा. सदाशिव लवंगे, प्रा. निलेश बुडुखले, प्रा. अमोल हळदे, प्रा. प्रविण पाटील, प्रा. अंकुश नरखेडे, प्रा. पांडुरंग चोपडे, प्रा. सचिन भोळे, प्रा. सचिन चौधरी तसेच प्रा. तेजल खर्चे, प्रा. संगीता खर्चे, प्रा. माधुरी राजपूत, प्रा. माधुरी चौधरी, प्रा. पूनम पट्ठे, प्रा. वैशणवी चोपडे, प्रा. शिवानी राजपूत, प्रा. ऋतुजा पाटील, प्रा. शारदा लांडे यांच्यासह लॅब असिस्टंट मंगेश पाटील, तेजस हिंगे, प्रिया घुटे, तसेच नॉन-टीचिंग स्टाफमधून बाळू वराडे, सचिन शेलार यांचीही उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रमाने संभाजी महाराजांच्या शौर्याची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात साकारली आणि एकात्मतेचा संदेश दिला.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त मोटरसायकल रॅली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.१४

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा पाटील युवक समिती वतीने मागील १७ वर्षो पासुन खामगाव येथे भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा समितीचे संस्थापक अध्यक्ष गजानन दादा ढगे पाटील यांच्या नेतृत्वात यंदाही १४ मे २०२५ रोजी खामगाव शहरांमध्ये भव्य मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व प्रथम शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या सामोर रोहिणखेड येथील शिव शंभू आखाडा तीन मुले व मुलींनी मैदानी खेळ लाठीकाठी तसेच तलवारबाजी चे सादरीकरण केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन व हार अर्पण करून रॅलीची सुरु झाली. सदर रॅली शहरातील सरकी लाईन, मेन रोड, फरशी, मढी जवळील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याला हार अर्पण करून, घाटपुरी नाका परिसरातून कोर्ट जवळून टॉवर चौक , बस स्टँड जवळून या प्रमुख मार्गांनी छत्रपती शिवाजी महाराज मराठा पाटील सभागृह या ठिकाणी भव्य अशा रॅलीची सांगता करण्यात आली. मराठा पाटील युवक समितीच्या वतीने शंभू प्रेमींना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. सदर रॅली ला जिल्यातील विविध सामाजिक संघटनांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. तसेच रॅली मध्ये युवती व महिला यांनी सुध्दा उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला हे विशेष. याचप्रमाणे रॅलीमध्ये महामार्गातील असलेल्या महामानवां च्या पुतळ्यांना अभिवादन करून समितीच्या वतीने हार अर्पण करण्यात आले




यावेळी शहरातील सकल मराठा समाजचे समन्वयक किशोर भाऊ भोसले, अखिल भारतीय मराठा सेवा संघ चे माजी जिल्हाध्यक्ष संजू भाऊ शिंगारे, प्रवीण भाऊ कदम , पवन गरड , सामाजिक कार्यकर्ते धनंजय भाऊ देशमुख, राजू बघे, राहुल कळमकर, धीरज कंठाळे, माळी सेवा मंडळ चे अजय तायडे, पंकज गिरी, कृषी उत्पन्न बाजार समिती खामगाव ते सभापती सुभाष भाऊ पेसोडे, प्रसाद तोडकर, कैलास आंबुसकर, अनुप गवळी, कैलास फाटे, जिवण जाधव, राजूभाऊ मुळीक, संतोष आंबुसकर, देवा गावंडे, जीवन जाधव, सागर बेडवाल, विजय पदमगिरीवार सुरज भैय्या यादव, रवींद्र चेके, नरेश भाऊ भारसाकडे जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सीमाताई ठाकरे पाटील, राजश्री ताई पाटील, स्वातीताई गजानन ढगे, अश्विनी योगेश पाटील , यासोबत जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी तसेच महिला भगिनी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील कुयटे पाटील, माजी जिल्हाध्यक्ष प्रवीण ( छोटू )पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष मोहन घुईकर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश लांजुळकर, श्याम अढाव, केशव बानाईत, योगेश म्हैसागर, जिल्हा संघटक अविनाश कुटे, देवा कुइटे, पंकज पाटील,भूषबा पाटील,खामगाव तालुकाध्यक्ष राम पारस्कर शहराध्यक्ष नितीन खोंड, अनंता धामोडे, अभिजित ढगे पाटील शंकर कोळस्कर, कपिल पाटील, श्रीधर ढगे, रवींद्र बानाईत, अजय खोद्रे, सुपेश सपकाळ , वैभव मिसाळ, निखिल देशमुख, विनोद मिरगे राहुल घाटे शहराध्यक्ष नांदुरा कपिल, अनिकेत भगत, ललित तांगडे यांच्यासह संपूर्ण जिल्ह्यातील जवळपास हजारोंच्या वर युवक तसेच युवती यांनी सहभाग घेऊन रॅलीची शोभा वाढविली. यावेळी ऋषी भाऊ जाधव, गणेश माने, अमोल अंधारे यांनी सदर रॅली चे स्वागत केले.

# बुलडाण्यात प्रथमच फुटबॉल नर्सरी सुरू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१४

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा अंतर्गत जिल्ह्यामध्ये प्रथम फुटबॉल खेळाची नर्सरी सुरू करण्यात येत आहे.नर्सरीमध्ये वयोगट ८ ते १६ वर्षवयातील खेळाडूंना मोफत प्रशिक्षण दिले जाणार असून वयोगटातील सर्व खेळाडूंनी फुटबॉल नर्सरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे. जागतिक स्तरावर फुटबॉल खेळाचे सम्राज्य बघता आपल्या देशात, राज्यात व जिल्ह्यामध्ये फुटबॉल खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, तसेच जिल्ह्यातील वयोगट ८ ते १६ वयातील फुटबॉल खेळाडुंनमध्ये फुटबॉल या खेळाची आवड निर्माण व्हावी व तंत्राशुध्द प्रशिक्षण त्याांना प्राप्त व्हावे, हे उद्दीष्ट डोळया समोर ठेऊन फुटबॉल नर्सरीच्या माध्यमातून एक नवीन उपक्रम राबविण्यात आले आहे. आतंरराष्ट्रीय ऑलंपिक दिनाचे औचित्या साधून जिजामाता स्टेडीयम, विश्रामगृह समोर, बुलढाणा येथे दि.२३ जून २०२५ पासून सायंकाळी ५ ते ७ या वेळेत फुटबॉल खेळाचे विनामुल्य तंत्राशुध्द प्रशिक्षण सुरु करण्यात येत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शाळा, विद्यालय, संघटना, फुटबॉल क्लब व पालकांनी आपल्या खेळाडूंना फुटबॉल नर्सरीचा लाभ घेण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात आपले नाव नोंदणी करून आपला प्रवेश दि.१५ जुन २०२५ पर्यंत निश्चित करावा. अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जीवन मोहोड (मो. नं. ९४०५७३४४०३) व क्रीडा अधिकारी संदीप केळे (मो.नं. ९४२३४४६५१६) यांच्याशी कार्यालयीन दिवशी संपर्क साधावा.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
गुरुवार, दि. १५ मे २०२५

# जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई

## दाहकता वाढली; १२ टँकर सुरु, ४४ विहीरींचे अधिग्रहण

अजिंक्य भारत
संजय देशमुख । सुनील तळोकार

**अमरावती, दि. १४ :** एप्रिलमध्ये तापमान ४४ अंशावर गेल्याने जलस्त्रोतांना कोरड पडली व पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. उंचावरील दुर्गम भाग असलेल्या मेळघाटात दाहकता वाढली आहे. सद्यस्थितीत तहानलेल्या १२ गावांत टँकरने पाणीपुरवठा होत आहे. शिवाय ५७ गावांमध्ये २३ विंधन विहिरी व ४४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आलेले आहे.

गतवर्षी ११ तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाने पाण्याचे पुनर्भरण झाल्याने भूजलस्तरात वाढ झाली होती. त्यामुळे मार्चअखेरपर्यंत पाणीटंचाई उद्भवली नाही. मात्र यादरम्यान जिल्ह्याचा पारा ४१ अंशावर व एप्रिल महिन्यात ४३ अंशाचे पार गेला. त्यामुळे भूजल पातळीत कमी आली व पाण्याचे उद्भव कोरडे पडायला लागले व पाणीटंचाईची चटके जिल्ह्यात जाणवायला लागले आहे

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनूसार चिखलदरा तालुक्यातील कोरडा, चुनखडी, आकी, खडीमल, मोथा, लवादा व तारुबांदा धारणी तालुक्यात कढाव, दाबका, रणीगाव, कंजोली, धारणमहू, दिदब्बा व बारु, अमरावती तालुक्यात कस्तूरा, मोगरा, अमडापूर व भानखेडा, मोर्शी तालुक्यात ब्राम्हणवाडा, पिंपळखुटा लहान, गोराळा, शिरजगाव व कोळविहिर , भातकुली तालुक्यात दाढीपेढी, चांदूर रेल्वे तालुक्यात सावंगी मग्रापूर, टेंभूर्णी, निमला व पाथरगाव, तिवसा तालुक्यात अमदाबाद, फत्तेपूर, जावरा, वठोडाखूर्द, मार्डी व धोत्रा तालुक्यात अधिग्रहणातील विंधन विहिर व खासगी विहिरीद्वारे पाणीपुरवठा होत आहे.जिल्ह्यातील १५८८ गावांपैकी १३०० गावे ८८.९७ टक्के गावातील मान्सून पश्चात पाणी गुणवत्ता परीक्षण आटोपले आहे. तर जिल्ह्यातील १६१९ शाळा व २४०२ अंगणवाड्यांची रासायनिक व जैविक पाणी स्त्रोत अद्याप अपूर्ण आहे. जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत जिल्हातील सर्व गावात मान्सून पश्चात पाणी गुणवत्ता परीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये आतापर्यंत ४८५२ रासायनिक व ३७४९ जलस्त्रोतांचे जैविक प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित पाण्याची गुणवत्ता तपासण्याची गुणवत्ता निर्देश देण्यात आले आहे. परंतु अजूनही काही शाळा व अंगणवाड्ययांच्या पाण्याची तपासणी अपूर्ण आहे. ही तात्काळ पूर्ण करून अहवाल सादर करण्याची ताकिद अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. जलजीवन जीवन अंतर्गत पाणी गुणत्ता स्वच्छ जलसुरक्षा अभियानाची बैठक झाली. या बैठकीत स्वच्छ जल अभियान विभागाचे अधिकारी यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना पाणी समस्याबाबत निर्देश दिले. वरिष्ठ भूवैधानिक, भूजल संर्वेक्षण यंत्रणा यांनी सुद्धा पाणी समस्येवर गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश संबंधित कर्मचाऱ्यांना दिले आहे.

### या गावांमध्ये पाणीटंचाईचे चटके

नांदगाव तालुक्यात वाढोणा रामनाथ, खानापूर, हिवरा बु., मंगरुळ चव्हाळा, पळसमंडळ, खेडपिंप्री, वेळी गणेशपूर, लेहगाव, कंझरा, वाटपु, शिवरा, टाकळी गिलबा, धर्मापूर, राजना व काजना तसेच अचलपूर तालुक्यात बोर्डा, परसापूर, काकडा व सर्फापूर तसेच वरुड तालुक्यात पोरगव्हाण व करजगाव येथे अधिग्रहणातील विंधन विहिर व खासगी विहिरींद्वारे पाणीपुरवठा होत आहे.

### जिल्हास्थिती

खासगी टँकर सुरु : १२
विंधन विहिरींचे अधिग्रहण : २३
खासगी विहिरींचे अधिग्रहण: ४४



### पाणी पिण्यासाठी नव्हे सिंचनासाठी

मेळघाटातील बासपानी गावातील पाणी पुरवठा योजनेचे पाणी नागरिकांना अप्राप्त असले तरी विहिरीजवळच्या शेतांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत आहे. मेळघाटातील हा प्रकार आगळावेगळा आहे. पाण्याच्या टंचाईसाठी ग्रामसेवक आणि पदाधिकारी जबाबदार आहेत. पाण्याच्या दुउयोगासाठी झाल्याची चर्चा मेळघाटात झाले आहे. सिंचनासाठी पाण्याचा उपयोग कसा होत आहे. या बाबत ग्रामस्थांनी लाईव्ह फोटो केले आहे. मेळघाटात जे होईल ते नवलच हे प्रकार उघडकीस येत आहे. जलजीवन प्रकरणी वरील प्रकार उघडकीस आले आहे. धारणी शहरामध्ये दोन किलोमीटर अंतरावरून नागरिकांना पाणी आणावे लागते. टँकर असले तरी पाण्यासाठी नागरिकामध्ये मोठे वाद होत आहे. मेळघाटात या आधी असे कधीही भीषण टंचाई निर्माण झाली नाही. प्रशासनाने याबाबत दखल घ्यावी व आदिवासी बांधवांना पिण्याचे पाणी द्यावे अशी मागणी होत आहे.

अमरावती जिल्ह्याचा विस्तार नागपूर नंतर सर्वात मोठा जिल्हा म्हणून आहे. जलसिंचन, जलशिवार योजना, शेततळे या योजना शासनाने राबविल्या असल्या तरी याची पूर्तता मात्र झाली असल्याचे दिसून येत नाही. जलयुक्त शिवार योजना व शेततळे हे ग्रामीण भागात कुठे गेले ते अंमलात आहे काय हा चर्चेचा विषय ठरला आहे. जलयुक्त शिवार शेततळे योजना शासनने राबवून फक्कत आपपल्या कार्यकर्त्यांचे भले केले आहे. मात्र शेतकऱ्यांना या योजनेचा अल्पशा प्रमाणात लाभ मिळाला आहे. या योजना शासनने राबवू नये राबविल्यात थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात या योजनेचा निधी द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

### ५६ प्रकल्पाचा जलसाठा घटला!

गतवर्षी विभागात झालेल्या सतत धार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे एक मोठा प्रकल्प, सात मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठा त वाढ झाली आहे. तसेच यातील बरेच प्रकल्प फ्लो झाले. मात्र आता उन्हाळ्याची तीव्रता जाणू लागली आहे. या सर्व प्रकल्पामध्ये शनिवारी ४६ टक्के जलसाठा आहे. जलसाठ्यात चार टक्क्यांनी घट झाली आहे त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई शक्यता निर्माण झाली आहे. अमरावती जिल्ह्यात मागील वर्षी समाधानकारक पाऊस झाला. याशिवाय सतत दार पावसामुळे जिल्ह्यातील प्रकल्पाच्या जलसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे त्या काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळाले. तसेच अगस्ट सप्टेंबर या कालावधीतही पावसाने दमदार हजेरी लावली होती. सप्टेंबर अखेरपर्यंत पावसाचा जोर कायम होता. याच काळात अवकाळी पावसाचा जोरही बघायला मिळाला. त्यामुळे जल पातळीत आणखी वाढ झाली. नदी नाल्यासह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पाच्या जलपातळी वाढ झाली. मात्र उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे पाणी, सिंचन औद्योगिक वसाहतीसाठी पाण्याची मागणी वाढते. तसेच पाण्याचे बाष्पीभवन नाही होते. सध्या किती ५६% जलसाठा आहे तर सात मध्यम प्रकल्पात ४२ टक्के जलसाठा आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेला पर्वता धरणाचा पाणीसाठा हा ५६. ४६% आहे. तर सात मध्यम प्रकल्पात ५२.२२% जलसाठा शिल्लक आहे. तसेच ४८ प्रकल्पात ४७.६५ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. यातील अनेक लघु प्रकल्प आटले असून मध्यम प्रकल्पातील पाण्याची पातळी कमी झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### पाणी टंचाईचा कोट्यवधीचा निधी गेला कुठे?

केंद्र व राज्य शासनाकडून दरवर्षी प्रत्येक जिल्ह्याला कोट्ययवधीचा निधी आगस्ट-सप्टेंबरमध्ये नियोजनासाठी दिला जातो. याबाबत जिल्हा प्रशासन, मनपा, जिल्हा परिषद यांच्याकडून नियोजन केले जाते. परंतु शासनाचा निधी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असताना देखील पाणी टंचाईचे नियोजन कागदाव करते त्याचे अंबलबजावणी पहाला मिळाली नाही. शासनाने आतापर्यंत कोट्यवधीचा निधी पाणी टंचाईसाठी खर्च केला. परंतु मेळघाटची पाणी टंचाई समस्या काट्ययवधी निकाली निघाली नाही. शासनाचा हा निधी जातो तरी कुठे असा प्रश्न सर्वसाधारण जनतेला पडला आहे. अधिकारी व ठेकेदार हे संगनमत करून जुन्याच कामावर खर्च केल्याचे दाखवून कोट्यवधीचा निधी हडप करण्याचा प्रकार उघड झाले आहे. अनेक अधिकाऱ्यांवर कारवाया झाल्या. परंतु अधिकाऱ्यांनी अर्थसहाय्यावर पुन्हा नियुक्त्या करून तोच प्रकार चालविला आहे. असे प्रत्यक्ष दिसत आहे.

# कित्येक वर्षापासून जिल्हा परिषदेवर प्रशासक राज

## काँग्रेसच्या गडात भाजप एन्ट्री करणार काय?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १४ :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने रा्.ओय हालचालींना वेग आला आहे. सन २०२२ पूर्वीच्या आरक्षण पद्धतीचा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांचा अवलंब करण्याचे निर्देश असल्याने आता जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी निवडणूक होण्याचे निश्चत झाले आहे.

जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून ते २० मार्च २०२२ पर्यंत २००० ते ०२, २००७, २०१२ ते २०१४ आणि २०१४ ते २०१७ या कालावधीत चार अध्यक्षांचा अपवाद वगळता अवह्यात पणे काँग्रेसचा बोलबाला या संस्थेवर राहला आहे. भाजपा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद मिळविता आले नाही.

कारण भाजपाकडे या संपूर्ण वर्षाच्या कालखंडात बहुमत मिळाले नाही. त्यामुळे भाजपा ही सत्तेपासून वंचित राहिली आहे. भारतीय जनता पार्टीने मिळविलेल्या बंफर यशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होत आहे. महायुती जिल्हा परिषदेतील काँग्रेसचा करिश्मा कायम राहिल याकडे ग्रामीण भागातील जनतेचे लक्ष लागले आहे. सन २००२ या निवडणुकीनंतर राकाँ, भाजप, शिवसेना, प्रहार आणि बसपा मिळून काँग्रेसला सत्तेपासून बेदखल कले यावेळी राष्ट्रवादीच्या सुरखा ठाकरे अध्यक्ष होत्या. २००७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे रमेश वडस्कर अध्यक्ष तर शिवसेनेचे बाळा भागवत उपाध्यक्ष, तसेच भाजपाचे रामदास निस्ताने, तात्या मेश्राम, विजय काळे व शोभा झाकर्डे सभापती होते. त्यानंतर पुन्हा अडीच वर्ष राष्ट्रवादी काँग्रओसचे सत्ता स्थापन झाली. २०१२ नंतर पुन्हा २००२ चा प्रयोग जिल्हा परिषदेमध्ये राबविण्यात आला. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरखा ठाकरे आणि भाजपाचे जयप्रकाश पटेल उपाध्यक्षपदी विराजमान झाले.

परंतु आता परिस्थिती वेगळी आहे. भारत-पाकिस्तान युध्द झाले असले तरी मोदींनी युध्दात घेतलेली माघार ही जनतेच्या जीव्हारी लागली आहे. या कारणाचाही प्रभाव स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर पडू शकतो असे संकेत उमटू लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ग्रामीण भागासाठी महत्वाच्या आहे. गेल्या तीन वर्षांपासून जिल्हा परिषद महानगर पालिका, नगर पंचायत यामध्ये प्रशासन राहले आहे. प्रशासक राहत अशल्याने ग्रमीजनतेची कामे होत नाही.

अधिकारी या लोकांना मानत नाही. सत्ताधारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची चिठठी कींवा फोन आल्याशिवाय काम होत नाही असे जनतेने बोलून दाखविले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विवडणुका प्रशासनाने घ्यावा असा कयास ग्रामीण भागातून उमटत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संदर्भात चार आठवड्याचा अवधी दिला आहे. परंतु न्यायालयाच्या आदेशावर राज्य शासनाने अद्याप पर्यंत कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका न्यायालयाच्या आदेशाने होते की नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पावसाळा तोंडावर येत असताना राज्य शासन निवडणुका घेणार नाही असे ग्रामीण भागात बोलल्या जात आहे. परंतु निवडणुका घेणे हे अत्यावश्यक आहे. प्रशासन राज असल्याने सर्वसामान्यांना त्रासापासून मुक्ती देण्यात यावी अशी मागणी जनतेने केली आहे.

## वैष्णवी माहुलकरचे परीक्षेत सुयश



**रामतिर्थ :** वैष्णवी गोपाल माहुलकर हिला ९४.८० गुण मिळाले रामतीर्थ येथून जवळ असलेल्या रुस्तमपुर येथील विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी गोपाल माहुलकर ही विद्यार्थिनी भारतीय ज्ञानपीठ कॉल मेंट मै सांग येथे शिकत होती तिला वर्ग १० मध्ये ९४.८० गुण मिळवून ती उत्तीर्ण झाली या यशाचे श्रेय वर्गशिक्षक व आई वडील यांना देत आहे.

# आरोग्य हितासाठी आहारात तृण धान्याचा वापर काळाची गरज

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**येवदा, दि. १४ :** आजच्या धकाधकीच्या जीवनात आहाराकडे होणारे दुर्लक्ष संतुलित व पौष्टिक आहाराचा अभाव यामुळे मानवी जीवनावर होणारे त्याचे विपरीत परिणाम सर्वांना भोगावे लागतात. जगात आफ्रिकन व भारतीय उपखंडात इतिहास पूर्व काळापासून मिलेट्स अर्थात तृणधान्याचा अधिकाधिक वापर केल्या जात होता. तृणधान्य हे पोषणाचा उत्तम स्त्रोत असून यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त आहे आणि ते जीवनसत्वे, खनिजे व प्रथिने समृद्ध आहेत आणि म्हणूनच आरोग्य हितासाठी आपल्या आहारामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात मिलेट्स अर्थात तृणधान्यांचा वापर करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे महासचिव रवींद्र ढोकणे यांनी केले आहे.

त्यांनी फार्मा प्रोड्सर कंपनीच्या माध्यमातून दर्यापूर शहर व परिसरातील जनतेसाठी मिलेट्स सहजगत्या ढोकणे सभागृहात उपलब्ध करून देण्याचा अल्पसा प्रयत्न चालविलेला आहे.

यापसंगी महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त व राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक प्रदीप लांडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते से. नि. मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाथरे गुरुजी, फार्मा प्रोड्सर कंपनीच्या संचालिका सौ.वंदना ढोकणे, कवयित्री सौ अरुणा लांडे,सामाजिक कार्यकर्ते दीपक आवारे,अनुप सांगोले प्रामुख्याने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रशांत ढोकणे यांनी केले.

# संस्कृती व सृष्टी बहिणींना ९२ टक्के गुण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. १४ :** शिव कॉलनी रहाटगाव येथील सृष्टी रितेश रायकर व संस्कृती रितेश रायकर या दोघी बहिनींना नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात ९२ टक्के असे समान गुण मिळाले आहे. सृष्टी व संस्कृती या दोघी जणी होलिक्रॉस मराठी हायस्कूलमध्ये शिकत आहेत. दोघींनीही यंदा दहावीची परीक्षा दिली. यामध्ये कु. संस्कृतीला ९२.६० टक्के गुण मिळाले असून तीला ५०० पैकी ४६३ ऐवढे गुण मिळाले आहेत. मराठीमध्ये ९५, हिंदी ९३, इंग्रजी ९०, गणित ९१, विज्ञान व तंत्रज्ञान ८९ व सोशल सायन्समध्ये ८९ गुण मिळाले आहेत. या सर्व गुणांची टोटल ४५८ होत असून तिला यामध्ये पाच अतिरिक्त गुण मिळाले आहेत. कु. सृष्टी रायकल हिला ९१.६० टक्के गुण मिळाले आहेत. यामध्ये मराठीमध्ये ९३, हिंदी ९०, इंग्रजी ८९, गणित ९३, विज्ञान व तंत्रज्ञान ९३, सोशल सायन्समध्ये ८७ असे गुण मिळाले असून सर्व गुणांची टोटल ४५८ ऐवढी होत असून गुणाची टक्केवारी ९१.६० टक्के आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या सृष्टी व संस्कृती यांनी कठिण परिस्थितीत अभ्यास करून हे घवघवीत यश मिळविले आहे. दोघींनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिल व शिक्षकांना दिले आहे.

# थोडक्यात

## विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती



**अमरावती :** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल भांडार विभागातील अधीक्षक धनंजय पाटील यांनी माहिती दिली.

## पानटपरी चालविणाऱ्याची मुलगी जिल्ह्यातून अव्वल

**अमरावती :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने जाहीर केलेल्या दहावीच्या निकालामध्ये पानटपरी चालविणाऱ्याची मुलगी जिल्ह्यातून प्रथम आली आहे. मानसी अजय असे या मुलीचे नाव असून, तिला दहावीमध्ये ५०० पैकी ४९४ म्हणजेच ९८.८० टक्के गुण मिळाले आहेत. मानसीला कॉम्प्युटर इंजिनिअर व्हायचे असल्याचे सांगितले. मानसी धुनागे ही दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिचे वडील अजय घुगाने हे दर्यापूर बसस्थानकासमोर पानटपरी चालवितात, तर आई सुषमा घुनागे गृहिणी आहे. त्याचबरोबरच तिच्या कुटुंबामध्ये आजी हिरामती घुनागे व धाकटा भाऊ दक्ष घुनागे असा छोटा परिवार आहे. कुटुंबाचा गाडा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी तिच्या वडिलांवर आहे. मानसी ही लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असून, रोज पाच ते सहा तास अभ्यास करायची. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा संत यांनी दिलेल्या माहितीनुसार मानसी ही अभ्यासात अतिशय हुशार असल्याने शाळेत तिच्यावर, कधीही रागावण्याची वेळ आली नाही. ती शांत स्वभावाची अभ्यासू मुलगी आहे. कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये करिअर करायचे स्वप्न असल्याचे तिने सांगितले. ती दहावीतील आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षकांना देते. मानसीच्या यशाने दर्यापूर तालुक्यासह जिल्ह्याचे नाव मोठे झाल्याने तिचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## भूमिहीन हमालाचा मुलगा होणार सनदी अधिकारी

**अमरावती :** वडील हमाल तर आई शेतात मजुरीचे काम करणाऱ्या दाम्पत्याच्या मुलाने दहावी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. प्रणव दिलीप तायवाडे या विद्यार्थ्याने दहावीच्या परीक्षेत ९७.८० टक्के गुण घेत जिल्ह्यातून तिसरा येण्याचा मान मिळविला आहे. प्रणवला डॉक्टर होऊन त्यानंतर यूपीएससीतून आयएएस अधिकारी व्हायचे असल्याचे त्याने लोकमतशी बोलतांना सांगितले. वरूड तालुक्यातील लोणी येथील रहिवासी असलेला प्रणव तायवाडे याला दहावीच्या परीक्षेत ५०० पैकी ४८९ गुण मिळाले आहेत प्रणवचे वडील दिलीप तायवाडे है हमालीचे काम करतात, तर आई वर्षा तायवाडे या शेतमजूर म्हणून काम करतात. परंतु घराच्या या आर्थिक परिस्थितीवर मात करत प्रणवने दहावीच्या परीक्षेत हे यशा मिळविले आहे. प्रणव नीटची परीक्षा देऊन एमबीबीएस करून पुढे यूपीएससी परीक्षेतून सनदी अधिकारी होण्याचा ठाम निश्चय त्याने लोकमतशी बोलताना व्यक्त केला. आर्थिक परिस्थितीवर मात करून तीनचार तास अभ्यास गृहपाठ करून रामप्यारीबाई चांडक विद्यालयाच्या इतिहासात मानाचा तुरा रोवला.

## शुभमने रचला इतिहास, होणार रिसर्च इंजिनिअर

**अमरावती :** मेळघाटात शिक्षणाचे तीन तेरावाले असताना धारणी तालुक्यातील कुसुमकोट खुर्द येथील मॉटफोर्ड शाळेचा विद्यार्थी शुभम रामदास मराठे याने ग्रेस गुणव्यतिरिक्त ४८९ गुण मिळवित इतिहास रचला. त्याला ९७.८० टक्के गुण असल्याने जिल्ह्यात तिसरा आहे. शुभमला रिसर्च इंजिनिअर व्हायचे आहे. त्या दृष्टीने नागपूर येथील एका खासगी क्लासेसमध्ये सध्या शुभम तयारी करीत आहे. सुरुवातीपासून घड्याळाकडे बघून नव्हे तर नियमित अभ्यास केला. शाळेत शिकविलेला अभ्यास त्याच दिवशी पूर्ण केला. अभ्यासात सातत्य ठेवल्यानंतर डिसेंबरपासून टेस्ट पेपर सुरू झाल्यावर मात्र अभ्यास वाढविल्याचे शुभम म्हणाला. शाळेतील शिक्षकांनी नियमित अभ्यास करून घेतला, टेस्ट पेपर सोडविले, त्यात झालेल्या चुका शिक्षकांनी दाखविल्या. त्या टाळून अधिक गुण कसे घेता येईल, याकडे लक्ष दिल्याने यश मिळाल्याचे तो म्हणाला. वडील रामदास मराठे हे पॅथॉलॉजिस्ट आहेत, तर आई मीरा गृहिणी आहे. त्याला आई-वडिलांसह शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

## कृषी उत्पन्न बाजार समितीत छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**दर्यापूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत आज मोठ्या उत्साहात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन बाजार समितीच्या वतीने करण्यात आले छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्पांजली अर्पित करून करण्यात आली. यावेळी समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, बाजार समितीचे संचालक प्रभाकर पाटील तराळ, बाजार समितीचे संचालक असिफ भाई खान, बाजार समितीचे सचिव हिम्मतराव मातकर , साहेबराव जामणिक , घाटे पाटील व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचे, धर्मनिष्ठेचे आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. तसेच युवकांनी त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहनही यावेळी सभापती सुनिल पाटील गावंडे यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अखेर सामूहिकरित्या जय भवानी जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता,

# थोडक्यात

## श्री. साईबाबा विद्यालय साईनगरचे सुयश



**अमरावती :** श्री आयुर्वेद एवं शिक्षण विकास मंडल अमरावती द्वारा संचालित श्री साईबाबा विद्यालय साईनगर अमरावती येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ द्वारा घोषित एस.एस. सी. परिक्षा २०२५ च्या नुकत्याच घोषित झालेल्या वर्ग १० वी च्या निकालात अमरावती शहरातून नामांकित शाळामधुन बाजी मारली व उत्तुंग भरारी घेत विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागलेला असुन आपल्या यशस्वीतेची परंपरा कायम ठेवत नेत्र दिपक यश पटकावीले आहे. शाळेतुन एकुण प्रविष्ठ झालेल्या ११० विद्यार्थ्यांपैकी ३५ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी तथा ४७ विद्यार्थी प्रथम श्रेणीतुन उत्रतीण होवून घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयातुन दोन विद्यार्थ्यांनी प्रथम स्थान कु. रेणुका वाकडे ९३,२००९% व कैवल्य तितरे ९३.२०% द्वितीय स्थान तन्मय टाके ९३.% व दोन विद्यार्थ्यांनी तृतीय स्थान कु. गौरी मानके ९२.६०% व कु. आराधना नवले ९२.६०% आहेत. शाळेचे मुख्याध्यपक श्री राजेश श्यामसुंदरजी टावरी व सर्व शिक्षकवृंदानी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले आहे. वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांची विशेष सराव परीक्षा, शनिवारीय चाचणी, टेस्ट सिरीज घेवून विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त झाले आहे असे मत मुख्याध्यापक यांनी व्यक्त केले आहे. शाळा समितीचे अध्यक्ष श्री जुगलकिशोरजी गट्टानी, सचिव राजेश हेडा तसेच समस्त कार्यकारिणी व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थ्याचे भरभरुन कौतुक केले. विद्यालयाच्या उत्तुंग भरारीसाठी शाळा समितीची समस्त कार्यकारिणी आणि पदाधिकाऱ्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाला मिळालेल्या या यशाबद्दल संपूर्ण परीसरात कौतुक होत आहे. विद्यालयातर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व नेहमी मदत करणारे पालक वर्ग तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे विद्यालयाला मिळालेल्या या घवघवीत यशाबद्दल हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा

## बालशिवाजी इंग्लिश स्कूलची गरुडझेप



**अंजनगावसुर्जी :** गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन अंतर्गत श्रीधर पाचघरे गुरुजी ज्ञान प्रबोधिनी पथ्रोट द्वारा संचालित बालशिवाजी इंग्लिश स्कूल, अंजनगाव सुर्जी चा एस.एस.सी. बोर्डाचा परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून स्कूलने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शंभर टक्के यशाची परंपरा कायम राखली आहे. स्कूल मधून कु. मृणाल गो. कोल्हे (९४.८०%)ही विद्यार्थीनी प्रथम आली, तर चि. अभिषेक रा. पोटे.(९४% )द्वितीय, कु. प्राची श.मंगळे तृतीय(९२.८०%) , चि.प्रथमेश ज्ञा. मंगळे(९१.४०% )हा चौथा आला तर कु.वंशिका अ. वानखडे(९०.४०%)ही पाचवी आली. तसेच चि सार्थक नि. रोकडे(९०.२०%), कु.सुमती सं. ताजणे(९०%), चि.अथर्व अ.भावे(८९.२०%), चि. अथर्व सं. वाघमारे(८८.४०%), कु. निशिदा घ. टोलमारे(८८%), चि. पार्थ प्र.मुळे(८७.४०%), चि. सार्थक मो.तायडे(८७.४०), चि.ओम दी. वानखडे(८७%), चि. अथर्व वि. पाचंगे(८६.८०%), चि.पियुष दि. सूर्यवंशी(८६.४०%), चि. श्रवण ग.काळमेघ(८५.६०%), कु.भक्ती दा.गोळे (८५%), विशेष प्राविण्यश्रेणीमध्ये पास झालेत व इतर सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये पास झाले. सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून गरुडझेप घेतली आहे. तसेच इतर सर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्कृष्ट गुण संपादन केले आहे. त्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल डॉ. श्रीकृष्ण गोरडे (चेअरमन गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन) सौ. संगीता गोरडे (सेक्रेटरी गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन) कु. दामिनी गोरडे (डायरेक्टर गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन, लीडरशिप कोच अँड ट्रेनर) ,मुख्याध्यापिका कु. अर्चना सोनोने, सुपरवायझर वर्षा भोंडे, कु. साक्षी कळसकर , नईम सर, श्री.मयूर सर, श्री गौरव सर , सौ.माधुरी मॅम तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

## गांधी विद्यालयाची यशाची परंपरा कायम



**अंजनगाव बारी :** न्यू.एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित गांधी विद्यालय बडनेरा येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र निकालांमध्ये घवघवीत यश संपादन केले. गांधी विद्यालयामध्ये एकूण १६६ विद्यार्थी परीक्षे करिता प्रविष्ठ होते. त्यापैकी १४६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असून प्रथम क्रमांक कु. ईश्वरी सचिन शिरभाते ९३.६०% घेऊन उत्तीर्ण झाली तसेच द्वितीय क्रमांक कु. स्नेहल राजू सावरकर ९२.६०% व चि. श्रीकुंज अविनाश भोपळे ९२.४०% तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. विद्यालयाचा एकूण निकाल ८७.९५% लागलेला आहे. प्रथम श्रेणी मध्ये ६६ विद्यार्थी तसेच द्वितीय श्रेणिमध्ये ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष राजेश टारपे व ॲड आनंदराव इंगोले तसेच शाळा समिती सभापती रामेश्वर लाड व संपूर्ण कार्यकारणी यांनी हार्दिक अभिनंदन केले. निकालामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या प्राचार्या अनिता सदाफळे , उपप्राचार्या वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिलीप इखार तसेच सर्व वर्गशिक्षिका व शिक्षक वृंदानी सत्कार व अभिनंदन केले.

# नोंदणी कायद्यात सुधारणा, भूमाफियांना चाप

## शासनाचा अध्यादेश जारी, बेकायदेशीर व्यवहाराला लगाम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १४ :** भू माफिया द्वारा शासन मालकीच्या जागेवर ताबा घेऊन अथवा भाडेपट्ट्याने घेतलेल्या मिळकतीची परस्पर विक्री अथवा हस्तांतरित होते. त्यामुळे अनेकांची फसवणूक झाल्याचे प्रकार उघडकीस आले. आता याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या व याबाबत अध्यादेश जारी झाल्याने भूमाफी यांच्या कारवायांना चाप बसणार आहे. यात सुधारणेत नोंदणी कायद्याचे कलम २१ व २२ मध्ये सुद्धा सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार नोंदणीसाठी सादर दत्ता विजातील मिळकतीची ओळख पटेल असे सर्व वर्णन करणे आणि त्या अनुषंगाने सर्व संबंधित कागदपत्रे उतारे जोडणे अनिवार्य आहे. परंतु शासनाने तुकडे बंदी कायदा खाली जमिनीचे हस्तांतरणासाठी जे प्रमाणभूत चक्र निर्धारित करून दिले आहे त्यापेक्षा जास्त क्षेत्राची जर विक्री होत असल्यास मोजणीची लावणी आवश्यक नाही. मात्र जर प्रमाणात क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र हस्तांतरित करण्यात येत असल्यास कागदपत्राची पूर्तता अनिवार्य आहे. याची प्रभावी अंमलबजावणी २८ एप्रिल पासून सुरू झाली आहे. मिळकतीच्या वाढत्या किमतीमुळे



या क्षेत्रात शिरलेल्या काही अप्रवृत्तींना या सुधारण्यामुळे ताप बसेल सर्वसामान्य जनतेची सुरक्षित होईल. असे मत राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी व्यक्त केले. राज्य व केंद्र शासन द्वारा प्रतिबंधित मिळकतीचे व्यवहारांची यापुढे नोंदणी होणार नाही सरकारच्या तक्त्यातील सर्व सार्वजनिक उपक्रमाचे मालकीच्या कुठल्याही मिळकतीचे व्यवहार ते करण्यात सक्षम असलेल्या साधी करण्याची अन्य कुणात करता येणार नाही असेही शासन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

> बीएसएफच्या स्थापना जुनी नोंदणी विभाग कॅशलेस प्रणाली विकसित करणार आहे. जनतेचे हक्क सुरक्षेसाठी हे बदल आवश्यक आहेत. नागरिकांनी हे बदल स्वीकारून आपले हक्काचे स्वयं रक्षण करावे.
>
> **अनिल औतकर,**
> सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक अधिकारी.

# रविराज देशमुख यांचे स्वागत



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. १४ :** भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी असलेले अमरावती जिल्हा निवासी रविराज देशमुख यांची नुकतीच अमरावती जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांचे अभिनंदन सामाजिक कार्यकर्ते गजानन सुखदान व राजमाता जिजाऊ बहुउदयेशिय संस्था पूर्णानगरचे संस्थापक अध्यक्ष संजय सरवटकर यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी यांच्या कडे शेकडो कार्यकर्त्यांची गर्दी होती.

रविराज देशमुख यांच्या नियुक्ती बद्दल ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे व त्यांच्या नियुक्ती बद्दल अंबादेवी मंदिर येथे बुधवार दि. १४ मे रोजी दुपारी ३.३० वाजता महाआरती चे आयोजन केले होते.

# गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीस अटक



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १४ :** घरात गांजा ठेवून त्याची विक्री करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखेच्या पालिलसांनी फ्रेजरपुरा पोलिलस ठाण्याच्या परिसरातून अटक केली. राजू पखरू मांजरे, ४६ रा. फ्रेजरपुरा असे आरोपीचे नाव असून तो गांजाची विक्री करीत होता. पोलिसांनी त्याच्या घरातून ४ किलो ३६० ग्रॅम व अन्य साहित्य असा एकूण १ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. फ्रेजरपुरा पलिस ठाण्याच्या हद्दीत १२ मे रोजी गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगकरीत असताना त्यांना गांजा विक्रीची माहिती मिळाली. फ्रेजरपुरा परिसातील रहिवासी राजू मांजरे आपल्या घरातच गांजा अम ली पदार्थ बाळगून विक्री करीत होता. या माहितीच्या आधारे राजू मांजरेच्या घराची झडती घेतली असता त्याच्या घरात पायरीच्या खाली असलेल्या कप्प्यामध्ये एका प्लॉस्टिकच्या मध्ये गांजा मिळाला. पोलिसांनी तो प्त केला आहे. तसेच चिलमचे दोन बॉक्स व प्लॉस्टिक पिशवींच्या बंडर असा एकूण १ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. सदर आरोपीने ज्याच्याकडून गांजा विकत आणला अशा दोन आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली बाबाराव अवचार, सीमा दाताळकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक योगेश इंगळे, युसूफ सौदागर, विनय म ोहोड, छोटेलाल यादव, अजय मि श्रा, अशोक वाटाणे, सुधीर गुडधे, संजय भारसाकळे, नईम बेग आशीष जवळे, रंजीत गावंडे, रामकृष्ण कानडे, चेतन कराळे यांनी केली.

# शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलचा निकाल ९९ टक्के

## कु.जानवी भटकर ९० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम





अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १४ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारा संचालित स्थानिक शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलने २०२४-२५ सत्रातील माध्यमिक शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. जानवी भटकर या विद्यार्थिनीने ९०. ४० टक्के एवढे गुण घेऊन शाळेतुन पहिला क्रमांक प्राप्त झाला .या परीक्षेसाठी एकूण २२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा शेकडा निकाल ९९.०० टक्के लागला आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या शाळेचे २० विद्यार्थी ८५ टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून गुणवत्ता यादीत आलेले आहेत, तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्यांमध्ये प्रतुंश बनसोड ८८.८०, हर्षवर्धन किशोर पाटील ८७.८०, प्राप्ती करस्कर ८६.२०, अर्जुन दीपक घोरपडे ८५.६०मोईज शब्बीर हुसेन ८५.६०, रिहान श्याम राऊत ८५.००, भार्गवी नदकिशोर बारबूदे ८४.६०, अनुश्री प्रदिप गंधे ८४.६०, शिवानी रवी पाहुजा ८०.००, ऋतुजा अरुण मेश्राम ७८.२०, राधिका संदीप देशमुख ७८.४१, देवांशू

सुनील गोलाईटकर ७६.६०, सर्वे श सुरेश मेश्राम ७५.८०, झाबिया बद्री ६८.८०, नैतिक राजू ठाकरे ६६.००, सार्थक सिद्धार्थ भिसे ६०.००, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे शाळेचे मुख्याध्यापक वैशाली प्र. ठाकरे, पर्यवेक्षिका शारदा शिक्षक प्रतिनिधी वैशाली दांडगे, प्राची देशमुख, क्रीडा शिक्षक अमर खंडारे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन अभिनंदन व कौतुक केले.

# १२० शिबिरार्थ्यांनी केला व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प

## बुद्ध जयंती निमित्त मार्गदर्शन, लोककलावंत प्रमोद पोकळे यांचा पुढाकार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अंजनगाव बारी, दि. १४ :** ''हाती न घेता तलवार, बुद्ध राज्य करी जगावर'' या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उक्तीनुसार प्रेमाने जग जिंकता येते, ही धारणा सत्य, ईश्वर आणि मानवी जीवनाचा उद्देश समजून केलेल्या तपश्चर्येच्या ज्ञानातून सिद्धार्थ गौतम बुद्धांनी जगातील दुःखमूळ शोधून त्यावर पंचशीलाचा प्रभावी मार्ग सांगितला. भ. बुद्धांचे तत्त्वज्ञान आजच्या विज्ञान व तंत्रज्ञान युगातील मानवाने समजून घेतले असते तर ही युद्ध परिस्थिती निर्माण झाली नसती, त्यामुळे भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे यांनी केले.

बुद्ध जयंतीचे औचित्य साधून प्रमोद पोकळे यांनी शिबिरार्थ्यांसमोर भगवान बुद्धांच्या पंचशीलाचे निरूपण केले. त्याच्या प्रभावाने नजिकच्या राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दासटेकडी गुरुकुंज-मोझरी येथे १ मे पासून सुरू झालेल्या श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी जीवनात व्यसनमुक्त राहून सद्वर्तनी जीवन जगण्याचा संकल्प केला. सुखशांती व निरंतर समाधानासाठी भगवान बुद्धांनी अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी पंचशील म्हणजेच आचरण नियमावली सांगितली आहे. ईर्षा, आसक्ती, हिंसा, अहंभाव व द्वेष सोडून मानवाने पंचशील जीवनात आचरले तर आंतरिक सुखशांती, समाधान व दुःख निवृत्ती निश्चित होते, हा बुद्धांचा विचार अर्थात् तत्त्वज्ञान म्हणजे अखिल मानवाला मिळालेले वरदान असून त्याचे खरोखर चिंतन करणे गरजेचे आहे, असेही प्रमोद पोकळे म्हणाले. श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार संस्थेद्वारा सुमारे २० दिवसपर्यंत चालणाऱ्या या शिबिराच्या यशस्वितेसाठी शिबीर-प्रमुख रवींद्र ढवळे, रूपेश मोरे, गणेश दरवरे, योगेश मेंढे, मयुर इंगळे, वेदांत अढाऊ, नयन पऱ्हाड, ओम् नन्नावरे, कुंदन गुडधे, पुष्कर गुडधे, निवृत्ती इंदुरकर, अरुण फंदे, ह.भ.प. दिनकर चोरे, प्रमोद पोकळे, अभिनय काळे, डॉ.नरेंद्र तराळे, छगनराव मोरे, कृष्णा रायबोले तर व्यवस्थापनाची जबाबदारी रवींद्र वानखडे सांभाळत आहेत.

## गणेशदास राठी विद्यालयाने राखली यशाची परंपरा

**अमरावती :** गणेशदास राठी विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयात १० वीचा निकाल ९३.७५ टक्के लागला. ३०४ विद्यार्थ्यांपैकी ३०४ विद्यार्थी उत्तीण४ झाले आहे. यामध्ये १५ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांवर तर ५० विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी मिळविली. गणेशदास राठी छात्रालय समितीचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य नवनीत भट्टड, उपमुख्याध्यापिका मालाणी, पर्यवेक्षक शैलेश सुताने यांच्यासह शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय हे गुरुजन, पालक तथा मार्गदर्शन यांना दिले आहे.

# महाउपासिका मीराताई आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार देण्याचा निर्णय

## एकाचवेळी ११६ शिबिरे राबवून कार्यकर्त्यांनी केला वाढदिवस साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १४ :** भारतीय बौद्ध महासभेचे प्रसिद्धीप्रमुख प्रशिक सम्राट संघसेन यांच्याकडून सविस्तर माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई ज्यांनी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या बौद्धांच्या मातृ संस्थेच्या गेल्या ४५ वर्षे राष्ट्रीय अध्यक्ष पद भूषविलेल्या महाउपासिका मीराताई आंबेडकर यांचा ९० वा वाढदिवस त्यांचे सुपुत्र व दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे ट्रस्टी/राष्ट्रीय अध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव य आंबेडकर यांच्या व मीराताई यांचे नातू अमन आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते सार्वजनिक रित्या केक कापून वाढदिवस साजरा केला. वाढदिवसाचा कार्यक्रम डॉ आंबेडकर भवन, दादर येथे मुंबई प्रदेश शाखेच्या वतीने नुकताच (दि. ५ मे २०२५ रोजी) आयोजित केला होता. यावेळी डॉ भीमराव य आंबेडकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख ॲड एस के भंडारे, माजी महासचिव व प्रसिध्द साहित्यिक ज वि पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय महिला विभाग प्रमुख सुषमाताई पवार, राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड व भिकाजी कांबळे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यू जी बोराडे व स्वातीताई शिंदे, नितिन मोरे,मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष चंदाताई कासले इत्यादींनी शुभेच्छा दिल्या. यावेळी ॲड एस के भंडारे यांनी महाउपासिका मीराताई आंबेडकर यांच्या नावाने उत्कृष्ट काम करणाऱ्या पुरुष, महिला व सैनिक यांना राष्ट्रीय पुरस्कार देण्याचे आणि महाउपासिका मीराताई आंबेडकर अर्थात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचा दस्तावेज या पुस्तकाची दुसरी आवृत्ती व आदरणीय सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथांची तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्याचे जाहिर केले. तसेच आदरणीय मीराताई यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संस्थेच्या कार्यकर्ते, शाखा यांनी देशभरात ११६ विविध शिबिरे आयोजित करून कार्यातून वाढदिवस साजरा केला.

मुंबईतील महिला शाखा व पुरुष शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या १४ उपासिका शिबिराच्या शिबिरार्थींना डॉ भीमराव य आंबेडकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.या कार्यक्रमास भंते धम्मराज आणि त्यांचा संघ,राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख ॲड. डॉ एस एस वानखडे, राष्ट्रीय सचिव बी एम कांबळे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सी बी तेलतुंबडे,केंद्रीय महिला विभाग उपप्रमुख रागिणीताई पवार व सचिव भारतीताई शिराळ, प्रशांत गडकरी , सोनाली कटरनवरे इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम आपल्यानंतर राजगृह वर जाऊन मीराताई यांना प्रत्यक्ष शुभेच्छा व केंद्रीय कार्यालयाच्या केंद्र, महाराष्ट्र मुंबई प्रदेश पदाधिकारी यांच्या वतीने एक लाख रुपये धम्मदन देण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबई प्रदेशचे अध्यक्ष विलास वानखडे होते. सूत्रसंचालन मुंबई प्रदेश सरचिटणीस दयानंद बडेकर आणि आभार प्रदर्शन मुंबई प्रदेश कोषाध्यक्ष राजेंद्र सत्वधीर केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुंबई प्रदेशचे विलास ढोबळे, महादेव गायकवाड, अनिल पहूरकर, अर्जुन जाधव, मिलिंद कदम इत्यादींनी परिश्रम घेतले.

## दहावीतील गुणवंत



वेदांत ठाकरे ९५.६० टक्के | अंतरा कातरकर ९४.४० टक्के | अथर्व मंगरुळकर ९४.४० टक्के
अमृता राठोड ९४.४० टक्के | अनिष घोडखांडे ९२.०० टक्के | वर्षा काळे ९२.०० टक्के
आयुष तायडे ९१.८० टक्के | योगिता ठाकरे ९१.८० टक्के | स्वयम लव्हाळे ९१.०० टक्के
सोज्वळ पंचलवार ९०.८० टक्के | अवंती पवार ९०.०० टक्के | वैष्णवी गोडबोले ९०.४० टक्के
राधिका राजूरकर ९०.४० टक्के | शर्वरी भांदवकर ९०.२० टक्के | गौरी टेकाडे ९०.०० टक्के
श्री टेकाडे ९०.०० टक्के | इश्वरी जाधव ९४.२० टक्के | क्षितीज चोपडे ९४.२० टक्के
साहिल गावंडे ९३.६० टक्के | रुजा जुमळे ९३.६० टक्के | नील गंगाले ९३.२० टक्के
रसिका व्यवहारे ९३.२० टक्के | गौरव साळवे ९३.२० टक्के | भार्गव लाकडे ९२.८० टक्के
अवनी पवार ९२.८० टक्के | अनुज माहुरे ९२.४० टक्के | धनश्री गाढवे ९२.२० टक्के
यशस्वी कावलकर ९२.२० टक्के | तृप्ती जुडे ९२.०० टक्के | पारस हांडे ९१.६० टक्के
तेजस फुलझेले ९१.४० टक्के | गरिमा अंबुलकर ९१.४० टक्के | प्रचिती देऊळकर ९०.६० टक्के

### पावसाळ्यापूर्वी विठ्ठल-देवसरी रस्त्याची दुरवस्था; बांधकाम रखडल्याने प्रवाशांचे हाल

# चार किलोमीटर रस्ता फोडून ठेवला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर

**उमरखेड, दि.१३: सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरखेड अंतर्गत येणाऱ्या विठूळ ते देवसरी या बहुप्रतिक्षित रस्त्याचे तोडकाम महिनाभूरापूर्वी सुरू झाले,पण बांधकाम रखडल्याने प्रवाशांची मोठी अडवणूक होत आहे. तोंडावर आलेल्या पावसाळ्यात हा रस्ता वाहतुकीसाठी खुला राहील की नाही, अशी शंका व्यक्त होत आहे.**



विठूळ ते देवसरी हा मोठ्या प्रमाणात वाहतूक असलेला रस्ता असून, तो विठ्ठळ, चालगणी, साखरा, खरूस, लोहारा, कारखेड, देवसरी, दिग्रडी या गावांना जोडतो व मराठवाड्यातील अनेक वाहनेही याच मार्गाने ये-जा करतात. मागील अनेक वर्षांपासून या रस्त्याची अवस्था अत्यंत जर्जर झाली होती. दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या या रस्त्याच्या कामाला महिनाभरापूर्वी सुरुवात झाली. मात्र, संबंधित कंत्राटदार एजन्सीने तब्बल चार किलोमीटर रस्ता फोडून ठेवला आहे. दुरुस्ती व बांधकामाला अद्याप सुरुवात केलेली नाही. यामुळे पावसाळ्यात वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प होण्याची भीती आहे. याबाबत संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, विठूळ-देवसरी रस्त्याच्या एकोणीस किलोमीटर कामासाठी सुमारे पंच्याहत्तर कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. एवढ्या मोठ्या निधीच्या कामासाठी संबंधित विभागाने सक्षम कंत्राटदार का निवडला नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सध्याच्या रखडलेल्या व निकृष्ट कामाच्या शक्यतेमुळे या निधीचा योग्य वापर होईल की नाही, याबाबतही साशंकता व्यक्त होत आहे.

### ७५ कोटींचे काम थंडबस्त्यात

**विठूळ ते देवसरी या रस्त्याच्या १९ किमी. कामासाठी तब्बल ७५ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. परंतु, या कामासाठी संबंधित विभागाकडून सक्षम कंत्राटदार नेमण्यात न आल्याने काम धिम्या गतीने सुरू आहे. त्यामुळे आता पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होईल, अशी अजिबात शक्यता दिसत नाही.**

# मेडिकल चौकात बुद्ध जयंती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ :** शासकीय रुग्णालय व महाविद्यालयाजवळील मेडिकल चौकात 'एकच साहेब बाबासाहेब जयंती उत्सव समिती'च्या वतीने महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांची जयंती नुकतीच उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बुद्धांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्रिवार वंदन करण्यात आले व सामूहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.




बौद्ध अनुयायांमध्ये खीरला विशेष महत्त्व असल्याने, या कार्यक्रमात नागरिकांना खीरदान करण्यात आले. जगाला शांतीचा संदेश देणा?या भगवान बुद्धांच्या विचारानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. समितीचे अध्यक्ष नरेंद्र मेश्राम यांच्या नेतृत्वात झालेल्या या कार्यक्रमास रविंद्र टेंभुर्णे, राहुल बनकर, भीमराव लभाणे, विजय जांभुळकर, शंकर नगराळे, गणेश वाघमारे, खेमदेव गायकवाड, उत्तम मेश्राम, वैभव वासनिक, समाधान खोब्रागडे, शाम तायडे, विलास बाभळे, राहुल इंगळे, अनील डोंगरे, राजपाल ढोले, आकाश इंगोले, निरंजन ठोंबरे, भास्कर धामणकर, कांबले मेजर, रहेमुद्दीन अन्सारी, आर्यन वासनिक, शेखर कोडापे, ओम कनसे, आशीद अन्सारी, आशिष रामटेके, मंदा फुलमाली, तब्बु तायडे, सविता खोब्रागडे आदींसह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# दिग्रस शहर विविध समस्यांचे माहेरघर

### पाणी, वीज व आरोग्याच्या समस्यांनी हैराण, लोकप्रतिनिधींचे मौन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १२ :** शहरात गेल्या काही दिवसांपासून पाणीटंचाई, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि स्वच्छतेअभावी साचलेला कचरा या समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा संतप्त सवाल शहरवासी उपस्थित करीत आहेत.



शहरातील काही भागांत पंधरा-पंधरा दिवसांपासून नळाला पाणी येत नसल्याने कडक उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू आहे. काही दिवसांपूर्वी पालकमंत्री संजय राठोड यांनी पाच टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला होता, मात्र हे टँकर गरजूंपर्यंत न पोहोचता कार्यकर्त्यांच्या भागातच फिरत असल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे, मंत्री संजय राठोड यांच्या मतदारसंघात आणि खासदार संजय देशमुख यांच्या अखत्यारीतील भागात गेल्या महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. दिवसातून अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने कुलर केवळ शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. यासोबतच, शहरातील अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग साचले असून, नगरपालिकेकडून नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने दुर्गंधी पसरली आहे व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नगरपालिका मुख्याधिकारी, पाणीपुरवठा अभियंता, आरोग्य निरीक्षक यांच्यासह आमदार व खासदारांनी या मूलभूत समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने दिग्रसकरांचे जीवनमान खालावले आहे. पाणी, वीज आणि आरोग्य या समस्यांपासून सुटका कधी मिळणार, असा उद्विग्न सवाल नागरिक विचारत असून, प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी त्वरित लक्ष घालून दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# यावर्षी यवतमाळ जिल्ह्याचा निकाल घसरला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज, मंगळवारी, दि. १३ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला. यंदा जिल्ह्याचा निकाल ९१.५१ टक्के लागला असून यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. सर्वाधिक निकाल नेर तालुक्याचा लागला असून सर्वांत कमी निकाल कळंब तालुक्याचा आहे.**



## विद्यानिकेतन इंग्रजी शाळा, दिग्रस

**दिग्रस :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. १३) दुपारी ऑनलाइन जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात येथील विद्यानिकेतन इंग्रजी माध्यम शाळेने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शाळेचा नावलौकिक वृद्धिंगत केला. विद्यानिकेतनच्या शेजल प्रवीण देवतळे हिने ९७.४० टक्के गुण संपादन करून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. तर सृजन रूपेश कराडे याने ९७.२० टक्के गुणांसह द्वितीय आणि श्रेया जानूसिंग राठोड हिने ९७ टक्के गुण मिळवत तृतीय स्थान प्राप्त केले. यासह इतरही अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले. या घवघवीत यशाबद्दल उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे संपूर्ण श्रेय आपले आईवडील, विद्यानिकेतनचे अध्यक्ष संजय बंग, प्राचार्य नितीन राऊत आणि सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे. या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण आहे.

## डॉ. नंदुरकर विद्यालय, यवतमाळ

**यवतमाळ :** येथील डॉ. नंदुरकर विद्यालयाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत सलग विसाव्या वर्षी शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. परीक्षेला बसलेले सर्व १२२ विद्यार्थी अत्युत्तम गुणांसह उत्तीर्ण झाले असून, त्यापैकी तब्बल २० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. विद्यालयातून तुषार कांबळे याने सर्वाधिक ९८% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर नयन जगदळे (९६.६०%), जानवी हांडे (९६.४०%), दर्शन गुरव (९५.८०%) आणि वेदांत ठाकरे (९५.६०%) यांनीही उत्कृष्ट यश मिळवले.

## तेजस्विनी सोमवंशीला ९५ टक्के

**आर्णी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि. १३) मे २०२५ रोजी ऑनलाइन जाहीर झाला. यात आर्णी तालुक्याचा निकाल ९०.३८ टक्के लागला आहे. तालुक्यातील ३६ विद्यालयांमधून एकूण २ हजार २०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी १ हजार ९९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे, तालुक्यातील नऊ शाळांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. सनराईज नर्सरी अँड कॉन्व्हेंट, आर्णीची विद्यार्थिनी तेजस्विनी शिवाजी सोमवंशी हिने ९५ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळवला. तिच्या शाळेचा निकालही शंभर टक्के लागला आहे.



## जायंट्स इंग्लिश मीडियम स्कूल

**यवतमाळ :** येथील नामांकित जायंट्स इंग्लिश माध्यम स्कूलने इयत्ता दहावीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या बोर्ड परीक्षेच्या निकालात शंभर टक्के यशाची गौरवशाली परंपरा याही वर्षी अबाधित ठेवली आहे. शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवत यश संपादन केले आहे. विद्यार्थिनी अक्षदा कमले हिने ९७.८० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. सार्थक भवरे याने ९६.८० टक्क्यांसह द्वितीय, तर प्रथमेश परसोडकर याने ९६.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. विशेष म्हणजे, शाळेतील २९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले असून, ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष जैन, उपाध्यक्ष अनिरुद्ध पांडे, सचिव रमेश छेड, कोषाध्यक्ष सुहास चिद्दरवार, विश्वस्त प्रकाश चोपडा, डॉ. पद्मावार, मुख्याध्यापक योगेशसिंह चौहान तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा?यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## महंत दत्तराम भारती शाळा, आर्णी

**आर्णी :** येथील गांधी नगरातील महंत दत्तराम भारती शाळेची विद्यार्थिनी श्रेया विष्णू वानखडे हिने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेत ९८.६० टक्के गुण संपादन करीत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उत्तुंग यशामागे गुरुजनांची अमूल्य शिकवण, आई-वडिलांचे सुसंस्कार आणि तिने स्वतः घेतलेले अपार परिश्रम, जिद्द व चिकाटी असल्याचे सांगितले जाते. श्रेयाने आपल्या यशाने केवळ शाळेचीच नव्हे, तर संपूर्ण आर्णी तालुक्याची मान उंचावली आहे. भविष्यात तिला आयआयटीमध्ये शिक्षण घेऊन देशसेवा व समाजसेवा करण्याची आकांक्षा आहे. तिने मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल सर्व शिक्षकवृंद, पालक आणि आर्णीतील नागरिकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.





## सुसंस्कार विद्या मंदिर, यवतमाळ

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने २०२४-२५ सत्रात घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत येथील सुसंस्कार विद्या मंदिराने उत्कृष्ट निकालाची परंपरा सलग बाराव्या वर्षीही कायम राखली आहे. शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले. विद्यालयातून रिद्धी उमेश गाडवे हिने ९६.४० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. स्वानंदी चंचल गुल्हाने आणि आंचल मंगेश रेगुंडावार यांनी प्रत्येकी ९५.४० टक्के गुण मिळवून संयुक्तपणे द्वितीय स्थान, तर दिव्या विजय भांबेरे हिने ९४.६० टक्के गुणांसह तृतीय स्थान मिळवले. याशिवाय इशिता पावडे (९३.८०%), वेदश्री देशमुख (९३.२०%) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण संपादन केले, तर मोठ्या संख्येने विद्यार्थी उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन बोरा, उपाध्यक्ष सुनील गुगलिया, सचिव संजय कोचे, मुख्याध्यापिका उषा कोचे तसेच सदस्य व शिक्षकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सदाशिव अनंत भागवत विद्यालय

**म्हसोला का. :** आर्णी तालुक्यातील म्हसोला का येथील सदाशिव अनंत भागवत विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नुकत्याच जाहीर झालेल्या वार्षिक परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन केले आहे. रोशनी मोहन लसंते हिने ८८.६९ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला, तर किरण राजू दुरलवार हिने ८८.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद आणि आपल्या आई-वडिलांना दिले आहे. त्यांच्या प्रेरणा व योग्य मार्गदर्शनामुळेच हे यश संपादन करता आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कुमारी रोशनी आणि कुमारी किरण यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक तसेच म्हसोला व परिसरातील ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत. या निकालाने विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाच्या परंपरेला अधिक बळकट केले आहे.





अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
गुरुवार, दि. १५ मे २०२५


# आमदारांनी घेतला अभियंत्यांचा 'क्लास'

## उमरखेड विधानसभा मतदारसंघातील आढावा; रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी करण्याची ताकीद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर

**उमरखेड, दि.१४: उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांची रखडलेली आणि सुरू असलेली कामे पावसाळ्यापूर्वी, १५ जूनपर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण झालीच पाहिजेत, अशी सक्त ताकीद आमदार किसन वानखेडे यांनी आज (बुधवारी) संबंधित विभागांच्या अभियंत्यांना दिली.**



### अभियंत्यांनो, १५ जून 'डेडलाईन'

- 'उमरखेड-महागाव मतदारसंघातील सर्व अपूर्ण रस्ते १५ जूनपर्यंत युद्धपातळीवर पूर्ण करा, कामाच्या साइटवर संबंधित अभियंता हजर दिसलाच पाहिजे, अन्यथा त्याचा थेट अहवाल वरिष्ठांकडे पाठवून कारवाई प्रस्तावित केली जाईल,' असा खणखणीत इशारा आमदार किसन वानखेडे यांनी दिला.



'अभियंत्यांनी कामाशी प्रामाणिकता ठेवून ती दर्जेदार आणि वेळेत पूर्ण केल्यास उमरखेड-महागाव तालुक्यांचा चेहरामोहरा विकासाच्या दृष्टीने येणाऱ्या काळात निश्चितच बदललेला दिसेल. आजची अभियंत्यांची बैठक हे त्यासाठीचे पहिले पाऊल आहे.'

-नितीन भुतडा,
जिल्हा समन्वयक, भाजप यवतमाळ.

येथील नगरपालिकेत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. महिनाभरावर येऊन ठेपलेल्या पावसाळ्यामुळे रस्त्यांची होणारी संभाव्य दुर्दशा आणि त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी ही तातडीची बैठक बोलावण्यात आली होती. अनेक ठिकाणी कामे वेळेत पूर्ण होत नसल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींकडे येत असून, त्यामुळे सरकारवरही टीकेची झोड उठत असल्याची बाब आमदारांनी निदर्शनास आणून दिली. यावेळी भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, शिंदे सेनेचे नेते चिंतागराव कदम, भाजप नेते दत्ता दिगंबर वानखेडे हेही उपस्थित होते. बैठकीला उमरखेड व महागाव येथील जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपालिका, ढाणकी व महागाव नगरपंचायत तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे अभियंते उपस्थित होते.

आमदार वानखेडे यांनी बंदी भागासह उमरखेड शहर, महागाव शहर आणि दोन्ही तालुक्यांतील कामांचा सविस्तर आढावा घेतला. अभियंत्यांनी कामाच्या ठिकाणी उपस्थित न राहता कंत्राटदारांच्या भरवशावर कामे सोडून विविध कारणे देत वेळकाढूपणा केल्यास त्यांचा अहवाल वरिष्ठांना पाठवून कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. नितीन भुतडा यांनीही हॉटमिक्सची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून, वाहतुकीस अडथळा ठरणारी कामे तातडीने मार्गी लावण्याची सूचना केली. कामात कोणतीही अडचण आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन आमदारांनी केले, मात्र कामांच्या गुणवत्तेबाबत आणि वेळेबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# दिग्रस येथील प्रथमेश इंगोले दहावीत जिल्ह्यातून प्रथम

## दिनबाई विद्यालयाचा विद्यार्थ्याने केला नावलौकिक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



प्रथमेश इंगोले

**दिग्रस, दि. १४:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत येथील दिनबाई विद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश साहेबराव इंगोले हा जिल्ह्यातून पहिला आला आहे. त्याला विज्ञान व गणित या विषयात पूर्णपैकी पूर्ण गुण मिळाले असून भाषेतही प्रावीण्य आहे.

प्रथमेश हा गरीब कुटुंबातील असून त्याचे वडील ऑटो चालवितात. मंगळवारी जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात प्रथमेश पहिला आल्याची बातमी कळताच दिग्रसकरांना आनंद गगनात मावेनासा झाला. त्याचे कुटुंबीयदेखील आनंदित झाले. प्रथमेशने तालुक्यातूनच नव्हे तर जिल्ह्यातून पहिला येण्याचा मान मिळविला आहे. विशेष म्हणजे प्रथमेशला मराठीत १०० पैकी ९९ गुण, हिंदीत १०० पैकी ९७ गुण व इंग्रजीत १०० पैकी ९८ गुण मिळाले आहेत. तिन्ही भाषांमध्ये प्रावीण्य मिळविले आहे; तर विज्ञान या विषयात त्याला १०० पैकी १००, गणितात १०० पैकी १०० व समाजशास्त्र या विषयात १०० पैकी ९९ गुण मिळविले आहे. त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## थोडक्यात

### चाकुच्या धाकावर लुटले

**यवतमाळ :** चाकुच्या धाकावर इसमाला लुटण्याचा प्रकार घडला. याप्रकरणी वाहन क्र. एम.एच. २९ एझेड ५३३० च्या डिक्कीमध्ये ७ लाख रूपये टाकुन बाभुळगाव येथे कर्तव्यावर जात असतांना घटनास्थळावर दोन अनोळखी इसमांनी गाडीवर येवुन वाहन अडवुन पोटाला चाकु लावुन जबरदस्तीने डीक्कीमधील ७ लाख रूपये हिसकावुन गाडीसह चोरून घेवून पळुन गेले. याप्रकरणी सुभाष नारायण बारसे यांच्या तक्रारीवरून दोन अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### गंमत करणे भोवले

**बाभुळगाव :** गंमत करणे इसमाला भोवले. याप्रकरणी फिर्यादीनी आरोपी व त्याच्या मित्राची तीन दिवसापूर्वी मजाक केली असता याकरणावरून संगणमत करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून चाकुने हल्ला केला. यामध्ये इसम गंभिर जखमी झाला. याप्रकरणी सुरेश शंकर पवार यांच्या तक्रारीवरून सुधीर सुभाष सिरसाम व अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### बकऱ्या लंपास

**बाभुळगाव :** बकऱ्या लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी बकऱ्या चारण्याच्या बहाण्याने घेवून जावुन फिर्यादीच्या ८ बकऱ्या किंमत ७०,००० रूपयाच्या चोरून नेल्या. याप्रकरणी बादल बबनराव खंडारे यांच्या तक्रारीवरून फकीर खा मुबारक खा विरूध्द गुन्हा नोंद केला.

# राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्री अग्नितांडव

## शॉर्टसर्किटमुळे मालवाहू मॅक्स पिकअप जळून खाक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. १४:** वडकी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील कारेगाव फाट्याजवळ चालत्या मालवाहू मॅक्स पिकअप वाहनाला भीषण आग लागल्याची घटना मध्यरात्री १.५० च्या दरम्यान घडली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या महितीनुसार, मालवाहू मॅक्स पिकअप वाहन (क्रमांक : यूपी ९५/एटी १२१८) हे खाली कॅरेट घेऊन नागपूरवरून आदीलाबादकडे जात होते. दरम्यान, कारेगाव फाट्याजवळ शॉर्टसर्किट होऊन वाहनाला अचानक आग लागली. आग लागल्याबरोबर वडकी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहनचालक मुस्ताक अहमद बाबू अली (वय ५२ वर्ष, रा.छत्रपूर, मध्यप्रदेश) याला सुखरूप बाहेर काढले, परंतु आगीचा वेग जास्त असल्याने आग नियंत्रणात न येता संपूर्ण वाहनाने पेट घेत क्षणातच संपूर्ण वाहन जळून खाक झाले. यादरम्यान रस्त्यावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक सुरक्षा केंद्र वडकी पोलिस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन मिळेल, त्या साधनाने आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु आगीत वाहन जळून खाक झाले असून यात वाहन चालकाचे मोठे नुकसान झाले आहे.

# सुसाट कारची चार पादचाऱ्यांना धडक

## कारचालक अटकेत, उमरखेड-पुसद मार्गावरील घटना, एक गंभीर, तिघे किरकोळ जखमी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि.१४:** भरधाव वेगाने इंडिगो कार (एमएच ०४/डीवाय ५४३८) चालवून एका पादचारी महिलेसह तीन दुचाकीस्वारांना जखमी करणाऱ्या अभिषेक राठोड (वय २७, रा. दत्तनगर, उमरखेड) याला पोलिसांनी अटक केली आहे. सुसाट वेगाने पळून जाताना त्याची कार पलटी झाल्याने पुढील मोठा अनर्थ टळला. ही थरारक घटना आज, बुधवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास उमरखेड-पुसद मार्गावर घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अभिषेक राठोड हा बेलखेड येथून उमरखेडमधील दत्तनगरकडे भरधाव वेगात कार चालवत होता. शहरातील पुसद अर्बन बँकेसमोर त्याने मोटारसायकलस्वार गणेश राजाराम शिंदे (रा. उमरखेड) व अजय बालाजी वंजारे यांना पाठीमागून धडक दिली. त्यानंतर, त्याने गुनीबाई होशीबा राठोड (वय ५१) या पादचारी महिलेलाही धडक दिली, ज्यात त्या गंभीर जखमी झाल्या. पकडले जाण्याच्या भीतीने अभिषेकने महागाव रोडने वेगाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने सुनील जनार्दन कराळे यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. यानंतर समोर जात असताना, महामार्गावरील हॉटेल आदित्यजवळ गाडीवरील ताबा सुटल्याने त्याची कार पलटी झाली. या विचित्र अपघातांच्या मालिकेत गुनीबाई राठोड गंभीर जखमी झाल्या असून, गणेश शिंदे, अजय वंजारे आणि सुनील कराळेहेदेखील जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कारचालक अभिषेक राठोड याला ताब्यात घेतले. याप्रकरणी पुढील तपास उमरखेड पोलिस करीत आहेत. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले होते.

# यवतमाळात २६ मे रोजी 'न्याय दो' आंदोलन

## डॉ. विष्णू उकंडे यांचा पुढाकार; जिल्हाकचेरीवर धडकणार मोर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१४:** महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीसाठी ग्रामसेवकांची सही मिळत नसल्याने हजारो कामगार योजनांपासून वंचित राहत असल्याच्या निषेधार्थ, कामगार नेते डॉ. विष्णू उकंडे यांच्या नेतृत्वात यवतमाळ येथे सोमवार, दि. २६ मे रोजी 'न्याय दो'आंदोलन पुकारण्यात आले आहे.

कामगार व उद्योग समिती, यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने येत्या २६मे २०२५ रोजी दुपारी १२वाजता यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विष्णू उकंडे यांनी दिली. या आंदोलनात जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगार सहभागी होणार आहेत.



डॉ. विष्णू उकंडे

ग्रामविकास विभाग व कामगार विभागाच्या स्पष्ट सूचनांनुसार, बांधकाम कामगारांच्या नोंदणी अर्जावर ग्रामसेवकांची सही अनिवार्य आहे. मात्र, जिल्ह्यातील अनेक ग्रामसेवक त्यांच्या युनियनच्या दबावाखाली सही देण्यास नकार देत असल्याचा आरोप डॉ. उकंडे यांनी केला आहे. यामुळे कामगारांची नोंदणी रखडत असून, त्यांना आर्थिक, आरोग्य, सामाजिक व शैक्षणिक योजनांचा लाभ मिळत नाही. आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये, कामगार विभागामार्फत आजपर्यंत एकही घरकुल न दिलेल्या यवतमाळ जिल्ह्यात घरकुल योजना राबवावी, पेटी व डिनर सेटचे वाटप सुरू करून शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचवावा, यवतमाळ जिल्ह्यासाठी नियमित कामगार अधिकाऱ्याची नेमणूक करावी (सध्याचे अधिकारी महिन्यातून केवळएक ते दोन दिवस उपस्थित असतात व फोन फॉरवर्ड ठेवतात असा आरोप आहे), आणि विविध कल्याणकारी योजना विनाविलंब मंजूर कराव्यात, यांचा समावेश आहे. हे आंदोलन पोस्टल ग्राऊंड ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गाने मोर्चाने धडकणार आहे. कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावेत यासाठी हा लढा निर्णायक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

# वाशिम-पुसद मार्गावर गांजा जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, मांजर शिवारात दोघांना अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १४ :** यवतमाळ जिल्ह्यात अवैध धंदे आणि अमली पदार्थांची तस्करी रोखण्याच्या उद्देशाने स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई केली आहे. वाशिम-पुसद मार्गावर मांजरजवळा शिवारात सापळा रचून, पाठलागानंतर दोन व्यक्तींना तीन किलो १७० ग्रॅम गांजासह अटक करण्यात आली. ही कारवाई मंगळवारी (दि. १३) करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मंगळवारी (दि. १३) वाशिम-पुसद मार्गाने दोन व्यक्ती गांजा विक्रीसाठी घेऊन येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने तात्काळ वरिष्ठांना कळवून मौजे मांजरजवळा शेतशिवारात सापळा लावला. यावेळी एक काळ्या रंगाची हिरो मोटारसायकल व त्यामागे एक स्कूटी संशयास्पदरीत्या येताना दिसल्या. त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची नावे अब्दूल शकील शेख अब्दूल शफी शेख (वय ४८, रा. गंगानगर, वाशिम बायपास, अकोला) आणि अजय भोलाप्रसाद गुप्ता (वय २६, रा. देवपेठ, वाशिम) अशी आहेत. त्यांच्या बॅगेची पंचासमक्ष झडती घेतली असता, तीन किलो १७० ग्रॅम गांजा, दोन मोबाईल आणि दोन मोटारसायकली असा एकूण १,८३,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. खंडाळा पोलिस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. आणि एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन गजभारे, पोलिस उपनिरीक्षक शरद लोहकरे, पोलिस हवालदार संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, पोलिस शिपाई सुनील पंडागळे, चालक पोलिस निरीक्षक रवींद्र श्रीरामे, चालक पोलिस शिपाई राजेश जाधव यांनी केली.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेला नागरिकांचा 'सलाम'

## 'रस्ता सुरक्षा समिती'प्रथमच सक्रिय; वाढते अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजनांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ गणेश खडसे

**यवतमाळ, दि.१४: जिल्हाधिकारी विकास मीना यांनी प्रथमच जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची मंगळवारी बैठक घेऊन अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजनांचे निर्देश दिल्याने, त्यांच्या संवेदनशीलतेबद्दल यवतमाळकर नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. निष्क्रिय यंत्रणेला जागे करण्याचे काम त्यांनी केल्याने त्यांचे आभारच (सॅल्यूट) मानले जात आहे.**



जिल्हास्तरावर रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि रस्त्यांवरील सुरक्षितता वाढवण्यासाठी 'जिल्हा रस्ता सुरक्षा समिती' कार्यरत असते, ही बाब या बैठकीमुळे पहिल्यांदाच अनेकांच्या निदर्शनास आली असावी. गेल्या वर्षभरात जिल्ह्यात अनेक गंभीर अपघात झाले, ज्यात अनेकांना प्राण गमवावे लागले तर काहींना कायमचे अपंगत्व आले. सिमेंट रस्त्यांमुळे वाहनांचा वेग वाढला, पण हेल्मेट आणि सीटबेल्ट वापराकडे वाहतूक विभाग आणि पोलिसांसह उप प्रादेशिक परिवहन विभागानेही अक्षम्य दुर्लक्ष केल्याचा आरोप सातत्याने होत होता. हे विभाग केवळदंड वसुलीतच आघाडीवर असल्याची नागरिकांची भावना होती. नुकतेच परिवहन आयुक्तांनी यवतमाळ दौऱ्यात संबंधित विभागांची कानउघाडणी केली होती. त्यानंतर, समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मंगळवारी (दि.१३ मे) तातडीने बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांची 'जीवनदूत' म्हणून नेमणूक करणे, तसेच जिल्ह्यातील अपघातप्रवण स्थळे निश्चित करून तेथे तातडीने सुरक्षा उपाययोजना राबवण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. आजपर्यंत केवळ कागदावर असलेली ही समिती आता खऱ्या अर्थाने सक्रिय झाल्याने नागरिकांच्या मनात आशेचा किरण निर्माण झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेमुळे भविष्यात रस्त्यांवरील अपघातांना आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### जिल्ह्यात १२ 'ब्लॅक स्पॉट'; निधी मात्र दुसरीकडेच?

- उप प्रादेशिक परिवहन विभागाच्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यात तब्बल १२ ठिकाणी अतिधोकादायक अपघातप्रवण स्थळे (ब्लॅक स्पॉट) आहेत. रस्ता सुरक्षा समितीने या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याचे सुचवले असले, तरी प्रत्यक्षात मात्र कोणतीही ठोस कामे झालेली दिसत नाहीत. धक्कादायक बाब म्हणजे, या कामांसाठी शासनाकडून येणारा निधी इतर कामांसाठी वापरला गेल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे, जी अत्यंत गंभीर आहे.

### रस्ता सुरक्षा समितीची उद्दिष्ये केवळ कागदावरच?

- रस्ते अपघातांचे प्रमाण आणि त्यातील मृत्यू व जखमींची संख्या कमी करणे, विविध विभागांत समन्वय साधणे, जनजागृती, वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी, 'ब्लॅक स्पॉट' सुधारणे आणि अपघातग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करणे, ही रस्ता सुरक्षा समितीची प्रमुख उद्दिष्ये आहेत. मात्र, आतापर्यंत ही उद्दिष्ये केवळ कागदोपत्रीच राहिल्याची खंत व्यक्त होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने यात बदल होण्याची आशा आहे.


## नगरपंचायत कार्यालय, कळंब
## ता. कळंब जि. यवतमाळ

**नगर पंचायत कळंब ता.कळंब जि.यवतमाळ याव्दारे नागरिकांना सुचीत करण्यात येते की, नगर पंचायत कळंब परिसरातील खालील नमूद केलेल्या मालमतेचा फेरफार करण्याबाबत अर्जदारांनी कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.**

| अ. क्र. | सध्या नगर पंचायत रेकॉर्डला असलेला नाव | मालमत्ता क्र./ प्लॉट | अर्जदाराचे नाव | सादर केलेला देस्तावेज | जागेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुकीत अनवर सिद्धिकी | ९८२ | नगमा असलम मुसाणी | मिळकत, विक्रीपत्र | खाली जागा |

उपरोक्त नमुद मालमतेशी संबधित वारसांनी व त्या व्यातिरीक्त ज्यांचा हक्क असेल त्यांनी सदरहू मालमता बाबत कोणताही आक्षेप असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून आवश्यक दस्तावेजासह लेखी आक्षेप सात दिवसांचे आत मुख्याधिकारी नगर पंचायत कळंब यांच्याकडे सादर करावे. नमूद मुदतीच्या आत कोणत्याही स्वरूपात आक्षेप प्राप्त न झाल्यास वर नमुद अर्जाचे अनुषगाने अधिकार बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल. तरी संबधितांनी नोंद घ्यावी.

**स्वा./-**
**कर निरीक्षक कर लिपीक**
**नगर पंचायत कळंब**